श्री तुकोबांच्या निवडक अभंगांचे सर्वांसाठी सोपे विवरण

प्रसादकण



डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

प्रसादकण

(श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे नरूपण)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* प्रसादकण

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : नोव्हेंबर २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep **(साधननंदादीप)**

*

जगद्गुरू श्री तुकोबांना

आणि

सर्व 'गाथा'मार्गी भाग्यवंत साधकांना

सादर समर्पण...

'काही बोलिलो बोबडे।मायबाप तुम्हांपुढे !'

- सुहास पेठे

*

● अनुक्रम ——

●	प्रसादकण वेचताना	.. ५
१..	एक मोठं आश्चर्य	.. ७
२..	शरणागती	.. ११
३..	आयुष्याचं मोल	.. १५
४..	अज्ञानाचं विश्व	.. १९
५..	रोग वाढवणारं औषध	.. २३
६..	देहाचा विसर	.. २७
७..	जन्माचं मूळ	.. ३१
८..	स्वहिताची कृती	.. ३५
९..	खरी तीर्थयात्रा	.. ३९
१०..	शुद्ध चित्ताचा चमत्कार	.. ४३
११..	आणिक न साहे	.. ४७
१२..	आवडीची भक्ती	.. ५१
१३..	कृपेचा प्रत्यय	.. ५५
१४..	जागृतीचा दिवस	.. ५९
१५..	सोपा उपाय	.. ६३
१६..	खरा आप्त	.. ६७
१७..	एकच ओढ	.. ७१
१८..	देवाची आगळी खूण	.. ७५
१९..	त्यागाची तयारी	.. ७९
२०..	एकच चिंता	.. ८३
२१..	अभिन्न भक्ती	.. ८७
२२..	मनमाउली	.. ९२
२३..	निर्धार	.. ९७
२४..	हेचि दान देगा देवा	..१०२

प्रसादकण वेचताना...

माणसाला देवत्वाची ओळख होणं आणि स्वत: माणूस देव होणं – हा मानवी जीवनाचा प्रधान हेतू आहे. तो हेतू साध्य व्हायला मानवी प्रयत्न कसूनच लागतात. पण अनेकदा ते अपुरे पडतात. अशा वेळी मानवी प्रयत्नांना बळ देणारी व प्रेरणा देणारी कुणी माणसं देवत्व गाठताना प्रत्यक्ष पाहायला मिळाली, तर ती गोष्ट मोठी भाग्याची ठरते. म्हणून भगवंत 'नराचा नारायण' होणारी काही माणसं जन्माला घालतो. अशी माणसं तळमळीनं आणि साधनेनं माणसाचा देव होणं म्हणजे काय हे त्यांच्या जीवनाच्या रूपानं प्रत्यक्ष जगून दाखवतात. संतश्रेष्ठ श्री तुकोबा हे याचं मूर्तिमंत उदाहरणच होत.

एक सामान्य माणूस म्हणून भगवंत होण्याची वाटचाल करताना ते ज्या ज्या अवस्थांतून, परिस्थितींतून गेले, ज्या अडचणींतून गेले – प्रापंचिक दृष्टीनं आणि पारमार्थिक दृष्टीनंही – त्या साऱ्या अवस्था कोणत्याही साधारण माणसाला जवळच्या वाटतात. श्री तुकोबांच्या जीवनाचं अधिक अलौकिक वैशिष्ट्य हे की, त्यांना भगवत्कृपेनं वाचा अनावर होऊन ते जसे जसे जगत गेले,तसे तसे ते अभंगात चित्रितही करीत गेले. या अर्थानं त्यांची गाथा हा एक ईश्वरी प्रसादच आहे.

ती गाथा वाचताना असं वाटतं ते अशा अर्थानं की, मानवी जन्माचा ईश्वरी हेतू पुरा करतानाच्या साऱ्या अवस्था ईश्वरानंच कृपाळूपणे या अभंगांच्या रूपानं त्यांच्याकडून अक्षरबद्ध करून घेतल्या आहेत. त्यामुळं कोणत्याही सामान्य माणसाला देवत्वाच्या दिशेनं वाटचाल करताना हा ईश्वरी प्रसाद उपलब्ध आहे. हे सर्वांचच भाग्य आहे, विशेषत: मराठी माणसाचं तर आहेच आहे.

त्याच ईश्वरी प्रसादातले हे अगदी अल्प असे चोवीस कण आहेत. मूळ गाथा सुमारे साडेचार हजार अभंगांची. ती मुळातून वाचणारे, अभ्यासणारे आणि त्यानुसार जगू शकणारे तर भाग्यवंतच म्हटले पाहिजेत. इतकं एकदम शक्य नसलं तरी असे काही प्रसादकण वेचले, अभ्यासले, त्यानुसार आपलं जीवन घडवायचा प्रयत्न केला, तर तेही थोडं का होईना उपयोगीच ठरेल, यात शंका नाही. म्हणून हे कण वेचण्याचा हा नम्र प्रयत्न. अर्थात असे अभंग निवडताना सर्व महत्त्वाचे

विषय वा अभंग एवढ्याशा चोवीस अभंगात समाविष्ट होणं कठीणच आहे.

तरीही हे अभंग निवडताना शक्यतो साधकवृत्तीच्या व्यक्तीला मार्गदर्शन होईल, महत्त्वाचे प्रश्न समजून येतील, मार्गातल्या अडीअडचणी समोर येतील, काही नेहमीचे वाटणारे, पण वेगळ्या अर्थानं खरे गरजेचे विषय समोर येतील – अशा पद्धतीनं प्रयत्न केला आहे. त्यामुळं साधनप्रवासातले सलग टप्पे वगैरे त्यात नाहीत. त्यावरचं निरूपणही विशिष्ट साच्यानं न करता कधी पार्श्वभूमी तपशिलात सांगितली आहे, कधी त्या अभंगातल्याच महत्त्वाच्या कल्पनांचं विवरण केलं आहे, कधी साधनेच्या दृष्टीनं त्या अभंगाचा अर्थ स्पष्ट केला आहे. यामागं आपलं मूळ उद्दिष्ट गाथेकडून आपल्या जीवनाला विधायक व ईश्वरत्वाचं वळण देण्यासाठी उपयोगी काय ते घेण्याचं आहे. म्हणूनच प्रक्षिप्त अभंग, शब्दार्थ, पाठभेद इत्यादी तांत्रिक भागही टाळला आहे.

इथं प्रामुख्यानं आधाराला घेतलेल्या श्री तुकोबांची सरकारी गाथा (१९७३) व कै. ह.भ.प. जोग महाराजांनी संपादित केलेली श्री तुकोबांची सार्थ गाथा (१९९०) या प्रतींचे प्रकाशक व संपादक यांचा मी ऋणी आहे. सुमारे सोळा वर्षांपूर्वी या संकलनातील अभंग आम्ही सामूहिक अभ्यासाला घेतले होते. त्या अभ्यासात भाग घेणाऱ्या सहसाधक बंधुभगिनींचाही मी कृतज्ञतेनं उल्लेख करतो. त्यांच्यामुळं या अभंगांचं तेव्हा अधिक चिंतन झालं.

वाचकांच्या उत्तम प्रतिसादामुळं संतांच्या छायेखाली 'प्रसादकण'ची ही पुढची आवृत्ती प्रसिद्ध करण्याचा सुयोग येत आहे. व्यावसायिक वितरणव्यवस्थेच्या अभावी स्वतः पुरतके घेऊन ती पुढे जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी सेवाभावाने मदत करणाऱ्या साधकांचा, तसेच प्रकाशनाशी निगडित सर्वश्री श्री. संदेशजी शहा, प्रकाश फुले आदी सर्वांचा मी ऋणी आहे. अक्षरजुळणीबद्दल सौ. मैथिली हिचाही मी आभारी आहे.

हे प्रसादकण वेचणाऱ्या सर्व वाचकांची आनंदाची वाटचाल सुकर होवो, हीच संतचरणी प्रार्थना.

संतनगरी, सातारा – सुहास पेठे

१
एक मोठं आश्चर्य

वाटे या जनाचे थोर बा आश्चर्य । न करिती विचार का हिताचा ।।१।।
कोण दम ऐसा आहे यांचे पोटी । येईल शेवटी कोण कामा ।।२।।
काय मानुनिया राहिले निश्चिंती । काय जाब देती यमदूता ।।३।।
का ही विसरली मरण बापुडी । काय यांसी गोडी लागलीसे ।।४।।
काय हाती नाही करील तयासी । काय जाले यांसी काय जाणो ।।५।।
का ही नाठविती देवकीनंदना । सुटाया बंधनापासूनिया ।।६।।
काय मोल यासी लागे धन वित्त । का हे यांचे चित्त घेत नाही ।।७।।
तुका म्हणे का ही भोगितील खाणी । का त्या चक्रपाणी विसरली ।।८।।

***

एखाद्याचं एखाद्या गोष्टीत सरळ सरळ हित असलं आणि तरी तो जर ती गोष्ट करीत नसला, तर हे सारं कळणाऱ्या त्याच्या हितचिंतकाला जे आश्चर्य वाटतं, जो उद्वेग येतो तो आपल्यासारख्यांचं आयुष्य पाहून तुकोबांना येतो. शक्तिबुद्धीनं ठासून भरलेला हा माणूस स्वत:चं अंतिम कल्याण कशात आहे याचा विचारसुद्धा करायला तयार होत नाही, हे बघून त्यांना आत्यंतिक दु:ख होतं.

आयुष्य ही अत्यंत जपून वापरण्यासारखी गोष्ट. कारण तिच्यातल्या एका दिवसाला नव्हे, एका क्षणालाही भरपाई नाही. गेला की गेला. त्या मोजलेल्या दिवसांतला एक क्षण कायमचा कमी झाला. या दृष्टीनं आपल्या आयुष्यातल्या रोजच्या दिवसाकडं नि पुढं वाढून ठेवलेल्या अपरिहार्य नि अटळ मृत्यूच्या दिवसाकडं सावध दृष्टीनं पाहाणाऱ्या माणसाला आपल्या

वाट्याला आलेल्या या अक्षरशः अनमोल आयुष्याची कल्पना येईल. पण साधारणपणे दिसतं ते काय, तर ना कुणाला गेलेल्या दिवसाचा विचार, ना गेलेल्या क्षणाची खंत. उलट असा विचार करू म्हणणाऱ्यालाच तो उद्दामपणे विचारील, यात एवढं विचार करण्यासारखं काय आहे ? अजून आयुष्य खूप आहे. आत्ताच तरुणपणी नको असले उदास नि म्हातारे विचार करू ! आत्ता कसं रोज नवनवीन सुखाचा शोध घेत, मौजमजा करीत राहा.

त्याच्याच बरोबर आणखीही एक विलक्षण अशी प्रतिक्रिया तुकोबांसारख्या विचार करणाऱ्याला ऐकायला मिळेल. ती अशी की, काही म्हणतील की, मान्य आहे तुम्ही म्हणता ते, मानवी आयुष्य दुर्मीळ आहे, मोलाचं आहे. रोज एकेकक्षण कमी होतो आहे, असा वेळ दवडून चालणार नाही. कोणत्याही क्षणी माणसाला मरण येऊ शकतं, हे बरोबर आहे. पण म्हणून तर आम्ही एक क्षणसुद्धा खाण्यापिण्यावाचून जाऊ देत नाही. जास्तीत जास्त चैन करून घेतो. जास्तीत जास्त छानछोकीत राहातो आहोत, नवे नवे पदार्थ करतो आहोत, खातो आहोत, नवा नवा प्रांत पाहातो आहोत, नवी नवी करमणुकीची साधनं आणतो आहोत, कारण माणसाच्या देहाचा काय भरवसा सांगावा ? कदाचित तो उद्या राहाणार नाही. त्यामुळं जे जे मिळवावंसं वाटतं, जे जे करावंसं वाटतं ते तेसुद्धा उद्या नाही, आजच करूया, कारण नरदेह दुर्लभ आहे ! आता अशा लोकांपुढं हद्दच आहे. पण त्यांच्या म्हणण्यातला फोलपणा सरळ आहे.

एखादा अंधारात चाचपडत चालत असावा, त्याचा मार्ग त्याला दिसावा, त्या प्रकाशात त्याला त्याचा मुक्काम गाठता यावा म्हणून त्याच्या हाती मशाल द्यावी, तर त्याच्या प्रकाशात चालून मुक्काम गाठण्याऐवजी तिची ऊब चांगली वाटते, म्हणून आणखी ऊब मिळण्यासाठी त्यानं त्याच

मशालीनं स्वत:चे कपडे पेटवून शेकावं आणि अखेर त्याच जागी भाजून मरून जावं, त्यातला हा प्रकार आहे.

मनुष्याला देह दिला, तो दुर्मीळ आहे इथंपर्यंत ठीक आहे. पण म्हणून करावं काय, हा प्रश्न आहे. मनुष्यजन्म म्हणजे जन्मापासूनच नव्हे जन्मापूर्वीपासूनही वासनेच्या बंधनात अडकलेल्याला बाहेर काढून मुक्त करण्यासाठी दिलेली मशाल आहे. त्याच मशालीच्या प्रकाशात पाहिलं म्हणजे लक्षात येईल की, आपण कसे अडकलेले अन् परस्वाधीन आहोत. ना स्वत:ची बुद्धी हातात, ना मन हातात, ना कर्तृत्व हातात ! दुपट्यातल्या मुलाचं साधं कुशीवर वळणं, हालणं, बोलणं, चालणं, खाणं, पिणं पूर्णपणे दुसऱ्यावर अवलंबून असतं, हे आपण समजू शकतो. पण हा खाण्यापिण्यात नि मौजमजेत अडकलेला तथाकथित मोठा माणूससुद्धा अशा अनेक बाबतीत परावलंबी, परतंत्र असतो हे विचार केला तरच लक्षात येईल.

पारतंत्र्य दोन प्रकारचं असतं. एक तर स्वत:ला हवं ते, हवं तेव्हा, हवं तसं, हवं तेवढं करता न येणं आणि दुसरं म्हणजे दुसऱ्याच्या तंत्रानं, आपल्याला नको असताना, त्याला हवं आहे म्हणून, तसं, तेवढं, त्या पद्धतीनं करावं लागणं. इथं दुसरा म्हणजे - स्वत:चे विकार, दुसरी व्यक्ती, परिस्थिती - अशी कोणतीही गोष्ट असू शकेल. या पार्श्वभूमीवर पाहिलं तर कळेल की, आपण त्या मुलाइतकेच अजूनही परस्वाधीन आहोत तर मुक्त होणं दूर, भगवंत आणि निरुपाधिक आनंद वगैरे तर दूरच दूर !

म्हणून ही माणसं शेवटी यमदूतांना काय जाब देणार म्हणून तुकोबा विचारतात. आपल्या एरवी ज्या साऱ्या उड्या नि तथाकथित स्वातंत्र्य, मौजमजा नि करमणुकी आहेत, त्या पिंजऱ्यातल्या किंवा

तुरुंगातल्या कैद्यानं तुरुंगाच्या चार भिंतींच्या आत मोकळेपणानं उनाडण्याच्या लायकीच्या आहेत. पण हे केव्हा नि कुणाला कळेल - जो या तुरुंगाबद्दल जागा होईल, संतांच्या जीवनाकडं पाहून ज्याला माणसाच्याच जन्माला येऊन स्वतंत्र म्हणजे काय होता येतं याची कल्पना येईल - त्याला कळेल.

म्हणून हा चोवीस अभंगांतला पहिला अभंग आपल्याला जागं करणारा आहे. झोपलेल्या माणसाजवळून लग्नाची वरात गेली काय नि राजाची मिरवणूक गेली काय, सारखीच! जागे झालो तर पुढं मनुष्यत्व म्हणजे काय, त्याचं सार्थक म्हणजे काय हे सगळं आहे. म्हणून निदान आपल्या आपल्या आयुष्याबद्दल तुकोबांना काय वाटतं हे तरी समजून घ्यावं.

या अभंगात ते म्हणतात, ही माणसं स्वत:च्या खऱ्या हिताचा विचार कसा करीत नाहीत, याचं मोठं आश्चर्य वाटतं! कसल्या भ्रमात हे वावरताहेत, कोण शेवटी त्यांच्या उपयोगी पडेल अशा समजुतीत हे आहेत? माणसाला अत्यंत अटळ असलेल्या मरणाचा त्यांना विसर कसा काय पडतो? या जगातल्या सुखोपभोगांना हे इतके कसे काय भुलून गेले आहेत? इतके भुलून गेले की, यांना भगवंताचा, निदान स्वत:च्या सार्थकाचासुद्धा विसर पडला का? असल्या परावलंबी जिण्यातून सुटायला भगवंताच्या स्मरणाचा इतका सोपा, इतका स्वस्त मार्ग असताना त्याचं मन त्याकडं का बरं वळत नाही?

आपल्याबद्दल, आपल्या आयुष्याचं सार्थक होण्याबद्दल श्री तुकोबांना वाटणारी कळकळ जरी आपण समजून घेतली तरी आपण सावध होऊ !

**

२.
शरणागती

माझे मज कळो घेती अवगुण । काय करू मन अनावर ।।१ ।।
आता आड उभा आहे नारायणा । दयासिंधुपणा साच करी ।।२।।
वाचा वदे परी करणे कठीण । इंद्रिया आधीन झालो देवा ।।३।।
तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरी उदास मायबापा ।।४।।

***

माणसाचं मन ही मोठी गूढ आणि विचित्र गोष्ट आहे. पहिल्या अभंगात म्हटलं आहे, तसा एखादा सावध झाला, जागा झाला तर त्याला कळतं की, आपलं गणित चुकतं आहे. आपल्या हिताचा विचार आपण खरंच आजवर केला नाही. स्वार्थ पाहिला, पण हित पाहिलं नाही. हे काही खरं नाही. माणसाच्या जन्माला आलो ते काही पशुसारखं देहसुखात सार्थक मानायला आणि बंधनात जगून बंधनात मरायला नाही ! त्यापलीकडं मुक्त होण्यात म्हणजेच भगवंत मिळवण्यात किंवा अखंड समाधान याच जन्मी मिळवण्यात आपलं सार्थक आहे. हे सारं कळलं तरीही पुढं काही वेळा माणसाचं मन काय गफलत करतं ते पाहाणं अत्यंत उद्‌बोधक ठरेल.

वर म्हटलं तसं अनेकांना वाटतं. त्यातले काही लोक पुढं असं पाहातात की, अरे आजूबाजूला आपल्यासारखेच बेसावध जगणारे, इंद्रियांच्या आणि वासनेच्या अधीन होऊन पशुवत् आयुष्य जगणारे अनेक लोक आहेत. आता आपण तर जागे झालो आहोत. आपल्याला पहिल्या अभंगात सांगितला तसा आयुष्याच्या सार्थकाचा विचार कळला आहे.

पण या इतर लोकांचं कसं होणार? त्यांना तर तेही कळलं नाही. ते बिचारे अजून निश्चिंत आहेत, बेसावधच आहेत. आपण जागं झाल्यानं, आता त्यांना जागं करणं ही आपली जबाबदारी नाही का? त्यांना आपण आता सावध करू ! म्हणून ते कर्णे घेऊन या समाजजागृतीला नि परोपकाराला निघतात. वरवर पाहाता हे सारं चांगलं वाटलं, बरोबर वाटलं, तरी माणसाच्या फसव्या मनाची ती आणखी एक करामत आहे. हे आपण विचार केला तर लक्षात येईल. समाजकार्य नि परोपकार हे सारं चांगलं असलं तरी ते कुणी, केव्हा करावं याचं भान विसरलं, तर मूळ कार्याची ते कशी हानी करतं, ते पाहाण्यासारखं आहे.

वास्तविक जाग्या झालेल्या माणसाचं मुख्य, मूळ काम अजून व्हायचंच आहे. तो तर आहे तिथंच आहे. पण त्याचा आव मात्र अगदी मुक्काम गाठल्यासारखा आहे! ही त्याच्याच मनानं त्याची केलेली फसवणूक आहे. वास्तविक जागं होताच त्याचं पहिलं काम हे आहे की, मी आत्ता नक्की कोणत्या जागी आहे, त्या चुकीच्या जागी, त्या वाटेला मी कसा व कुणामुळं आलो, याचं आकलन करून घेणं! मग योग्य मार्ग कोणता नि त्याची वाटचाल कशी करता येईल, फक्त प्रत्यक्ष वाटचाल वगैरे वगैरे. ते सारे अजून बरेच टप्पे आहेत. पण ते सारं सोडून हे मन एकदा जगाला सुधारायला निघालं की, मग जगाचे दोष पाहील, त्याला उपदेश देईल - एक ना दोन ! सारी दिशाभूलच !

म्हणून जागा झाला की, पहिली नजर सद्य:स्थितीवर नि ती का व कुणामुळं आली यावर! त्यातले दोन महत्त्वाचे मुद्दे या अभंगात येऊन जातात. एक, आपलं मन अनावर आहे नि मी इंद्रियांच्या अधीन झालो आहे. होतं काय की, अनेकदा व्यवहारी माणसांना असं वाटतं की, आपली काही अशी परिस्थिती नाही ! पण थोडा विचार करावा. कृष्णमूर्ती

म्हणत ते लक्षात ठेवावं. मांजराचा खरा स्वभाव त्याला मांडीवर घेऊन थोपटताना कळत नाही. तशा वेळी ते समजूतदार, शहाणं, प्रेमळच वाटतं. ते खरं नव्हे. त्याचा खरा स्वभाव केव्हा कळेल, जेव्हा त्याच्या विरोधात आपण काम करू! त्याला जरा जरी ओचकारलं, पिडलं तरी क्षणात ते फिस्कारून येईल ! तेव्हा कळेल त्याचा स्वभाव काय आहे !

हीच अवस्था आपल्या मनाची आहे. त्याला खायला हवं - खायला देतो आहो, त्याला फिरायला हवं - फिरायला जातो आहो, त्याला माणसं हवी - आपण जोडतो आहो, तोवर ते निरुपद्रवी, आनंदी, अगदी छानच आहे. ते स्वतंत्र, सुंदर सगळं काही आहे. यावर जाऊ नये, थोडं विरोधात जाऊन पहावं. त्याला बाहेर जायचं आहे, आपण जाऊ नये. मग पाहावं त्याची कशी तगमग होते. मग ते त्या जाण्याच्या आनंदावर किती अवलंबून आहे, किती स्वतंत्र आहे नि किती परतंत्र आहे ते कळेल आणि आपणही किती परतंत्र नि स्वतंत्र आहोत ते कळेल ! मग जे व्यवहारी, सामान्य माणसाला वाटतं ते खरं आहे का, हेही कळेल.

मग या आपल्या स्थितीला आपल्यातले काही अवगुणच जबाबदार आहेत, हे कळतं. मग तो अवगुण म्हणजे या विषयाचा आपण अभ्यास केला नाही-टाळाटाळ केली हा असेल, इंद्रियांचे फाजील लाड पुरवून, ती म्हणतील तसं करीत राहून आपण त्यांना बळकट होऊ दिलं हा असेल किंवा भगवंताचं स्मरण ठेवा, स्मरण ठेवा असा संतांनी कंठशोष करून तो आपल्या कानी पडूनसुद्धा, त्याकडं सोयीस्कर दुर्लक्ष करणं - म्हणजेच भगवंताचं विस्मरण - हा सगळ्यात मोठा अवगुण असेल.

मग सुरू होते ती या अवगुणांना घालवण्याची धडपड. तिच्यातही पुन्हा मनाचा एक फसवा पेच असतो. तो म्हणजे आपण आता बरेच गुणी झालो आहोत असं स्वत:लाच वाटणं! हाही टप्पा सावधपणे पार केला,

तर मग मात्र आकलन होतं. ते असं की, हे काम वाटतं तेवढं सोपं नाही. 'वाचा वदे परी करणे कठीण !'

मग सुरुवात होते ती, स्वतःच्या एरवी बेसावध असताना फार मोठ्या वाटणाऱ्या कर्तृत्वाची ! त्या बरोबर मग शरणागतीची पहिली अवस्था येते. 'आता आड उभा आहे नारायणा' अशी काकुळती सुरू होते. कसाही असलो तरी मला या प्रवासात सांभाळ, अशी विनवणी केली जाते. कारण आजवर मी फारच कर्तृत्ववान, गुणी, विद्वान, श्रेष्ठ होतो, आता मात्र मी हे तर काही जवळपास नाहीच, उलट दीन, दुबळा, क्षुद्र सारांशानं कसाही आहे. 'जैसा तैसा आहे', याची प्रामाणिक जाणीव होते. मग वाटचालीचा पुढला मार्गही उघडत जातो, उलगडत जातो.

**

३.
आयुष्याचं मोल

मोलाचे आयुष्य वेचुनिया जाय। पूर्वपुण्ये होय लाभ याचा ।।१।।
अनंत जन्मीचे शेवट पाहाता । नरदेह हाता आला तुझ्या ।।२।।
कराल ते जोडी येईल कार्यासी । ध्यावे विठ्ठलासी सुखालागी ।।३।।
साचलिया धन होईल ठेवणे । तैसा नारायण जोडी करा ।।४।।
करा हरिभक्ती परलोकी ये कामा । सोडवील यमापासोनिया ।।५।।
तुका म्हणे करा आयुष्याचे मोल । नका वेचू बोल नामेविण ।।६।।

***

आपल्या स्वत:च्या अवस्थेचं भान माणसाला आलं, तरी ज्याच्या भांडवलावर आपला हा सारा उद्योगधंदा सुरू आहे त्याचं आणि त्याच्या महत्त्वाचं भान होणं, हेही आत्यंतिक गरजेचं आहे. ते जे मूळ भांडवल - आपलं आयुष्य, आपला माणसाचा देह - ज्याच्यावर आपल्या साऱ्या उड्या आहेत, त्याचं मोल अनेकदा आपल्या लक्षात येत नाही. होतं काय की, अनेकदा एखाद्या गोष्टीची, वस्तूची किंमत आपल्याला माहीत नसली किंवा फारच किरकोळ वाटली, तर ती वस्तू आपण कुठंही टाकतो, कशीही वापरतो. तीच काहीशी अवस्था या नरदेहाची आहे.

आपल्या वाट्याला आलेला देह ही काही विचार करण्यासारखी गोष्ट आहे, असं अनेकांना वाटत नाही. केलाच विचार तर तो देह सुखात कसा ठेवता येईल, त्याला तोशीस कशी न लागेल हा विचार करतो. हे करणं म्हणजे त्या देहाच्या साहाय्यानं देहसुख मिळवणं एवढंच! ज्या अर्थानं देहाचा विचार इथं अभिप्रेत आहे ते हे नव्हे, हे उघडच आहे.

एकाकडं एक इंजिनिअरिंग कॅल्क्युलेटर होता, तो गृहस्थ तो कॅल्क्युलेटर बेरीज-वजाबाकी करायला वापरी. तीसुद्धा कुठली तर तीन-चार संख्यांची. त्या यंत्राची क्षमता अत्यंत किचकट फार मोठी मोठी गणितं सोडवण्याची आहे, ते यंत्र काही एक-दोन आकड्यांची बेरीज-वजाबाकी करू शकणार नाही का ? सहज काही सेकंदांतच करील. पण त्याचा तो खरा वापर होईल का? तर नाही.

या अर्थानं आपण मनुष्यदेहाचं खरं महत्त्व ओळखलेलं असत नाही. खाणंपिणं नि देहाचे उपभोग म्हणजे अगदी दोन संख्यांची बेरीज-वजाबाकी केल्यातला प्रकार आहे. तो तर प्राण्याचा देहही म्हणजे एखादं किरकोळ आठ आकड्यांचं साधं यंत्रही करील ! माणसाचा देह म्हणजे विश्वाचं कोडं उलगडू शकणारं, भगवंताची प्राप्ती करून घेऊ शकणारं अजोड महायंत्र ! या अर्थानं नरदेहाचं महत्त्व ओळखणारे आणि तो वापरणारे, आयुष्याचं मोल ओळखणारे आणि ते आयुष्य कारणी लावणारे थोडेच नाही का? मुळात त्या वस्तूची किंमतच न ओळखल्यानं ती कशीही, कुठंही टाकावी तसा नरदेह कशाही कामी वापरणारे जास्त. हे मानवी आयुष्य कसंही, कुठंही दवडणारे जास्त.

म्हणून ही आयुष्याचं मोल ओळखण्याची सूचना सुरुवातीलाच येते आहे. ही किती दुर्लभ चीज आपल्या वाट्याला आली आहे, हे प्रथमच कळावं. त्यावर विचार व्हावा. तोही असा की, अरे इतकी दुर्मीळ, अमोल वस्तू आपण कोणते कष्ट करून मिळवली ? किती पैसा, मोल मोजून मिळवली ? तर या जन्मी तरी काही असा हिशेब लागत नाही. काही न देताच ही वस्तू निसर्गानं, भगवंतानं आपल्याला दिली. एकच असू शकेल, या दृष्टीनं की, आपली खरंच काही पूर्वजन्मीची पुण्याई असावी. त्याशिवाय दुसरं पटण्यासारखं कारणच नाही देता येत.

ते पटत नसेल तर निदान ओळखून असावं की, अत्यंत दुर्लभ गोष्ट आपल्याला स्वस्तात नव्हे, फुकटच मिळाली आहे. तेवढं तरी भगवंताशी कृतज्ञ असावं. निदान त्यालाच 'तू कोण' म्हणून विचारण्याचा कृतघ्नपणा करू नये!

निदान दोन गोष्टी करता येण्यासारख्या आहेत आणि हे सारं पटलं तर त्या योग्यही वाटतील. त्या अशा, की एकतर हे आयुष्य अगदी जपून वापरावं. जसा एखादा गरीब माणूस पैसा खर्च करील तसं. कारण ही वस्तू दुर्लभही आहे अन् फार मर्यादितही आहे. आयुष्य किती आहे माहीत नाही. आज संध्याकाळी जावं लागेल की दहा वर्षांनी! पण कितीही असलं तरी मर्यादितच. एखादा सत्तर वर्षं जगेल एखादा ऐंशी, पण मर्यादा आहे हे नक्की !

दुसरी गोष्ट करण्याजोगी ही आहे की, हे आयुष्य आणि ते जगायला मानवी देह देणाऱ्याची ओळख करून घ्यायला काही काळ तरी आपलं आयुष्य खर्ची करावं. साध्या व्यवहारातसुद्धा आई-वडील मुलाला जन्म देतात, बालपणी वाढवतात, काळजी घेतात तर मोठेपणी त्यानं त्यांची ओळख ठेवावी, त्यांच्यासाठी त्याला जे करता येईल ते करावं, अशी अपेक्षा आपण ठेवतो. तसं करणं अगदी उचित आणि रास्त समजतो. इथं तर आपल्याला मिळालेली देणगी फार मोठी आहे, तर त्या दात्याला ओळखणं, त्याच्यासाठी - त्यानं दिलेल्या आयुष्याचाच - थोडा वेळ देणं, हे तर रास्त आहे. उलट ते आपलं कर्तव्य आहे, यात शंकाच नाही.

ही परमेश्वराची ओळख ठेवणं, त्याच्याबद्दलचं आपलं कर्तव्य पुरं करणं म्हणजेच भक्ती ! म्हणूनच तुकोबा म्हणतात की, 'करा हरिभक्ती!' भगवंताची ओळख ठेवणं ही अगदी पहिलीच पायरी. त्याशिवाय पुढची

वाटचाल नाही, हे खरं. पण ही ओळख ठेवण्यापलीकडं जाणं म्हणजे संबंध ठेवणं ! भक्तीचा अर्थ तोच !

हा संबंध ठेवण्याचे अनेक प्रकार असू शकतील. कुणी कुठल्या मार्गानं ठेवील कुणी कुठल्या! पण एक नक्की की, या संबंध ठेवण्याला प्रापंचिक स्वरूप नाही. प्रपंचातला संबंध - खाण्यापिण्याचा, फिरायला जाण्याचा, वस्त्रप्रावरणं, भेटीगाठी देण्याचा - तसं स्वरूप या संबंधाला नाही. ते करायला जाणं म्हणजे भगवंताला प्रपंचात ओढणं, मग पुढं प्रापंचिक संबंधात ज्या ज्या गोष्टी येतात म्हणजे अपेक्षापूर्ती, अपेक्षाभंग, संबंध सुखाचा पडणं, दु:खाचा ठरणं अशा - त्या त्या गोष्टी वाट्याला येणं. हा संबंधच मुळात वेगळा.

तो फक्त कृतज्ञतेच्या भावाचा आहे. तो भाव जागृत असणं, तो ठेवायला भगवंताचं अखंड स्मरण वा अनुसंधान राखणं हे पुरेसं आहे. पण त्यातही आणखी काही असेल तर 'दास म्हणे रघुनाथाचा गुण घ्यावा !' तसं भगवंताचा गुण घेणं, त्याच्यासारखं होण्यासाठी याच आयुष्यात प्रयत्न करणं. तेच 'नराचा नारायण होणं !' श्री तुकोबा तर तसं आयुष्य जगणाऱ्यांचे मुकुटमणीच !

हा कृतज्ञतेचा भाव टिकवायला तुकोबांनी सोपं साधन सांगितलंच आहे, ते म्हणजे भगवंताचं नाम ! आपली देवदत्त वाचा इतर कामी लावताना निदान या संबंधाचं भान ठेवून ती नामाला वापरावी. त्याचं वाचेलाही वळण राहील, पावित्र्य राहील, भगवंताचं स्मरण टिकवणंही सोपं होईल.

**

४.
अज्ञानाचं विश्व

अज्ञानाची भक्ती इच्छिती संपत्ती । तयाचिये मती बोध कैचा ।।१।।
अज्ञानाची पूजा कामिक भावना । तयाचिया ध्याना देव कैचा ।।२।।
अज्ञानाचे कर्म फळी ठेवी मन । निष्काम साधन तया कैचे ।।३।।
अज्ञानाचे ज्ञान विषयांवरी ध्यान । ब्रह्म सनातन तया कैचे ।।४।।
तुका म्हणे जळो ऐसियांचे तोंड । अज्ञानाचे बंड वाढविती ।।५।।

***

आपल्या खऱ्या अवस्थेची, चुकलेल्या वाटेची जाणीव होणं, त्याबद्दल जागं होणं - ही पहिली पायरी पहिल्या अभंगात पाहिली. मग दुसऱ्यांना सावध करण्याच्या भ्रमात न सापडता आधी आपली अशी स्थिती का आली त्याचा विचार करणं आवश्यक. त्यात प्रामाणिकपणे आपल्या अवगुणांची जाणीव होणं हा भाग किती गरजेचा, हे आपण दुसऱ्या अभंगात पाहिलं. त्या दृष्टीनं कामाचा पहिला भाग म्हणजे आपल्या अनमोल मानवी आयुष्याची खरी जाणीव होणं, मग ते कसं कारणी लावावं ते आपोआपच पुढं येईल, हा तिसरा टप्पाही आपण पाहिला.

आता या अभंगात प्राथमिक अशा विषयांतला, पण अनेकांना कित्येक वर्षं यात राहूनही न उलगडणारा विषय श्री तुकोबांनी घेतला आहे. आयुष्य मोलाचं आहे, ते भगवत्प्राप्तीच्या कारणी लावलं पाहिजे, त्यानुसार आपल्या साऱ्या क्रिया - उदा. कर्म, ज्ञान, भक्ती सारं घडलं पाहिजे, हे लक्षात येतं. म्हणून साधारणत: माणूस आता प्रत्यक्ष कृतीला लागतो. त्याचा उद्देश अर्थातच चांगला आहे. त्याला खरा, शाश्वत

आनंद मिळवायचा आहे. त्यासाठी समजून घेण्याची, कृती करण्याची, शरण जाण्याची, अभ्यास करण्याची त्याची तयारी आहे. हे सारं जरी खरं असलं तरी पुरेसं नाही. नुसतंच माझी वाट चुकली हे लक्षात येणं आणि बरोबर वाट चालायची तयारी ठेवणं हे योग्य मार्गाला लागायला पुरेसं नाही. त्यासाठी इतरही अनेक गोष्टी आवश्यक आहेत. जसा चांगला मार्गदर्शक मिळणं, स्वत:ला योग्य मार्गाचं ज्ञान होणं, तो चालण्याची क्षमता असणं अशा अनेक गोष्टी आवश्यक असतात.

त्यांतलीच एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे बरोबर करायची गोष्ट एकवेळ राहू दे, पण निदान चुकीच्या गोष्टी तरी न करणं, ही आहे. याचं मर्म उघडच आहे की, बरोबर कृती झाली तर मनुष्य पुढं जाईल, हे खरंच. एक वेळ ती न झाली तर निदान माणूस आहे तिथं तरी राहील. पण जर भ्रमाची, चुकीची, गोंधळाची कृती झाली तर एका बाजूला आपण कृती करीत असल्याचा अहंकार आणि ती कृती योग्य नसल्यानं दुसऱ्या बाजूला पुन्हा नुकसान. अनेकदा पूर्वी जिथं होतो, तिथंसुद्धा न राहाता उलट मागं येणं किंवा खाली घसरणंच यामुळं घडेल. म्हणून या अडाणीपणाच्या, भ्रमाच्या कृती टाळणं, हे बरोबर कृती करण्याइतकंच आपल्याला आवश्यक आहे. म्हणून या अभंगात श्री तुकोबांनी आपल्या वरवर पाहाता चांगल्या म्हणून केल्या जाणाऱ्या कृतींबद्दल आपल्याला सावध केलं आहे.

या कृती पूजेसारख्या साधनांच्या आहेत. सर्वसाधारण भक्तीच्या आहेत, भक्ती कोणत्या भूमिकेनं केली जाते त्याबद्दलच्या आहेत, फसव्या ज्ञानमार्गाच्या आहेत. झालं आहे असं की, शुद्ध भक्ती, शुद्ध ज्ञान, शुद्ध कर्म सारं दुर्मीळच झालं आहे. एखादं लौकिकातलं काम करायला जसा एखादा सत्ताधारी माणूस गाठावा, एखादा साहेब गाठावा आणि गळ घालावी तशी अवस्था लोक देवाच्या बाबतीत करतात. ते काम भले

नोकरी मिळवण्याचं असो, गंडांतरं टळावी म्हणून असो किंवा असाध्य आजारातून बरं होण्याचं असो. लौकिकदृष्ट्या डॉक्टर, वैद्य, नोकरी देणारे कुणी मालक-साहेब सगळे प्रकार करून लोक थकतात.

मग त्याचाच एक भाग, एक पर्याय म्हणून कुठलातरी देव, कुठलेतरी बुवा-महाराज यांना साकडं घालतात, त्यांची भक्ती करतात. म्हणजेच एखाद्या डॉक्टरला फी द्यावी तशा इकडं देणगीच्या-अभिषेकाच्या पावत्या फाडतात, त्यांना प्रसन्न करायला, खूष ठेवायला भेटवस्तू देतात. बदल्यात त्यांनी आपली नोकरीची-तब्येतीची-पैशाची अडचण दूर करावी, अशी अपेक्षा धरतात. पुरी झाली तर खूष होतात, न झाली तर बुवा-महाराज बदलतात, एखाद्या डॉक्टरचा गुण न पडला की ते बदलावे तसे!

अशांना श्री तुकोबा म्हणतात, ही भक्ती खरी भक्ती नाही. ही अज्ञानापोटी केली जाणारी भक्ती होय. भक्तानं भगवंताकडून लौकिक संपत्तीची म्हणजेच या इतर साऱ्या लौकिक गोष्टींची अपेक्षा बाळगणं म्हणजे का भक्ती होईल? तो तर प्रपंच-व्यवहार होईल, दहा रुपये द्यावे नि दहा रुपयांची वस्तू न्यावी तसा.

भक्ती ही माणसाला या साऱ्या लौकिक व्यवहारांपलीकडं नेणारी आहे. भक्तीतही प्रेम आहे. प्रेमाचा विषय-भगवंत आहे. तसं ते लौकिक विषयांत, प्रपंचातही आहे. संबंध आहे, प्रेम आहे, प्रेमाचा विषय आहे. पण लौकिकातलं-कुठल्या एखाद्या व्यक्तीबद्दलचं प्रेम असेल तर ते त्याच्याकडून होणाऱ्या कामाचं आहे, कामापुरतं आहे, कामाएवढंच आहे. त्यामुळं काम झालं की ते संपतं.

इथलं प्रेम - भक्तीतलं प्रेम नि:सीम आहे, निरंतर आहे, निरपेक्ष आहे. म्हणूनच ते शुद्ध आहे. अपेक्षेनं, तात्पुरतेपणानं, सीमांनी-मर्यादांनी ते अशुद्ध झालेलं नाही. माझं विठ्ठलावर, रामावर, कृष्णावर, सत्पुरुषांवर,

संतांवर प्रेम आहे, ते शुद्ध आहे आणि म्हणूनच ती भक्ती आहे. ते काय करतात, माझी लौकिक कामं करतात की नाही, मला वेळेला मदत करतात की नाही, माझ्या मनाप्रमाणं वागतात की नाही याच्यावर ते अवलंबून नाही. म्हणूनच ते निरपेक्ष आहे, सतत आहे, नि:सीम आहे. ते तसं आहे म्हणूनच ते मला आनंद, शुद्ध समाधान देऊ शकतं. नसेल तर मी भक्तीच्या, प्रेमाच्या नावाखाली पुन्हा प्रपंचच सुरू करीन, व्यवहारच सुरू करीन. ते होऊ नये म्हणून तुकोबा म्हणतात 'अज्ञानाची भक्ती इच्छिती संपत्ती, तयाचिये मती बोध कैचा !'

जी बाब अज्ञानाच्या भक्तीची तीच बाब अज्ञानाच्या पूजेची, कर्माची, अज्ञानाच्या ज्ञानाची आहे. म्हणून बरोबर कृती नाही जमली, उशीरा जमली तरी चालेल, पण साधनेत, आनंदाच्या प्रवासात निदान चुकीची वाट चालणं तरी नको. म्हणून खऱ्या साधकानं, भक्तानं या बाबतीत सावध राहावं, हे बरं !

**

५.
रोग वाढवणारं औषध

पाहो ग्रंथ तरी आयुष्य नाही हाती । नाही ऐशी मती अर्थ कळे ।।१।।
येईल ते हो या विठोबाच्या नावे । अर्जिले ते भावे जीवे धरू ।।२।।
एकदा अंगासी येईल प्रकार । विचारिता फार युक्ती वाढे ।।३।।
तुका म्हणे आळी करिता गोमटी । मायबाप पोटी येते दया ।।४।।

***

अज्ञानाची भक्ती या अभंगाच्या पार्श्वभूमीत आपण पाहिलं की, काही करायला जाणं हे श्रेष्ठ असलं तरी ते करण्यापूर्वी काही सावधगिरी घेण्याची गरज असते. कारण आपण जे करायला जातो ते चांगलं म्हणूनच करायला जातो. असं असलं तरीही जर ते चुकीचं ठरलं तर 'फट् म्हणता ब्रह्महत्या' व्हावी तशी अवस्था होते. म्हणून तुकोबांनी निदान चुकीच्या गोष्टी करू नका, हा सावधगिरीचा दिलेला सल्ला आपल्याला जसा गेल्या अभंगात उपयोगी पडला, तसा याही अभंगात आणखी एक सल्ला उपयोगी पडण्यासारखा आहे.

अज्ञानामुळं होणाऱ्या चुकीच्या वाटचालीबद्दल सावध राहाणं जसं गरजेचं, तसं चांगल्या मार्गातली, चांगली म्हणून गणली गेलेली साधनं निवडतानासुद्धा सावध राहाणं गरजेचं आहे. त्यांतलंच एक चांगलं म्हणून समजलं जाणारं साधन तुकोबांनी या अभंगात आपल्यासमोर ठेवलं आहे. ते म्हणजे सद्ग्रंथाचं किंवा चांगल्या ग्रंथांच्या अभ्यासाचं साधन.

आपण वर्षानुवर्षं हे ऐकत आलो आहोत की, ज्ञानेश्वरी,

भागवत, दासबोध, गाथा असे अनेक ग्रंथ आपल्याला उपयोगी पडणारे आहेत. साधकानं त्यांचं सतत वाचन, अध्ययन करीत असावं. त्यामुळं त्याला त्याच्या मार्गात मदत होते. पण या चांगल्या मार्गातसुद्धा काही अडथळे आपल्या देहबुद्धीमुळं येतात. याची आपल्याला कल्पना येत नाही. ते कसे असतात याचा थोडा विचार करू.

चांगले ग्रंथ पहावे म्हटलं की, आपल्याला सुचवणारेही अनेक असतात आणि आपल्याला स्वत:लाही अनेक ग्रंथ दिसत असतात. त्यामुळं पार उपनिषदांपासून आजकालच्या एखाद्या सद्ग्रंथापर्यंत सगळंच वाङ्मय आपण वाचावं असं वाटतं. प्रत्येकात कुठं ना कुठं नवीन मुद्दा, नवीन अनुभव असतोच. बरं, उपनिषदांपासून आज अखेर म्हटलं तर वाङ्मयाची यादी इतकी विलक्षण मोठी आहे की, ती यादी नुसती पूर्ण पाहाणं हेसुद्धा कठीण आहे. मग त्याचा अभ्यास दूरच राहो.

त्यातही आपलं मन प्रापंचिक असल्यामुळं, कामाची पद्धती प्रापंचिक असल्यामुळं कुठलाही एक ग्रंथ वाचून आपलं समाधान होत नाही. उलट उरलेलं वाचलं पाहिजे, इतरांनी काय म्हटलं ते पाहिलं पाहिजे, असं मनाला सारखं वाटत राहातं. त्यामुळं सद्ग्रंथाचा अभ्यास एवढं चांगलं व पुरेसं साधन असूनही एक महत्त्वाचा मुद्दा डोळ्यांआड झाल्यानं ते साधन पुरेसं ठरत नाही, उलट असमाधानाला कारण होतं.

तो मुद्दा असा की, हा सगळा अभ्यास करायला लागणारा वेळ हा मुळात मर्यादितही आहे आणि अनिश्चितही आहे. आपल्या वाट्याला किती आयुष्य आहे आणि ते नक्की कधी संपणार याची कुठलीही कल्पना आपल्याला नाही. या महत्त्वाच्या मुद्याचा विसर पडला तर छपन्न ग्रंथ पाहूनही समाधान न पावलेला आणि म्हणून सत्तावन्नावा ग्रंथ अभ्यास करणारा माणूस तो ग्रंथ अपुरा असतानाच राम म्हणतो. नुकसान

दोन्हीकडून होतं. अभ्यास पुरा न झाल्यानं समाधान नाही आणि दुसऱ्या बाजूला छपन्न ग्रंथ वाचल्याचा अभिमानाचा धोंडा मात्र उगीचच गळ्यात अडकला.

दुसऱ्या बाजूला, या सद्ग्रंथांतले शब्द आणि त्याचा अर्थ या दोन्ही गोष्टी नेहमीच्या ग्रंथापेक्षा थोड्या वेगळ्या पातळीवरच्या असतात. लौकिकदृष्ट्या शब्दांना जो अर्थ, जी संगती असते ती तर या ग्रंथांना असतेच, पण या ग्रंथांचा अभ्यास करायला आणखीही एक दृष्टी लागते, जी त्यांतला शब्दार्थाच्या पलीकडचा अभिप्रेत गूढ अर्थ उकलू शकेल. हे ग्रंथ प्रत्यक्ष अनुभवाचे ग्रंथ असतात. अनेकदा त्यांचा अर्थ अनुभवानं कळतो. अनेकदा तो गुरुकृपेनं कळतो. म्हणून चांगल्या ग्रंथांचा अभ्यास हे जरी साधन प्रसिद्ध असलं तरी ते साधन म्हणून उपयोगी पडायला लावणारी वर सांगितली तशी बुद्धिमत्ता प्रत्येकाजवळ असेलच, असं नाही. अभ्यास करायची पद्धत, गूढ उकलण्याची क्षमता प्रत्येकाला परिचित असेल, असंही नाही.

तरीही बरंच वाचन झाल्यावर निर्माण होणारा कळल्याचा भ्रम मात्र प्रत्येकाला होऊ शकतो. त्यातही जे थोडेफार चांगल्या अभ्यासानं पुढं जातील त्यांना जर ते आकलन, तो अभ्यास पचवता आला नाही तर फुकटच अहंकार पदरी पडेल आणि ग्रंथांच्या अभ्यासाच्या साधनानं मुक्त व्हायच्याऐवजी तर्कवितर्क आणि फोल शहाणपणानं बद्धच व्हायची वेळ येईल. म्हणून तुकोबा म्हणतात, 'पाहो ग्रंथ तरी आयुष्य नाही हाती। नाही ऐशी मती अर्थ कळे' हे ग्रंथांच्या अभ्यासाच्या साधनालाच लागू न होता, अशा तऱ्हेच्या इतर साधनाच्या बाबतीतही लागू होईल आणि त्या त्या बाबतीतलं शहाणपण, विद्वत्ता, अनुभव, श्रेष्ठत्व, अंगाशी येईल. 'एखादा अंगाशी येईल प्रकार । विचारिता फार युक्ती वाढे !'

म्हणून सावध भक्तानं काय करावं ? एक तर अनेक ग्रंथांच्या नादाला लागू नये. एकच ग्रंथ घ्यावा. तो श्रद्धेनं आणि खोल अभ्यासायचा प्रयत्न करावा. त्यातही तो माझ्या बुद्धीनं मी समजून घेईन अशा भ्रमात राहू नये. 'येईल ते हो या विठोबाच्या नावे' अशा तऱ्हेनं नामाची कास धरून, श्रद्धेनं, त्यांच्या कृपेनं तो ग्रंथ समजून येईल अशा वृत्तीनं - ते साधन करावं. म्हणजे वरचे सारे धोके टाळून त्याला हे साधन उपयोगाला येईल. हे साधन करतानासुद्धा बुद्धीपेक्षा भावाची मदत अधिक होईल. 'अर्जिले ते भावे जीवे धरू' हे लक्षात असावं.

आणि शेवटी श्री तुकोबांनी म्हटल्याप्रमाणं हे साधनसुद्धा सावधगिरीनं करायचं म्हणजे अहंभावानं करण्याऐवजी 'आळी करिता गोमटी । मायबाप पोटी येते दया' हे लक्षात ठेवून म्हणजेच शरणागत बुद्धीनं करावं, तर ते आपल्याला फायद्याचं ठरेल आणि धोकेही टळतील.

**

६.
देहाचा विसर

देवा आता ऐसा करी उपकार । देहाचा विसर पाडी मज ।।१।।
तरीच हा जीव सुख पावे माझा । बरे केशीराजा कळो आले ।।२।।
ठाव देई चित्ता राखे पायापाशी । सकळ वृत्तीसी अखंडित ।।३।।
आस,भय,चिंता,लाज,काम,क्रोध । तोडावा संबंध यांचा माझा ।।४।।
मागणे ते एक हेचि आहे आता । नाम मुखी संत संग देई ।।५।।
तुका म्हणे नको वरपंग देवा । घेई माझी सेवा भावशुद्ध ।।६।।

***

थोड्या सावधगिरीच्या सूचना चौथ्या, पाचव्या अभंगात पाहिल्यावर या सहाव्या अभंगात श्री तुकोबांच्या शब्दांतून आपल्या खऱ्या वाटचालीवर नेमका आणि महत्त्वाचा असा प्रकाश पडलेला आपल्याला दिसेल. त्या अर्थानं हा अभंग हा आत्ताच नव्हे तर पुढंही सतत आपल्याला उपयोगी पडणारा व निकडीचा असाच आहे.

माणूस कुणाहीकडं काही मागतो, तेव्हा काय काय घडतं, ते प्रथम पाहू. दुसऱ्याकडं आपण एखादी वस्तू मागायला जाऊ तेव्हा एक तर, आपल्याकडं ती वस्तू नसते. ती वस्तू किंवा ती गोष्ट आपल्याला गरजेची वाटते. तिच्यामुळं आपलं ईप्सित साध्य होईल, असं आपल्याला वाटतं. शिवाय ज्याच्याकडं आपण ती वस्तू मागतो त्याच्याकडं ती आहे आणि ती तो आपल्याला देऊ शकेल, अशी आपली खात्री असते.

उदाहरणार्थ, आपण ज्या गोष्टीच्या विवंचनेत नेहमी असतो तो 'पैसा' घ्या. तो ज्या वेळी आपण दुसऱ्याकडं मागतो, तेव्हा आपल्याकडं

तो नसतो किंवा कमी असतो. तो जर मिळाला, तर आपलं ईप्सित, म्हणजे - उदाहरणार्थ घर, शिक्षण, लग्नकार्य अशा काही गोष्टी - आपण साध्य करू शकू, असं आपल्याला वाटतं, नव्हे आपली तशी खात्रीच असते.

ज्याच्याकडं मागतो त्याच्याकडं तो 'पैसा' भरपूर आहे, मग तो माणूस, आपला नातेवाईक असो, कुणी धनको असो किंवा देव असो, त्याच्याकडं तो भरपूर असतो आणि तो पैसा तो आपल्याला देऊ शकतो असं आपल्याला खात्रीनं वाटतं म्हणूनच आपण त्याच्याकडंच मागतो.

म्हणजे आपल्या लक्षात येईल की, आपल्याला एखादी गोष्ट उपयोगाला पडणार याची खात्री झाली नि आपल्याकडं ती नाही याची खात्री झाली, तर पुढं हा मागण्याचा वगैरे प्रश्न पडेल. एखाद्याला काही आजार असेल आणि जर औषधाला पैसा नसेल तर तो पैसा मागून आणील. त्यानं औषध घेईल, मग रोग दूर होईल. मग त्याला बरं वाटेल. आरोग्य लाभलं की सुखाचं होईल. हे अशातून आलं आहे की, आरोग्य चांगलं असलं की, माणसाला सुखाचं होतं, हा माणसाचा अनुभव आहे. तसा अनुभव असेल तोच माणूस आरोग्य किंवा त्यासाठी मग पैसा मागू जाईल.

पण प्रत्यक्षात नि:पक्षपातीपणे आणि प्रामाणिकपणे पाहिलं तर असं सुख नेमकं कशात आहे, हा प्रपंचाचा अनुभव मोठा अनिश्चित आहे. अनुभव निर्णायक नाही. आरोग्य उत्तम असूनही दु:खी असलेले, सत्ता असूनही दु:खी असलेले, मुलंबाळं असून, घरंदारं असून, नोकरीचाकरी असून, उत्तम धंदा असून दु:खी असलेले लोक कितीतरी दिसतात. म्हणजे यातलं नेमकं काय मिळालं म्हणजे मनुष्य सुखी होतो, हे सांगणं मोठं कठीण.

तोच अनुभव सर्वांत महत्त्वाच्या असलेल्या 'पैशा'चा. तो भरपूर असलेली माणसं पूर्ण सुखी असावीत, तर तसंही दिसत नाही. एवंच, प्रपंचाचा अनुभव शिकवतो त्याप्रमाणं वागायचं ठरवलं, तर माणसाच्या दु:खाचं कारण माणसाला असलेली देहाची, देहाच्या सुखाची सतत लागलेली ओढ अन् जाणीव - त्याची देहबुद्धी - हीच त्याच्या दु:खाचं खरं कारण दिसते. सतत चित्ताला वाटणारी भीती, चिंता, कामक्रोधादि विकार अशा गोष्टीच अंतिमत: त्याच्या दु:खाला कारणीभूत होतात, असा अनुभव येईल.

हा अनुभव पाहिला, तर जी आत्मबुद्धी आपल्याकडं नाही, ती मागितली, ती मिळवली तर हे सारं सुखाचं होईल - हा श्री तुकोबांचा या अभंगातील विचार खरोखर सरळ आणि अनुभवनिष्ठ म्हणावा लागेल. म्हणून ते भगवंताला एक उपकार करायची विनंती इथं मोठ्या तळमळीनं करतात. ती म्हणजे 'देहाचा मला विसर पडू द्या'.

अर्थातच इथं 'देहाचा विसर' म्हणजे शब्दश: 'देहा'चा विसर नसून सतत माझ्या देहसुखाला धरूनच जो मला विचार करायची सवय लागली आहे 'त्या' 'विचारा'चा विसर, 'मी'चा विसर, 'देहबुद्धी'चा विसर - असं अभिप्रेत आहे, हे उघडच आहे. माझं सुख या 'मी'ला विसरण्यात 'देहबुद्धी' विसरण्यात आहे, हे मला कळलं हे मोठं भाग्याचं आहे, असं मला वाटतं, असं श्री तुकोबा म्हणतात. तेही लक्षात घेण्यासारखं आहे, कारण अनेकदा स्वत:ची, 'मी'ची काळजी घेण्यातच जन्म जातो. आपली अशी ठाम समजूत असते की,'मी'ला सुखाचं झालं की ते सारं सुखाचं होईल, ते सुख सतत टिकेल, मग आपण सतत आनंदात राहू. पण दुर्दैवानं अनुभव वेगळा येतो ना!

केवळ आपल्या सुखाचं सर्व व्हावं म्हणणं म्हणजे सर्व जगानं

आपल्यासाठी, आपल्या मनाप्रमाणं सतत वागावं असं म्हणण्यासारखंच आहे. जे तत्त्वत:सुद्धा अशक्य आहे, व्यवहारात तर आहेच आहे. मग कधी कधी मनासारखं होतंही, ते तसं झालं की सुख, एरवी सारा काळ दु:ख, असा अनुभव येतो, हे खरं आहे ना? मग त्या अनुभवाचा प्रामाणिकपणे विचार केला तर मूळ 'मी'च नाहीसा करण्यात शाश्वत सुखाची गुरुकिल्ली का आहे, ते कळणं कठीण नाही. मग हे कळल्यानं 'बरे केशीराजा कळो आले' असं तुकोबांना का म्हणावंसं वाटतं, हेही कळणं कठीण नाही.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणं अशी आत्मबुद्धी ज्याच्याकडून येते त्या भगवंताकडं ती मागणं योग्य. त्यातही अशी बुद्धी यायला, टिकायला उपयोगी असलेलं भगवंताचं नाम तेही त्याच्याकडं मागणं योग्य आणि त्या साऱ्याला पूरक असा मोलाचा 'संतसंग' तोही मागणं उचित व गरजेचं. तेच श्री तुकोबा या अभंगात मागतात.

वाटचालीच्या दृष्टीनं आपल्याला आपल्या देहाकडं, देहसुखाकडं पाहायला शिकवणारा अभंग अत्यंत मोलाचा आहे. कारण ती दृष्टी न आली तर परमार्थातसुद्धा माणूस परमार्थ देहसुखाचा कसा होईल ते पाहील, अन् पुन्हा फसेल. म्हणून मनाला हा अभंग वरचेवर लागेल असाच आहे.

**

७.
जन्माचं मूळ

जन्माचे ते मूळ पाहिले शोधून । दुःखासी कारण जन्म घ्यावा ।।१।।
पापपुण्य करुनी जन्मा येतो प्राणी । नरदेहा येउनी हानी केली ।।२।।
रजतमसत्त्व आहे ज्याचे अंगी । याच गुणे जगी वाया गेला ।।३।।
तम म्हणजे काय नरकचि केवळ । रज तो सबळ मायाजाळ ।।४।।
तुका म्हणे येथे सत्त्वाचे सामर्थ्य । करावा परमार्थ अहर्निशी ।।५।।

***

सहाव्या अभंगात एक महत्त्वाची अडचण पुढं आली - ती देह आणि देहबुद्धीच्या बाबतीतली होती. पुढच्या वाटचालीच्या दृष्टीनं अत्यंत मोलाचा असा हा 'देहा'चा प्रश्न तसा मूलभूतच आहे. तो सुटला तर पुढची वाटचाल कितीतरी सोपी होईल, हे वेगळं सांगायला नकोच.

अशाच दृष्टीनं पाहिलं, तर आपण आपल्या आनंदाच्या मूळ स्थितीपासून इतके दूर का आलो याच्या मुळाशी जाता जाता देह आणि देहबुद्धी हा एक मूलभूत प्रश्न हाती लागतो. तो म्हणजे आपल्याला लाभलेला नरजन्म. त्यातही नरजन्म म्हणण्यापेक्षा जन्मच. तो घ्यावा लागल्यानंच हे पुढचे 'देह' वगैर प्रश्न निर्माण होतात, हे उघडच आहे. म्हणून पुढं जाण्यापूर्वी या प्रश्नाचाही उलगडा करून पुढं जाणं इष्ट ठरतं.

हा उलगडा होण्यासाठी या प्रश्नाची थोडी पार्श्वभूमी पाहाणं आवश्यक आहे. अगदी विज्ञानाच्या दृष्टीनं पाहिलं तरी जगामध्ये जे अबाधित नियम काम करताना दिसतात त्यांतला एक महत्त्वाचा नियम म्हणजे सृष्टीत सर्वत्र आढळणारा कार्यकारण भाव. जगामध्ये कोणतीही

गोष्ट घडलेली दिसते तिच्यामागं निश्चित अशी काही कारणं असतात, असं आढळून येतं. विशिष्ट कारणामुळं एखादं विशिष्ट कार्य, मग ते पुढच्या कार्याचं कारण, ते त्याच्या पुढल्या, अशा तऱ्हेची कार्यकारण भावाची एक साखळी या जगामध्ये अनंत प्रकारांनी कार्यरत असलेली दिसेल. जसं ढगांमुळं पाऊस, पावसामुळं पाणी, पाण्यामुळं वाफ, वाफेमुळं ढग आणि पुन्हा ढगांमुळं पाऊस. अर्थात 'एका कारणामुळं एक कार्य' इतकं सोपं स्वरूप या कार्यकारणभावात क्वचितच असतं.

उदाहरणार्थ - गाडीला अपघात होतो तेव्हा गाडीचे ब्रेक न लागणं, ड्रायव्हरची मन:स्थिती ठीक नसणं, रस्त्यात अचानक अडथळा निर्माण होणं, दुसऱ्या जवळच्या वाहनाकडून चूक होणं, अशा तऱ्हेची कितीही कारणं एकटी किंवा एकत्रितपणे कार्य घडवू शकतात. मुलाला परीक्षेत मार्क कमी पडण्याचं कारण नुसतंच त्याचा अभ्यास कमी एवढंच सरळ नसतं तर योग्य मार्गदर्शनाचा अभाव, प्रकृतीच्या तक्रारी, अनपेक्षित प्रश्न परीक्षेत येणं ही किंवा अशा स्वरूपाची कितीही कारणं असू शकतात. पण एक नक्की असतं की, विशिष्ट कारण असल्याशिवाय कार्य घडत नाही आणि कुठल्याही घटनेचा किंवा कारणाचा परिणाम म्हणून काही ना काही कार्य हे घडतंच.

या दृष्टीनं माणसाच्या आयुष्यातल्या घटनांकडं आणि त्यात आयुष्यभर केलेल्या कर्मांकडं पाहिलं की, कर्माचा परिणाम म्हणून काही ना काही स्वरूपात कार्य असणारच किंवा परिणाम असणारच. तसं त्याच्या आयुष्यात दिसणाऱ्या प्रत्येक गोष्टीला किंवा घटनेला एक किंवा अनेक कारणं ही असणारच. जसं एखाद्याचं आर्थिक दारिद्र्य घ्या. ती जरी कितीही नको असणारी गोष्ट असली, तो त्याबद्दल कितीही रडत असला आणि कोणालाही नावं ठेवीत असला तरी त्या दारिद्र्याला त्याचे अयोग्य

प्रयत्न, वेळी प्रयत्नांचा अभाव, बाजारातल्या उलाढाली, अपुरं भांडवल अशा तऱ्हेची काहीही कारणं असू शकतात. तीच अवस्था अधिक मोठ्या पातळीवर पाहिली तर माणसाच्या जन्माची आहे.

माणसाचा जन्म येण्यालासुद्धा काही कारण हे असलंच पाहिजे आणि तसं पाहिलं तर मुळात जन्म येण्यालाच काही कारण असलं पाहिजे. ते हुडकण्यापूर्वी एक गोष्ट जाता जाता लक्षात ठेवावी लागेल की, कारणं अनेक असतील, पण सगळीच कारणं आपल्याला माहीत असतील असं नाही. व्यवहारात जसं एखाद्या गोष्टीची सर्व काही कारणं आपल्याला लगेच समजतात, असं नाही. परंतु काही काळानं आपल्याला ती स्पष्ट होतात. तसंच या कार्यकारणभावाच्या बाबतीतही होतं.

आपण चालू जन्मातल्या कर्माविषयी क्षणभर विचार करू. आपण आयुष्यभर करतो ती कर्मं अनेक स्वरूपाची असतात. ढोबळमानानं ती कर्मं चांगली-वाईट अशी असू शकतात. असं म्हणण्याचं कारण असं की, एकाच्या दृष्टीनं चांगली तर दुसऱ्याच्या दृष्टीनं वाईट असेही प्रकार त्यात असतात. अशा प्रत्येक कर्माचा काही ना काही परिणाम असणारच. तो या नियमाप्रमाणं माझा मलाच भोगावा लागतो. आपल्याला हे सहज आढळेल की, या सर्व कर्मांचा परिणाम याच जन्मात भोगून संपवणं ही गोष्ट अवघड आहे. म्हणून माणसाला त्याची अशी कर्मं पुन्हा जन्म घ्यायला लावतात, हे पटण्यासारखं आहे.

हीच गोष्ट आजच्या आपल्या जन्म घेण्यालाही लागू आहे. चांगल्या-वाईट कर्मांचा परिणाम म्हणजे पाप-पुण्य होय. ते भोगायचं शिल्लक राहातं आणि म्हणून माणसाला हा जन्म घ्यावा लागतो. दुर्दैवानं माणसाच्या हे सारं लक्षात न आल्यानं, तो मागले भोग भोगून संपवता संपवताच या जन्मी पुन्हा बेसावधपणे कर्मं करून नवे परिणाम, नवा

भोग गोळा करतो. म्हणून ही जन्म-मरणाची साखळी पुन्हा तशीच सुरू राहते.

याला उपाय सुचवताना श्री तुकोबा म्हणतात की, मागले भोग भोगणं तर अटळ आहे, पण नवे निर्माण होऊ नयेत म्हणून आत्ताची कर्मं करताना माणसाला ती सावधगिरीनं करता येणं शक्य आहे. म्हणजेच ती रज आणि तम टाळून केवळ सात्त्विकच करावीत. त्यातही ती पारमार्थिक म्हणजेच विशुद्ध सात्त्विक करावीत. म्हणजे या परिणामाच्या कचाट्यातून माणूस सुटू शकतो आणि मुक्तही होऊ शकतो.

म्हणून श्री तुकोबांचं म्हणणं लक्षात ठेवण्यासारखं आहे की, 'तुका म्हणे येथे सत्त्वाचे सामर्थ्य । करावा परमार्थ अहर्निशी !'

**

८.
स्वहिताची कृती

अन्नाच्या परिमळे जरी जाय भूक । तरी का हे पाक घरोघरी ।।१।।
आपुलाले तुम्ही करा रे स्वहित । वाचे स्मरा नित्य राम राम ।।२।।
देखोनी जीवन जरी जाय तान्ह । तरी का साठवण घरोघरी ।।३।।
देखोनिया छाया सुख न पाविजे । जव न बैसिजे तया तळी ।।४।।
हित तरी होय गाता आइकता । जरी राहे चित्ता दृढ भाव ।।५।।
तुका म्हणे होसी भावेचि तू मुक्त । काय करिशी युक्त जाणिवेची ।।६।।

***

मनुष्य एकदा जागा झाला, त्याला त्याचं ध्येय कळलं, बरोबर -चूक मार्ग कळले, धोके कळले की काम संपत नाही. नेमकं काय करायचं नि ते कसं करायचं याविषयी त्याचे घोटाळे हे सतत होत राहातात. त्यातूनच अनेकदा दिशाभूल होते, नुकसान होतं. म्हणून आपल्याला श्री तुकोबांकडून सारख्या सूचना मिळत राहातात. त्यांतल्या दोन-तीन मोलाच्या सूचना या आठव्या अभंगात आहेत.

माणसाला तहान लागली तर त्यानं पाणी पिणं, भूक लागली तर अन्न खाणं, हे तसं स्वाभाविक आहे. हे कुणाला सांगण्याची गरजही वाटणार नाही की बाबा तुला भूक लागली असली तर तुला स्वत:लाच काही अन्न खावं लागेल तरच तुझं पोट भरेल अन् भूक शमेल. पण परमार्थात मात्र ते सांगावं लागतं. कारण तिथं हीच परिस्थिती येऊनही मनुष्य थोडा वेगळाच व्यवहार करताना दिसतो. तो कसा ते पाहू.

पारमार्थिक साधन म्हणून म्हणा, देवाच्या प्राप्तीसाठी म्हणून

म्हणा, माणूस तीर्थयात्रा, भजनपूजन करतो. यात्रेला जातो तिथं वातावरण पवित्र असतं, चांगल्या मन:स्थितीत वेळ जातो. तीच गोष्ट देवळात जाण्याची. माणूस चांगल्या चांगल्या देवळात जातो. तिथं वातावरण प्रसन्न असतं, मनही प्रसन्न होतं, शांत होतं. खूप काही साधन केल्याच्या आनंदात माणूस घरी परततो.

घरी पुन्हा नेहमीचा व्यवहार सुरू होतो. आसक्ती, स्वार्थ, हेवेदावे - ज्या ज्या प्रकारची ठेवण प्रपंचाची असेल तशा व्यवहारात मनुष्य गुरफटतो. पुन्हा मन अशांत होतं, अस्वस्थ होतं, मलिन होतं. देव-दर्शनानं तात्पुरतं मिळालेलं समाधान कधीच गायब होतं. एकमेकांविषयी कटुता, भीती, असूया - असंख्य मार्गानं मन पुन्हा पुन्हा जात राहातं. परिणाम उघडच असतो.

मग एका बाजूला त्याला वाटतं मी दर रविवारी, दर गुरुवारी देवाला जातो, जाताना हार, पेढे, खडीसाखर नेतो, देवापुढं शक्य तेवढी पैसासुपारी ठेवतो, हे सारं न चुकता वर्षानुवर्षं करतो. पण मला समाधान नाही, प्रपंचात सुख नाही, देवादरबारी न्याय नाही वगैरे वगैरे. तीच गोष्ट चारधाम यात्रा, मोठमोठे यज्ञ, अनुष्ठानं, वार्षिक सण, व्रतं, उत्सव करणाऱ्यांची असते.

पण तसं पाहिलं तर हे कसं होतं की, एखाद्याला भूक लागली म्हणून एखाद्या अन्नछत्रात त्याला नुसतं नेऊन आणावं. सुग्रास अन्नाचा सुगंध त्याला देऊन तसंच घरी आणावं किंवा खूप तहानलेल्याला एखाद्या गोड्या पाण्याचा भरपूर साठा असलेल्या सरोवराचं दर्शन घडवून आणावं, तसं हे आहे. त्यानं ना भूक भागत ना तहान भागत. अशा तीर्थात, देवळात खूप उपासना असते, नि:स्वार्थीपण असतं, अन्नदान असतं, सतत देवाचं स्मरण जागं ठेवलेलं असतं - ते पाहिल्यावर बरंही वाटतं.

पण ते बरं वाटणं तिथल्या वातावरणाचा परिणाम असतो. तिथून परतलं की आपलं 'ये रे माझ्या मागल्या' सुरू होतं.

याला कारण श्री तुकोबा या अभंगात सुचवतात त्याप्रमाणं अन्नाचा असा नुसता वास घेऊन जर पोट भरत असतं तर घरोघरी स्वयंपाक करण्याची काही गरज राहिली असती का? सगळ्या खानावळीत एक चक्कर टाकून आलं तरी काम झालं असतं. तसं ते होत नाही नि तसं व्हावं असंही कुणी म्हणत नाही. फरक एवढा की, परमार्थात मात्र तसं व्हावं असं आपल्याला नकळत म्हणा, पण वाटत असतं.

कारण आपण तशा अपेक्षेनं वागताना दिसतो. गुरूनं भगवंताचं स्मरण ठेवावं, त्यानं सतत साधनेत असावं, त्यानं पवित्र राहावं, त्यानं मन जिंकावं, त्यांन सर्वांशी भगवद्भावानं वागावं - मी मात्र यांतलं काही न करता फक्त गुरूचं दर्शन घेऊन येणार, फार झालं तर त्याच्यापुढं पैसासुपारी ठेवणार, अन् आहे तसा राहून प्रपंच करणार आणि मला मात्र गुरूसारखंच समाधान, आनंद, भगवंत मिळावा!

हे म्हणजे वासानं भूक भागवण्याची अपेक्षा ठेवण्यासारखं नाही का? तीच गोष्ट तीर्थाची नि देवळांची आहे. तिथं भले सगळं उत्तम असेल, जपलं जात असेल, पण तिथं नुसतं जाऊन आल्यानं माझ्या घरी मला ते कसं लाभेल ? त्यासाठी त्यांनी तिथं जे जे सांगितलं, जे जे करून दाखवलं, ते ते मला माझ्या घरी जर करता आलं, तर मलाही भगवंत भेटेल, आनंद मिळेल, असं म्हणणं सयुक्तिक होईल, नाही का ?

तीर्थाच्या ठिकाणी काही एक वातावरण असतं, गुरूच्या ठिकाणी काही एक वातावरण असतं. उदाहरणार्थ, ते नि:स्वार्थी आहेत, प्रेमळ आहेत, निरपेक्ष आहेत, सतत देवाच्या स्मरणात आहेत, ज्ञानी आहेत - अशा अनेक गोष्टी तिथं दिसतात. त्या पाहायला मिळाव्या, शिकायला

मिळाव्या, म्हणून तिथं अवश्य जावं. पण जर त्यांना जे मिळालं - तृप्ती-समाधान-आनंद-शांती - यांतलं जर आपल्याला काही हवं असेल तर त्यांनी जो स्वाहिताचा प्रत्यक्ष उद्योग केला - म्हणजे ज्ञानाची साधना असेल, अनुसंधान असेल, सोप्यात सोपं म्हणजे नामस्मरण असेल तर ते आपण स्वत: आपल्या जागी घरी करणं हे गरजेचं आहे.

हे कळलं तर आपली जी ऊठसूठ यात्रा, दर्शनं करण्याची गडबड चालली आहे, ती थांबेल आणि आपण आपल्या घरी प्रत्यक्ष खऱ्या कामाला लागू. म्हणजेच आपल्या आपल्या कुटुंबात, व्यवहारात आपण नि:स्वार्थी राहायचा प्रयत्न करू, अहंकार सोडायचा प्रयत्न करू, सतत नामात राहण्याचा प्रयत्न करू.

या साऱ्यातसुद्धा आपली आपल्या श्रद्धास्थानावरची, उपास्य दैवतावरची, चांगल्या उदात्त ध्येयांवरची जी निष्ठा-जो दृढ भाव असेल तो हे करताना अविचल राहिला तर तो फार उपयोगाला येईल. कारण हा आनंद मिळवणं हे काम बुद्धी नि तर्कापेक्षा जास्त भावनेचं आहे.

तुकोबा म्हणतात तसं 'तुका म्हणे होसी भावेचि तू मुक्त'. वर सांगितलं तसं स्वत:च्या घरी स्वत: स्वयंपाक करण्याचे नि पाणी भरण्याचे प्रयत्न स्वत:ची तहानभूक भागवायला खरे उपयोगी ठरतात, तशी स्वत:ची साधनाच स्वत:ला अनुभव यायला उपयोगी ठरते. पण जर कुठं त्या प्रयत्नात-शक्तीत कमी पडलं तर निदान हा दृढ भाव तरी ते भरून काढील. म्हणून स्वत:चे योग्य प्रयत्न आणि शुद्ध भाव या दोनही गोष्टी या अभंगात शिकण्यासारख्या आहेत.

**

९.
खरी तीर्थयात्रा

जाऊनिया तीर्था तुवा काय केले । चर्म प्रक्षाळिले वरी वरी ।।१।।
अंतरीचे शुद्ध कासयाचे झाले । भूषण त्वा केले आपणया ।।२।।
वृंदावन फळ घोळिले साकरा । भीतरील थारा मोडेचिना ।।३।।
तुका म्हणे नाही शांतिक्षमादया । तोवरी कासया फुंदा तुम्ही ।।४।।

***

माणसाचा स्वभाव असा आहे की, गोष्टी नेहमीच्याच झाल्या की त्याकडं त्याचं हळूहळू दुर्लक्ष होतं. मग ती प्रपंचातली कामं असोत किंवा परमार्थातली कर्मं असोत. प्रपंचातल्या कामात जसं, ते काम नेहमी केल्यानं त्याची एक पद्धत बनून जाते आणि पुढंपुढं त्याच्याकडं विशेष लक्ष न देता ते सहजपणानं घडतं, एखादी प्रतिक्षिप्त क्रिया करावी तसं! ऑफिसमधून येतायेता विशिष्ट ठिकाणाहून भाजी आणण्याचं काम बराच काळ केलं की, काही दिवसांनी अजिबात लक्ष नसलं तरी पावलं मंडईकडं किंवा दुकानाकडं वळतात. अर्थात यात फारसं नुकसान नाही, कारण कामही तितकंच यांत्रिक असतं.

पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट ही आहे की, अशाच पद्धतीनं मंडईतून बाहेर आल्यावर कोपऱ्यावरच्या देवाला नमस्कार करून मग पुढं रिक्शात बसणारा माणूस जितक्या नकळत आणि यांत्रिकपणानं, मंडई 'उरकून' पुढं जातो, तितक्याच यांत्रिकपणानं तो देवाचा नमस्कारसुद्धा 'उरकून' पुढं जातो. स्वाभाविकपणे त्याच्यावर त्या देवाचा, त्या नमस्काराचा, त्यामुळं आलेल्या देवाच्या संबंधाचा कोणताही ठसा उमटत

नाही आणि याचं त्याला काही वाटतही नाही. ही मात्र विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

भाजी घेताना ती क्रिया सहज झाल्यानं उलट एकप्रकारे सोपं झालं. कारण दुकानं ठरलेली, प्रकार ठरलेले, घासाघीस ठरलेली, नफा-तोटा ठरलेला. असं असल्यानं ते सवयीचं आणि नकळत होऊन उलट त्यावर जाणारी शक्ती आणि वेळ यांची बचतच होते. पण दुर्दैवानं हेच जेव्हा पारमार्थिक कामाच्या बाबतीत घडतं तेव्हा मात्र असा कुठला 'बचत' वगैरे फायदा न होता उलट तोटा होतो, याकडं आपलं लक्ष क्वचितच जातं.

याचं कारण असं की, प्रापंचिक काम आणि पारमार्थिक काम यांमध्ये मुळातच फरक आहे. ज्या पद्धतीनं भाजी आणतो, त्या पद्धतीनं देवाला जाऊन चालत नाही. कारण भाजी आणण्याचा संबंध बाह्य व्यवहाराशी आहे, तर देवाला जाण्याचा संबंध अंतर्व्यवहाराशी म्हणजे मनाशी आहे. देवाला जाण्यात जरी वरवर पाहाता क्रिया शरीरानं एका विशिष्ट ठिकाणी जाऊन येण्याची असली तरी तिच्यात त्यानिमित्तानं होणाऱ्या परमेश्वराच्या भेटीचं महत्त्व आहे. शुद्धत्वाचा स्पर्श आहे, पावित्र्याचा संग आहे. मनाला आलेली मरगळ, नैराश्य हे दूर करण्याचा तो एक मार्ग आहे. मनाला पुन्हा ताजंतवानं आणि प्रसन्न करून त्याचं उन्मन करण्याची ती एक संधी आहे.

आता या अर्थानं जर आपल्या पारमार्थिक कामांकडं पाहिलं तर काय होतं, याचा तीर्थयात्रेच्या एका उदाहरणाच्या निमित्तानं श्री तुकोबांनी या अभंगात विचार केलेला दिसेल. म्हणून ते प्रापंचिक काम केल्यासारखी तीर्थयात्रा करणाऱ्यांना सरळ विचारतात 'जाऊनिया तीर्था तुवा काय केले?' हे विचारण्याची वेळ त्यांच्यावर का आली असेल हे आपल्याला

विचारात घ्यावं लागेल. त्यात मुख्य विचार करण्यासारखं कारण हे की, म्हैसूर, बेंगलोर, उटी, महाबळेश्वर आणि काशी, रामेश्वर, अयोध्या, पुरी यांत प्रापंचिकाला फरक वाटतच नाही. ज्या पद्धतीनं तो ते पुरं करून मोकळा होतो त्याच पद्धतीनं तो हेही पुरं करून मोकळा होतो.

किंबहुना मोकळा होतच नाही. मोकळा झाला असता तरी एक वेळ बरं झालं असतं. उलट अशा यात्रा करून झाल्यावर ते 'देवाचं काम' 'परमार्थाचं काम' असल्यानं त्याचं त्याला महत्त्व वाटून तो ते चार जणांना सांगत सुटतो. अगदी विषय नाही निघाला तर विषय काढून सांगत सुटेल. न भेटणाऱ्याला भेटून नि न थांबणाऱ्याला थांबवून सांगेल. त्याचंच एक भूषण होऊन बसेल.

म्हणून श्री तुकोबा सांगतात 'अंतरीचे शुद्ध कासयाचे झाले । भूषण त्वा केले आपणया'. यात्रा करून अंतरंगात बदल होऊन ते शुद्ध, सात्त्विक, निरहंकार होण्याऐवजी या यात्रा केल्याच्या अहंकारानं ते अंतरंग, ते मन पूर्वीपेक्षा आणखीच दूषित होईल, अशुद्ध होईल. म्हणूनच पारमार्थिक काम केल्यानंतर भगवंताच्या जवळ यायच्याऐवजी असल्या कामानं आणखी लांबच जायला होईल.

म्हणून श्री तुकोबांनी या 'तीर्थयात्रां'चा हिशेब या अभंगात काढला असून शेवटी म्हटलं आहे की, अंतरंगातला अहंकार, असूया, द्वेष, अशांती यांतलं काहीच जर बदलत नसेल तर साखरेत कितीही घोळलं तरी जसा कारल्याचा कडूपणा मोडत नाही, तसं अशी साधनं वेगळ्या दृष्टीनं, अंतरंग बदलण्याच्या दृष्टीनं केली गेली नाहीत, ती साधनं मनापर्यंत पोचली नाहीत, अंतरंगात जर या साधनांमुळं शांती-क्षमा - दया अशांसारखे दैवी गुण स्थिर झाले नाहीत तर ही साधनं चांगली असूनसुद्धा त्याचा आपल्याला काय उपयोग आणि ती आपण

केली म्हणून मिरवण्यानं तरी काय साधणार ?

जी गोष्ट या तीर्थयात्रेची आहे, तीच गोष्ट परमार्थाच्या अन्य साधनांचीही आहे. सत्संगाची आहे, प्रवचन-पुराण-श्रवणांची आहे, तप-अनुष्ठानांची आहे, पारायणांची आहे. आपल्या हे सहज लक्षात येईल की,'त्या साधनांनी अंतर शुद्ध' होत नाही, 'भीतरील - म्हणजे आतील' थारा मोडत नाही. म्हणजेच कोणत्याही साधनानं आपण जोवर भगवंताच्या जवळ जात नाही, तोपर्यंत त्याची किंमत प्रापंचिक कामाइतकीच आहे. खरा, शुद्ध आनंद प्राप्त व्हायला त्यांचा उपयोग 'नहीं के बराबर' आहे.

म्हणून आपण परमार्थाचं म्हणजेच आनंदाच्या प्राप्तीचं कोणतंही साधन करायला जाणार असू, तर हा इशारा लक्षात ठेवायला हवा असाच आहे. लौकिकदृष्ट्या अशी खूप साधनं करूनसुद्धा लोक तसेच राहिलेले का दिसतात, याचंही उत्तर या अभंगात सहजच मिळून जातं.

**

१०.
शुद्ध चित्ताचा चमत्कार

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ।।१।।
विष ते अमृत आघात ते हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ।।२।।
दुःख ते देईल सर्व सुख फळ । होतील शीतळ अग्निज्वाळा ।।३।।
आवडेल जिवा जिवाचिये परी । सकळा अंतरी एक भाव ।।४।।
तुका म्हणे कृपा केली नारायणे । जाणिजेत येणे अनुभवे ।।५।।

***

या जगात राहायचं म्हटल्यावर माणसाला वेगवेगळ्या अनुभवांना सामोरं जावंच लागतं. व्यवहार करायचा म्हटल्यावर नाना तऱ्हांना तोंड द्यावंच लागतं. त्यांतला सर्वांत महत्त्वाचा व नेहमी येणारा अनुभव म्हणजे दुःखाचा, मनाविरुद्ध घडण्याचा, शत्रुत्वाचा. अशा तऱ्हेचे अनुभव सामान्य माणसाला तर पदोपदी येत असतात. ते तो अपरिहार्य समजतो. त्याला तोंड देताना अनेक माणसं कोलमडून पडतात, बऱ्याच माणसांना ते अनुभव पेलता पेलत नाहीत, काही माणसांचं आयुष्य अशा अनुभवांना तोंड देण्यातच खर्ची पडतं. पण या अनुभवांना श्रद्धावान माणसाच्या जीवनात वेगळं परिमाण असतं, याची कल्पनाच आपल्याला येत नाही.

भक्ताच्या आयुष्यात असे अनुभव, अशी माणसं, असे प्रसंग येत नसतील का? या साऱ्याचा एक उद्‌बोधक ऊहापोह या अभंगात श्री तुकोबा करीत आहेत. अनेकांना सामान्य माणूस म्हणून साधकांच्या, भक्तांच्या आयुष्याकडं बघताना हा प्रश्न अनेकदा पडलेला असतो. तर जी माणसं निष्ठावान भक्त असतात, बनू इच्छितात त्यांनाही अशा प्रकारच्या

अनुभवांकडं पाहाण्याची, असे अनुभव का, कसे, केव्हा येतात याची उत्सुकता असते. त्या साऱ्यावर प्रकाश पडण्याच्या दृष्टीनं हा अभंग मोलाचा ठरेल.

श्री तुकोबांनी यात शेवटी म्हटल्याप्रमाणं हा भगवंताच्या कृपेनं येणारा अनुभव आहे. यातली स्थिती भगवंताच्या कृपेनं यायची आहे. शिवाय ती प्रत्यक्ष अनुभवानंच खरी जाणता येईल, कळू शकेल हे लक्षात ठेवून हा अभ्यास केलेला बरा. असं सुरुवातीलाच सुचवायचं कारण असं की, काही नेहमीच्या लौकिक व्यवहारापेक्षा वेगळं दिसलं की, माणसाला थोडासा विचार करण्यापूर्वी किंवा धीर धरण्यापूर्वीच 'असं कसं शक्य आहे' असं विचारण्याची मोठी अधीर सवय आहे, जी अशा अनुभवांच्या आकलनात अडथळा होऊ शकते.

आपल्या सर्वांनाच कुणा ना कुणाकडून आपल्याबद्दल शत्रुत्व बाळगल्याचा अनुभव येत असतो. कुणाला ना कुणाला आपल्याबद्दल असूया वाटते, द्वेष वाटतो. त्याचा अनुभव बहुधा आपल्या बरोबरीच्या लोकांकडून येतो. अनेकदा असं शत्रुत्व बाळगणारे लोक आपले नातेवाईक तर काही वेळा आपल्यापेक्षा लहान-मोठे, परिचित-अपरिचितही असू शकतात.

ते कोणीही असले तरी सर्वसामान्य मनुष्य अशा शत्रुत्वामुळं त्रस्त होतो. त्यावर विचार करण्यात, त्यावर स्वतः काही प्रतिकारात्मक, संरक्षणात्मक कृती ठरवण्यात व ती करण्यात त्याचा कितीतरी काळ व शक्ती खर्ची पडते. त्या शक्तीचा तो तसा अपव्यय होतो. कारण अशातून विधायक फारसं काही घडत नाही. उलट मनाचा कलुषितपणा वाढून स्वास्थ्याची तात्कालिक हानी तर होतेच, पण कदाचित दोन्हीहीकडून असमंजसपणा घडत राहिल्यास ती एक दीर्घकालीन डोकेदुखी व आपत्ती

होऊन बसते. यामुळंच सामान्यांनी याचा विचार जरूर करावाच, पण साधकांनी तर विशेषच करावा.

याकडं जरा सावधगिरीनं, तटस्थपणानं पाहिलं तर एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येईल की, हे बाह्यतः दिसणारे संघर्ष, शत्रुत्व हे सारे मूलतः अंतर्गत, मनातले विशेषतः चित्तातले असतात. उदाहरणानंच पाहिलं, तर साप बघितल्यावर आपल्या मनाची प्रतिक्रिया एखादी दोरी बघितल्यावर किंवा एखादी वेल पाहिल्यावर व्हावी तशी होत नाही. त्या प्रतिक्रियेत भीती आणि त्यामुळं त्या सापावर आक्रमण करण्याची, त्याला ठार मारण्याची, पळवून लावण्याची भावना नकळत येते. त्यापोटी कोणती कृती घडो किंवा न घडो, सापाच्याही ठिकाणी भीती, प्रतिकार, इजा करण्याची प्रवृत्ती अशा भावना निर्माण होतात. त्यामुळं शत्रुत्व सापाकडून होवो किंवा कुणाकडून होवो त्याला काही प्रमाणात जबाबदार आपलं चित्त असतं, हे आपल्या क्वचितच लक्षात येतं.

ही गोष्ट वरच्या उदाहरणाच्या बाबतीत अनेक सत्पुरुषांच्या जीवनात कित्येकदा घडताना आपण पाहिली असेल. श्री रमण महर्षींच्या समोर शांतपणे येऊन बसणारे वाघासारखे नि सापासारखे प्राणी ही त्याची जिवंत उदाहरणं होत. सापाकडून रमणांना शत्रुत्व नाही, कारण रमणांकडून त्याला अशुद्ध भाव वा शत्रुत्व नाही.

म्हणून श्री तुकोबा म्हणतात, आपण आपलं चित्त शुद्ध करू शकलो तर निम्मंच काय मोठंच काम होतं. मग ना प्राण्यांकडून शत्रुत्व होतं ना माणसांकडून. उलट अनेकदा असा अनुभव येतो की, शत्रुत्व करायला म्हणून आलेली माणसं, प्राणी आपल्या म्हणजेच आपल्या शुद्ध चित्ताच्या संपर्कात आली की, शत्रुत्व तर विसरून जातातच, पण उलट मित्र बनून जातात. आता जगाला बदलणं एक वेळ आपल्या हातात

नसेल, पण स्वत:ला बदलणं तरी नक्की आपल्या हातात असतं आणि ते साधकाचं कामच आहे.

एकदा ही दृष्टी आली की, ते म्हणतात तशी कुठली गोष्ट मग दु:खाची वाटत नाही, कुठला आघात वाटत नाही. विष विष वाटत नाही. मग प्रारब्धानं अग्निज्वाळांना जरी सामोरं जावं लागलं तरी त्या शीतलच वाटतात. मग दु:खाचा, त्रासाचा मोठा विषयच जीवनातून हद्दपार होतो. सर्व जग आपलं वाटतं.

मग अशा माणसाला किंबहुना देवमाणसाला कुठलीच परिस्थिती नकोशी, बदलावीशी आतून वाटत नाही. कारण तो स्वत:ला परिस्थितीवेगळा समजत नाही. त्याच्या दृष्टीनं नीतिनियमही अपुरे ठरतात, बदलतात. जसं बिभीषणाला आपल्या भावाशी लौकिकदृष्ट्या नैतिक कर्तव्य लागत असूनही भावाचा शत्रू राम जवळ करावासा वाटला, कारण राम सत्पक्षाचा होता आणि ते कृत्यही त्यामुळं नैतिक ठरलं.

हे सारे अनुभव वरवर पाहाता 'असं कसं घडेल' अशा प्रकारातले वाटले तरी ते खरे आहेत आणि आपल्या जीवनातलं द्वंद्व, दु:ख, असंतोष, अशांती कमी करायची असेल, तर आपलंच चित्त शुद्ध करण्याचा श्री तुकोबांचा अभिप्रेत सल्ला आपल्याला मानावा लागेल. त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवून हा अनुभव घ्यावा लागेल. कारण त्यांचीही शिफारस आहे की, 'जाणिजेत येणे अनुभवे !'

**

११.
आणिक न साहे

सर्वविशी माझा चाललासे जीव । आता कोण भाव निवडू एक ।।१।।
संसाराची मज न साहेचि वार्ता । आणीक म्हणता माझे कोण ।।२।।
देहसुख काही बोलिले उपचार । विष ते आदर बंध वाटे ।।३।।
उपाधी दाटणी प्रतिष्ठा गौरव । होय माझा जीव कासावीस ।।४।।
तुका म्हणे काही आणीक न साहे । आवडती पाय वैष्णवांचे ।।५।।

***

या अभंगात एका बाजूनं जशी श्री तुकोबांची एक अवस्था आपल्याला दिसते, तशी दुसऱ्या बाजूनं साधनेतली एक खूणही आपल्याला मिळते. अधिक विचार केला तर लक्षात येईल की, आपल्याला सावध राहायला, आपली स्थिती, गती, प्रगती तपासून पाहायला या अभंगातून एक मोठाच विषय आणि परिमाणं मिळत आहेत.

म्हणजे असं की, आपल्याला तापानं आजारी पडायला झालं की, अन्न कडू लागतं. अगदी साखर जरी खाल्ली तरी ती गोड लागत नाही. तीच गोष्ट विषाच्या बाबतीत आहे. एखाद्याच्या अंगात विष चढलेलं असेल तर त्याला कडू पदार्थ कडू लागत नाही, गोड पदार्थ गोड लागत नाही. ते उतरलं की, मात्र मूळ चवी जागेवर येतात. तेव्हा त्यावरून त्याच्या अंगातलं विष उतरलं की नाही हे बघण्यासाठी त्याला गोड पदार्थ खायला देतात. तो गोड लागत नाही, तोवर तो ताप किंवा ते विष उतरलं नाही, असं समजतात.

माणसानं बाह्यतः कितीही परमार्थ केला, साधनं केली, उपासना

केल्या तरी त्याच्यात ते किती प्रमाणात खरं भिनलं आहे, उतरलं आहे, तो खऱ्या अर्थानं किती प्रमाणात प्रापंचिक राहिला आहे किंवा किती प्रमाणात खरा पारमार्थिक, खरा भक्त झाला आहे, हे ठरवायला तसं एरवी फार कठीण आहे.

कारण आपल्या परमार्थातसुद्धा बाह्य क्रियाकर्मं फार आहेत. पूजाअर्चा आहे, जपजाप्य आहे, विद्वत्ता आहे, यात्रातीर्थं आहेत. एखादा वाकबगार प्रापंचिक माणूस यात शिरला तर प्रपंचातल्याच उरकाच्या स्वभावानं, तडफेनं तो असली कामंही धडाधड करू शकेल. मग त्याचं भजनपूजन पाहून त्याला मोठा आध्यात्मिक माणूस समजावं लागेल. तसं अनेक लोकांना समजलं जातंही. पण जाणणारे हे जाणून असतात की, हा माणूस हे सगळं कितीही करो, तो अनेकांच्या दृष्टीनं आध्यात्मिक माणूस असो, मोठा बुवा असो, पण तो खरा पारमार्थिक नाही. तर हे ठरवायला काही प्रमाण, काही कसोटी असू शकेल का ? हा मोठा प्रश्न आहे.

याचंही पुन्हा कारण असं की, हे दुसऱ्या एखाद्या माणसाबद्दल ठरवणं हे एक वेळ जाऊ द्या. तो पुन्हा प्रपंचच झाला. पण निदान स्वत:पुरतं तरी ठरवावं लागेल की नाही ? स्वत:ची तरी परीक्षा घ्यावी लागेल की नाही? नाहीतर स्वत:लासुद्धा आपल्या प्रगतीविषयी भ्रम व्हायचा मोठा धोका आहे. म्हणून यासाठी तरी अशा तऱ्हेच्या काही कसोट्या किंवा प्रमाणं असणं अतिशय गरजेचं आहे.

आणि नेमकं तसं काही या अभंगामध्ये आपल्याला सापडतं असं आढळून येईल. एका बाजूनं वर उल्लेख केल्याप्रमाणं श्री तुकोबा स्वत:ची स्थिती वर्णन करताहेत की, मी या प्रपंचाला त्रासलो आहे. मला कोणी 'माझं' म्हटलेलंसुद्धा खपत नाहीसं झालं आहे. माझ्या देहाला सुखाच्या होणाऱ्या गोष्टी कुणी केल्या तर त्या आता माझ्या मनाला सहन होत

नाहीशा झाल्या आहेत. कुणी मला आदर दिला, तर मला तो विषासमान वाटतो, नकोसा होतो. कुणी माझा गौरव केला, कुणी मला प्रतिष्ठा दिली तर ती मला सुखाची वाटत नाही तर अशा प्रतिष्ठेनं आणि गौरवानं माझा जीव गुदमरुन जातो, कासावीस होतो. एरवी प्रपंचात मनुष्याला उपाधींचं कौतुक असतं. तो त्या वाढवतो. त्याला त्या सुखाच्या वाटतात. पण मला मात्र आता कुठलीही उपाधी त्रासाची वाटते.

प्रापंचिक गप्पागोष्टींत माणसाचा काळ कसा जातो हे एरवी माणसाला कळत नाही. अशा गप्पात त्याला मोठा आनंद वाटतो, अशा गप्पा मारायला मिळाव्या म्हणून तो धडपडतो, अशा गप्पा मारताना तो स्वत:ला विसरतो. पण श्री तुकोबा म्हणतात की, अशा प्रपंचाच्या गप्पा, अशा सांसारिक गप्पा मला आता आवडत तर नाहीतच, पण मला अशा गप्पांची किंवा व्यर्थ संसारविषयांची वार्तासुद्धा सहन होत नाही. इतर साऱ्या गोष्टीही मला आता आवडायच्या बंद झाल्या. आता मला फक्त भगवंत, भगवंताचा मार्ग आणि भगवंताचे भक्त, त्यांचे चरण यांचीच गोडी वाटते.

या सगळ्या स्थितीतून एका बाजूला श्री तुकोबांचं आत्मवृत्त स्पष्ट होत असलं, तरी आपल्या दृष्टीनं ते समजून घेण्याइतकंच किंबहुना त्याहीपेक्षा आपल्याला मिळणाऱ्या खुणा समजून घेणं अधिक मोलाचं आहे. आपण ज्या प्रमाणांची, काही कसोट्यांची गरज वर प्रतिपादन केली त्या अनेक कसोट्या या अभंगातून आपल्याला अनायसेच मिळून जात आहेत.

आता एका बाजूला आपण भजनपूजन करीत असू, आध्यात्मिक समजले जात असू किंवा स्वत:ला तसं समजत असू, तर यांतली कुठलीही कसोटी लावून पहावी. उदाहरणार्थ, आपल्याला अजूनही प्रापंचिक

विषयांच्या गप्पागोष्टी करायला मनापासून आवडत असेल किंवा आपल्याला कुणी देहाला सुख देणाऱ्या गोष्टी केल्या किंवा आपल्याला त्या कराव्याशा वाटल्या - उदाहरणार्थ, गाद्या-गिरद्या, उत्तम अन्न पक्वान्नं, हिंडणं-फिरणं आवडत असेल किंवा पुढली कसोटी म्हणजे कुणी मान द्यावासा वाटत असेल, महत्त्व द्यावंसं वाटत असेल, कुणी गौरव करावासा वाटत असेल - तर आता उघडच आहे की, आपल्यात परमार्थ किती मुरला आहे, आपण किती खरे आध्यात्मिक आहोत !

उत्तर सरळ आहे की,'दिल्ली तो अभी बहोत दूर है ।' जे अध्यात्म, जे साधन आपण करतो आहोत ते सारं वरवरचं आहे, अजून खूप काही आणि त्याहीपेक्षा समजून व खरं काही करायची जरूर आहे.

यात एक गोष्ट जाता जाता स्पष्ट केली पाहिजे की, वर सांगितलेल्यातल्या काही गोष्टी - उदाहरणार्थ, देहसुखाच्या सोयी, मानमरातब या एखाद्याच्या वाट्याला आपोआप येतीलही, त्यानं बिघडत नाही. फक्त त्या हव्याशा वाटतात का, सुखाच्या वाटतात का ही कसोटी आहे. त्या नसल्या पाहिजेत असा आग्रह नाही. तसा आग्रह धरण्याचं कारणही नाही.

एकूण तळमळीनं पुढं जाऊ इच्छिणाऱ्याला हा अभंगही मोलाचा ठरेल.

**

१२.
आवडीची भक्ती

न ये जरी तुज मधुर उत्तर । दिधला सुस्वर नाही देवे ।।१।।
नाही तयावीण भुकेला विठ्ठल । येईल तैसा बोल रामकृष्ण ।।२।।
देवापाशी मागे आवडीची भक्ती । विश्वासेशी प्रीती भावबळे ।।३।।
तुका म्हणे मना सांगतो विचार । धरावा निर्धार दिसेंदिस ।।४।।

***

कोणतीही गोष्ट करायची ठरवली की, स्वाभाविकपणे मनुष्य असा विचार करतो की, ती गोष्ट करायला काय काय साधनं लागतील. जसं घर बांधायचं ठरलं की, त्यासाठी दगड, विटा, वाळू, सिमेंट अशी सामग्री, गडी, गवंडी, इंजिनिअर अशी माणसांची मदत - अशा अनेक गोष्टींची माणूस जुळवाजुळव करतो. त्याला माहीत असतं की, त्या गोष्टी आपल्याकडं नसल्या तर ते काम तडीला जाणार नाही.

या पद्धतीनं विचार करण्याची सवय झाली की, माणूस सगळ्याच बाबतीत तसा विचार करायला लागतो. त्याला भक्तीचं क्षेत्रही अपवाद नाही. भक्तीच्या क्षेत्राचा परिचय झाला की, माणसाला भगवंत मिळवायची इच्छा होते. तो मिळवण्यासाठी करायच्या वेगवेगळ्या गोष्टी त्याला कळतात. जसं - तीर्थंव्रतं, भजनपूजन, प्रवचन, निरूपण. त्या दृष्टीनं विचार केला की, काही वेळा लक्षात येतं की, यांतल्या काही काही गोष्टी करण्यात अडचणी आहेत.

उदाहरणार्थ, या अभंगात म्हटल्याप्रमाणं चांगला आवाज. भगवंताचं भजन करायची जरी किती इच्छा झाली तरी प्रत्येकाला भजनाला

योग्य किंवा आवश्यक एवढा चांगला आवाज, स्वरज्ञान, तालाचं ज्ञान असेलच असं नाही. किंबहुना बरेच वेळा ते तसं नसण्याचीच शक्यता अधिक आहे. मग काही करायच्या उमेदीनं आलेला माणूस नाउमेद होतो.

अशा माणसाला श्री तुकोबा या अभंगात आश्वस्त करतात. त्याला ते मनमोकळा दिलासा देऊन म्हणतात की, अरे बाबा, भगवंताचं नामसंकीर्तन करण्याला गोड आवाजाची गरजच आहे असं कुठं आहे? तुला जरी चांगला आवाज नसला तरी भजनाचं नि भगवंताचं त्यामुळं अडत नाही. उलट हा खरा भक्तिभावाचा विषय आहे. त्यामुळं भगवंत काही तुझा आवाज पाहून, गाण्यातली तयारी पाहून तुला जवळ करीत नाही. तो तुझा भाव, तुझं त्याच्यावरचं निरपेक्ष प्रेम पाहून तुला जवळ करतो. त्यामुळं तुला येईल तसं, येईल त्या स्वरात तू नामसंकीर्तन कर.

यात तुकोबांनी सांगितलेली गोष्ट जितकी भजनासाठी लागणाऱ्या आवाजाला लागू आहे, तितकीच ती ज्ञानासाठी लागणाऱ्या बुद्धीला लागू आहे, सेवेसाठी लागणाऱ्या शारीरिक कुवतीला लागू आहे, तीर्थयात्रा करण्यासाठी लागणाऱ्या आर्थिक-शारीरिक बळाला लागू आहे. जसं आवाजामुळं भजन अडणार नाही आणि आवाज नसला तरी नुसत्या भावानं मारलेल्या हाकेनं भगवंत भेटीला येईल, तशा मारलेल्या हाकेनं - नामानंही- भगवंत भेटू शकतो.

तसंच अशा इतर बाबतीतही आपण कमी पडत असलो, आपल्याला एखादी बुद्धी, बळ, पैसा - अशी कुठली ताकत कमी पडत असली तरी भक्तीचं काम त्यामुळं अडत नाही. भगवंत प्रसन्न होण्याचं किंवा भेटण्याचंही त्यामुळं कुठं थांबत नाही. हे लक्षात यावं आणि आपण स्वत:च निर्माण केलेल्या दुबळेपणाच्या नि निराशेच्या विचारचक्रातून बाहेर पडावं, अकारण निर्माण केलेला अडथळा दूर व्हावा म्हणून

श्री तुकोबा सांगतात, 'नाही तयावीण भुकेला विठ्ठल'.

या संदर्भात जाताजाता श्री गोंदवलेकर महाराज यांचं म्हणणंही मनोज्ञ वाटतं. ते म्हणत, 'भजनाला तालासुराची मोठी गरज नसते. तशी असती तर तुकोबा आधी गाणं शिकले असते!' एकूणच, श्री तुकोबांनी त्यांच्या अनुभवातूनच हा दिलासा सर्व साधकांना दिला आहे की, 'येईल तैसा बोल'.

पुढे तुकोबांनी साधकांना सुचवलं आहे की, मनाची समजूत घालावी की, या भक्तीच्या प्राप्तीसाठी त्यानं निर्धारानं प्रयत्न करायला हवेत. वास्तविक हे सुचवताना तुकोबांनी ते स्वत:च्या मनाला सुचवलं आहे आणि आपल्या मनाला म्हटलं आहे, 'तू माझं हे म्हणणं लक्षात घेऊन, त्यावर विचार कर आणि भक्तीचा निर्धार कर.' हे सारं म्हणणं अर्थातच प्रत्येकानं आपल्या आपल्या मनाला म्हणण्यासारखंच आहे.

कारण अडचण सारी आहे ती मनाचीच आहे. मनच माणसाला म्हणतं की, मंजुळ आवाजाशिवाय नामसंकीर्तन कसं शक्य आहे? परमेश्वराला कसंतरी म्हटलेलं भजन, कसल्यातरी आवाजात केलेलं भजन कसं आवडेल? आणि त्यामुळं मग आपलीच ओढाताण सुरू होते. ती कशी घालवावी हेही त्याच मनाची समजूत घालण्याचं काम आहे. ते कसं करावं, हे आपण वर पाहिलंच.

तीच गोष्ट मनाची भगवंताकडून काय मागावं या बाबतीतली आहे. काहीही मागायचं म्हटलं की, मनाच्या समोर आपल्याला हव्या असलेल्या प्रापंचिक किंवा तशा गोष्टींची यादीच उभी राहाते. पण इथंही पुन्हा मनाला हे समजावावं लागतं की, काय मागावं !

म्हणून श्री तुकोबा मनाला म्हणतात की, जी भक्ती करायची तुझी इच्छा झाली आहे, तुला ती पटली आहे, तिचीच आवड टिकून

राहो, असं माग. म्हणजे एक तर, घसरून बाजूला जायची भीती नाही. दुसरं म्हणजे, ज्या भक्तीनं भगवंत वश होतो, ती भक्ती टिकून राहिली, तर साहजिकच भगवंतही टिकून राहिला. म्हणून मागताना 'आवडीची भक्ती' मागावी असं म्हटलं. म्हणजेच पर्यायानं 'भक्तीची आवड'च मागितल्यासारखं झालं.

त्यातही भगवंतावर जे प्रेम आहे ते एका विश्वासानं, भगवंत आपलं कल्याण करील अशा खात्रीनं निर्माण झालेलं आहे. ते प्रेम टिकवायचंच आहे, पण ते टिकवायचे लौकिकातले मार्ग थोडे वेगळे आहेत. कुठं पैसाच दे, कुठं वस्तूच दे इत्यादी. पण इथले मार्ग थोडे वेगळे आहेत. त्यातही एकाच मोठ्या राजमार्गात ते सारे मार्ग येतात. तो राजमार्ग 'भावबळा'चा. आपला भगवंताच्या ठिकाणी जो 'दृढ भाव' आहे त्याच 'बळा'वर, जोरावर ते प्रेम टिकून राहाणार आहे. बाकी मनानं हे प्रेम टिकवण्यासाठी इतर कितीही उपाधी केल्या तरी या 'भावबळा'ला पर्याय नाही, हे खरं.

त्यातही पुन्हा मनाला चंचलतेची चक्रं सततची लावलेली आहेत, त्यामुळं त्याला एखादी गोष्ट सातत्यानं करायचं काम जरा कठीण जातं. इथं साधनेत तर सातत्य हा प्राणच. म्हणून अखेरीस श्री तुकोबा मनाला 'रोज निर्धारानं' ते करीत राहायचा 'विचार' का समजावतात, ते स्पष्ट होतं.

**

१३.
कृपेचा प्रत्यय

बरे झाले देवा निघाले दिवाळे । बरी या दुष्काळे पीडा केली ।।१।।
अनुतापे तुझे राहिले चिंतन । झाला हा वमन संवसार ।।२।।
बरे झाले देवा बाईल कर्कशा । बरी हे दुर्दशा जनामध्ये ।।३।।
बरे झाले जगी पावलो अपमान । बरे गेले धन ढोरेगुरे ।।४।।
बरे झाले नाही धरिली लोकलाज । बरा आलो तुज शरण देवा ।।५।।
बरे झाले तुझे केले देवाईल । लेकरे बाईल उपेक्षिली ।।६।।
तुका म्हणे बरे व्रत एकादशी । केले उपवासी जागरण ।।७।।

***

माणसाच्या जीवनात त्याला साथ-संगत करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत. त्यांतल्या काही गोष्टी काही काळ असतात, तर काही काळ नसतात. पण काही गोष्टी मात्र त्याची आयुष्यभर संगत करतात. अशा गोष्टींत दु:खाचा नंबर फार वरचा आहे.

या ना त्या स्वरूपात अगदी लहानपणापासून, मरेपर्यंत माणसाला दु:ख नेहमी सोबत करीत असतं. मग ते दु:ख देहाच्या व्याधींचं असो, अपयशाचं असो, मृत्यूचं असो, पैसा-अडका नसण्याचं असो, वस्तूंच्या उणिवांचं असो, जगात होणाऱ्या मानहानीचं असो किंवा नैसर्गिक आपत्तींचं असो. दु:ख माणसाची पाठ सोडत नाही, हे खरं. म्हणून तर 'सर्वम् दु:खम्' हा बुद्धाचा महासिद्धांत प्रसिद्धच आहे. तितकाच कृष्णमूर्तींसारख्या जीवनवादी सत्पुरुषांनी मानवी दु:खाचा आयुष्यभर केलेला विचारही प्रसिद्धच आहे.

दुसऱ्या बाजूला, माणसाच्या मनाचा 'असमाधान' हा एक प्रधान गुण आहे. त्यामुळं ज्याच्या वाट्याला जी परिस्थिती आलेली आहे, त्या परिस्थितीत सुख नसून ते दुसऱ्या कुठल्यातरी परिस्थितीत आहे, अशी मनाची सतत समजूत होत असते. त्यामुळं मनाला नेहमी असमाधान चिकटून आहे आणि या असमाधानातून एका बाजूला परिस्थिती बदलण्याची सततची धडपड जशी दिसते, तसा दुसऱ्या बाजूला मनाचा सतत तक्रार करण्याचा स्वभावही दिसतो. त्यामुळं असं आढळून येईल की, भली-भली माणसं झाली, तरी वर सांगितल्या त्या दोन गोष्टी म्हणजे दुःख आणि तक्रार त्यांना चुकली नाहीत.

या पार्श्वभूमीवर श्री तुकोबांचा हा अभंग पाहिला की, भक्तीनं माणसाच्या जीवनात ज्या अनेक गोष्टी साध्य होतात, त्यांतल्या काही ठळक गोष्टी समोर येतील. उदाहरणार्थ, तुकोबांच्या बाबतीत सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला यावं तसं अनेक प्रकारे दुःख वाट्याला आलं. त्यांचं व्यवहारात दिवाळं निघालं. त्यांच्या वाट्याला कितीतरी लोकनिंदा आली. त्यांची जगापुढं बेअब्रू झाली. त्यांच्या वाट्याला कजाग बायको आली. त्यांची धनसंपत्ती लुटली गेली.

ही सगळी कारणं कोणत्याही सामान्य माणसाला आयुष्यभर दुःख करायला पुरेशी तर आहेतच, पण सतत भगवंताकडं किंवा नियतीकडं तक्रार करायला नक्कीच पुरेशी आहेत. दुसरा एखादा माणूस या सगळ्यामुळं आयुष्यभर दुःखात राहिलाच असता, पण प्रसंगी स्वतःवर नियंत्रण न राहून वेळी आत्मघातालाही प्रवृत्त झाला असता, यात नवल नाही.

नवल आहे ते याचं की, श्री तुकोबा हा प्रत्येक प्रसंग सांगताना असं म्हणतात की, 'बरे झाले निघाले दिवाळे', 'बरी पीडा झाली, बरी

दुर्दशा झाली', 'बरे झाले अपमान झाला', 'बरे झाले धनसंपत्ती गेली', 'बरे झाले बायको कर्कशा आहे!' यांतलं 'हे सगळं झालं हे बरं झालं' हे म्हणण्याइतपत चित्ताला समत्व आणि आनंद कुठून निर्माण झाला, हा आपल्या दृष्टीनं विचार करण्याचा विषय आहे.

सामान्य माणसाला अशा गोष्टीचं दुःख वाटेल. त्यावर तो स्वतःला आणि प्रारब्धाला दोष देईल, वेळी देवाला दोष देईल, देवाकडं तक्रार करेल. पण यातून त्याच्या एक गोष्ट लक्षात येत नाही की, हे असं आहे म्हणून तक्रार करण्यानं साध्य काहीच होत नाही. उलट निराशेच्या आणि नकाराच्या भावनांनी आपलं मन मात्र कलुषित होतं, निराश होतं.

परिस्थिती बदलावी म्हणून मनुष्य तर प्रयत्न करतोच आहे. पण त्यानंतर प्राप्त होणारी परिस्थिती त्याला शेवटी दुःखात टाकते, ही दुर्दैवाची गोष्ट आहे आणि त्यामुळं 'समजूतदार भक्ती'चा उपाय करण्याचं त्याला सुचत नाही, ही आणखी दुर्दैवाची गोष्ट आहे. या अभंगात अभ्यासानं निदान हा उपाय तरी समोर येईल, याची आपण आशा करू या.

भक्तीतला समजूतदारपणा अशात आहे की, माणसाचं कर्तृत्व भक्ती ओळखतेच, त्याला ती अवश्य वाव देते किंवा किंबहुना त्या बाबतीत ती तत्परही आहे. पण सामान्य मनुष्य इथंच थांबतो. त्या जागी भक्ती मात्र त्याच्या पुढचीही वाटचाल करते. ती अशी की, माणसाचं कर्तृत्व ओळखण्याबरोबर भक्ती त्याची मर्यादाही ओळखते. त्यामुळं प्रयत्नांच्या नंतर जे घडतं, ते माणसाच्या पलीकडं असलेल्या विश्वशक्तीचं किंवा भगवंताचं कर्तृत्व आहे, असं समजून ती शांत राहू शकते.

म्हणून कितीही मोठ्या प्रतिकूल वाटणाऱ्या परिस्थितीमध्ये किंवा मोठ्या अपयशानंतर किंवा शरीरव्याधीनंतरसुद्धा खरा भक्तिमान मनुष्य

शांत आणि आनंदी राहू शकतो. उलट तो असं मानतो की, ही परिस्थिती मला भगवंताकडं जायला किंवा आनंद निर्माण करायला प्रतिकूल नसून अनुकूलच आहे. त्यामुळंच तो परिस्थिती सोडून द्यायला तयार होऊ शकतो आणि परिस्थितीनिरपेक्ष आनंद अनुभवू शकतो. कारण तो म्हणतो की, परिस्थिती अनुकूल राहिली असती, तर एका बाजूनं मी त्यात अडकून राहिलो असतो आणि दुसऱ्या बाजूनं माझं कर्तृत्व अमर्याद आहे अशा भ्रमात राहिलो असतो.

म्हणून समजूतदार भक्तीमुळं माणसाची प्रयत्न करण्याची वृत्ती टिकून राहूनसुद्धा प्रतिकूलतेबद्दल दुःख किंवा तक्रार त्याच्या जीवनात राहात नाही. उलट अशी प्रतिकूलता हा त्याला भगवंताच्या 'कृपेचा प्रत्यय' वाटतो. यातच या अभंगातून आणि तुकोबांच्याकडून आपल्याला काय शिकता येईल आणि आपलं जीवन कसं आनंदी ठेवता येईल, याची कल्पना येते.

**

१४.
जागृतीचा दिवस

भक्ती तो कठीण शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।।१।।
जेथे पाही तेथे देखीचे पर्वत । पायावीण भिंत तातडीची ।।२।।
कामाविले तरी पाका ओज घडे । रूची आणि जोडे श्लाघ्यता हे ।।३।।
तुका म्हणे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ।।४।।

***

या अभंगामध्ये श्री तुकोबांनी चारपाच अत्यंत महत्त्वाच्या आणि सावधान करणाऱ्या गोष्टी साधकांसमोर ठेवल्या आहेत. त्यांतला एक सर्वसाधारणपणे जाणवणारा महत्त्वाचा संदेश असा की, एका दृष्टीनं भक्तिमार्ग आचरायला सोपा, सर्वांत सुलभ म्हणून नावाजला गेलेला आहे, तरीही दुसऱ्या दृष्टीनं तो इतर कुठल्याही मार्गापेक्षा खरोखर कठीणही आहे. त्यामुळं त्याच्या सोपेपणाला आकर्षित होऊन माणसानं तो चालायला जरूर जावं, पण त्याच्यातला कठीणपणाही लक्षात घ्यावा. त्यातले धोकेही चालता चालता डोक्यात जरूर ठेवावे. म्हणजे त्याची वाटचाल सफल होऊ शकेल.

त्यांतला सर्वांत महत्त्वाचा विचार आहे तो उतावळेपणाचा, उथळपणाचा. त्याचं वर्णन करताना श्री तुकोबा म्हणतात, हे पायावीण भिंत घालू पाहाणारे लोक आहेत. भक्तीचं मंदिर उभं करायचं आहे हे उत्तमच आहे, पण त्यासाठी पायाही तितकाच भक्कम लागेल, हे फार कमी लोक लक्षात घेतात. लौकिकात जसं 'पी हळद हो गोरी' करायच्या प्रयत्नात लोक असतात, तसे ते परमार्थातही असतात. ते हे लक्षात घेत

नाहीत की, मुळात भक्तीची इमारत हा मनाचा मामला आहे. तिथं भ्रम, धोके जास्त. म्हणजे एका दृष्टीनं ते वाळूवर घर उभं केल्यासारखं आहे. दुसऱ्या अर्थानं ते भूकंप, ज्वालामुखी, तीव्र वादळं, अखंड वेगवान वारे अशांनी व्याप्त असलेल्या प्रदेशात घर बांधल्यातला प्रकार आहे. त्यामुळं त्याचा पाया किती पक्का घ्यावा लागेल, याची कल्पना आपण करावी.

त्यात 'तातडीची भिंत' तर उपयोगाची नाहीच. ती 'पायावीण' तर अजिबातच उपयोगाची नाही. कारण तसं काही करायला गेलो तर कुठल्या क्षणी तो सारा इमला नेस्तनाबूत होईल कळणारही नाही! हा काही नुसता विचार नाही, असे एकदोन नव्हे कित्येक अनुभव आहेत की, ही पायाची काळजी न घेता गडबडीनं भक्तीचा इमला उभा करायला गेलेले कित्येक लोक भक्तीचा प्रवास करून आनंदाच्या गावी पोचण्याऐवजी, वासना-विकारांच्या वादळात सापडले आहेत. कित्येक जण पैसा, मान असल्या वाऱ्यात वाहून गेले. अखेर निराशेच्या नि भ्रमाच्या भलत्याच गावी येऊन दाखल झाले आहेत. हे आजूबाजूला पाहिलं तरी लक्षात येण्यासारखं आहे. म्हणून अशा बाबतीत धीमेपणानं आणि प्रत्येक पाऊल पक्कं रोवून पुढंच पाऊल टाकण्याऱ्या दुर्गम कड्यावरच्या गिर्यारोहकासारखे जे भक्त वाटचाल करतील, तेच योग्य मार्गावर प्रगत होत राहतील, यात नवल नाही.

या दृष्टीनं खोल पाया घेणं आणि तातडीची भिंत न बांधणं म्हणजे काय असेल, ते उघडच आहे. भक्तीला शरणागतीचा आणि निष्ठेचा खोल पाया आहे. आपल्या उपास्य दैवतावरची, सद्गुरूंवरची आत्यंतिक निष्ठा व शरणागती पक्क्या असतील तर पुढं वेळोवेळी होणारी दिशाभूल टळते. नाहीतरी श्री गोंदवलेकर महाराज म्हणत तसं निष्ठाच माणसाला तारते, देव नव्हे.

होतं काय की, भगवंतावर, गुरूंवर विश्वास ठेवणं तसं सोपं असतं. तो विश्वास टाकण्यात त्या क्षणी फारशी कृती नसते, त्यामुळं ते सहज घडू शकतं. पण पुढं त्या विश्वासापोटी गुरू जेव्हा काही साधन सांगतो - मग ते नाम असेल, ध्यान असेल, वाचन असेल, त्यावेळी मग कठीणपणा कळतो. आपण शरण आलेले आहोत हे सद्गुरूंना किंवा देवाला सांगणं हे 'त्वमेव शरणं मम' हे वाक्य उच्चारण्याइतकं सोपं आहे. पण त्याचं जे लक्षण की, आपल्या जीवनात घडणारी प्रत्येक गोष्ट त्याच भगवंताच्या इच्छेनं घडते आहे, ही मनाची ठेवण - विशेषत: प्रतिकूल परिस्थितीत टिकवणं - हे कठीण जातं आणि ते तर शरणागतीचं लक्षण आहे. वाक्य उच्चारणं जितकं सोपं तितकाच त्याचा अंमल किंवा आचरण कठीण आहे, हे जाणून जो राहील त्याचा पाया पक्का राहील.

त्यात अपेक्षित असलेली 'तातडीची भिंत' टाळणं म्हणजे आपल्याला सांगितलेल्या साधनापेक्षा लवकर व्हावं म्हणून जास्त साधन करण्याचा प्रयत्न करणं, दुसऱ्या साधकांची बरोबरी करण्यासाठी किंवा त्यांच्यापुढं आपण जाण्यासाठी किंवा त्यांच्यापुढं आपण आहोत हे दाखवण्यासाठी गुरूंनी सांगितलेलं साधन सोडून आणखी काही करण्याचा प्रयत्न करणं, साधन करू लागता लागता लगेचच अनुभवांची नि प्रचीतीची, अनुभूतींची अपेक्षा करणं - हे सारं आणि असं बरंच काही आहे.

हे लक्षात ठेवून भक्तीची वाटचाल करणाऱ्याला त्याच्या मनालाच मुख्य आवर घालावा लागेल. कारण ही सारी तातडी करणारं, गडबड करणारं, भ्रम निर्माण करणारं, भक्तीतलं भगवंताचं उद्दिष्ट डोळ्यांआड करून, मान-प्रतिष्ठा-पैसा अशी वेगळीच उद्दिष्टं पुढं आणून दिशाभूल करणारं सारं मनच. त्यामुळं श्री तुकोबांनी पुढं मनाला सतत अंकुश ठेवण्याचा मोलाचा सल्ला दिला आहे. तो सर्वांनाच सारखा उपयोगी

पडणारा आहे.

श्री तुकोबा अभंगात सुचवतात की, रोज उठून मनाला ही आलेली जागृती टिकवणं हा एक सततचा अभ्यास आहे. मनाला हे सगळं काही वेळा लक्षात येतं, पण ते पुढं टिकत नाही. हा तर आपला नित्याचाच अनुभव आहे. म्हणून ही जागृती मिळवणं हे जितकं महत्त्वाचं तितकंच ती टिकवणंही महत्त्वाचं, नव्हे अधिकच महत्त्वाचं. याच दृष्टीनं आधीच्या ओळीत सांगितलं तसं चांगलं अन्न घडायला स्वयंपाक शांतपणे, लक्ष देऊन, विचलित न होता, तो तडीला जाईपर्यंत चिकाटीनं केला तर तो उत्तम आणि रुचकर होईलच होईल. पण तेवढा धीमेपणा आपल्या वृत्तीला ठेवणं हाही साधनेतला गरजेचा भाग आहे.

इतकं सारं तंत्र सांभाळून भक्ती करणारा माणूस हा 'विरळा, शूर' म्हटलं तर सार्थच ठरेल. इतकी व्यवधानं सांभाळून भक्तीची ही तारेवरची कसरतीची वाटचाल करणारा हा 'शूर भक्त' नित्य अंकुश परजून राहील, तर त्याचा रोजचा दिवसही नित्य नवा आणि जागृतीचा राहील आणि त्यामुळं तो सार्थकाचा राहील, यात शंका नाही.

**

१५.
सोपा उपाय

युक्ताहार न लगे आणिक साधने । अल्प नारायणे दाखविले ।।१।।
कलियुगामाजी करावे कीर्तन । तेणे नारायण देईल भेटी ।।२।।
न लगे लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावे वनांतर भस्मदंड ।।३।।
तुका म्हणे मज आणिक उपाव । दिसती ते वाव नामेविण ।।४।।

***

माणसाला उपाधींची मोठी आवड आहे. त्यामुळं एक तर तो स्वस्थ बसणार नाही, नसेल तरी उद्योग निर्माण करील आणि उद्योग करायला जाईल तर थोडक्यात व सुटसुटीत करणार नाही. त्यातसुद्धा खूप प्रकार, वैविध्य साधण्याचा प्रयत्न करील. ही जी गोष्ट तो प्रपंचात करतो, त्यामुळं त्याचा तसा स्वभाव बनतो. त्या स्वभावापोटी अगदी प्रपंचाला कंटाळून भक्ती करायला जावो, प्रपंचाचं स्वरूप आणि अपूर्णता लक्षात आल्यानं भक्ती म्हणजेच पूर्णतेची कास धरायला जावो, तिथंही त्याचा हाच स्वभाव कायम राहातो. त्यामुळं प्रपंचात जशी एखादी गोष्ट मिळवायची म्हटल्यानंतर अनेक प्रकार करावे लागतात, तसेच अनेक प्रकारचे प्रयत्न परमार्थातल्या गोष्टी मिळवण्यासाठीसुद्धा करावे लागतील, अशी त्याची धारणा असते.

त्यातही प्रपंचाचा एक साधा नियम आणि अनुभव आहे की, छोटी गोष्ट मिळवायला कमी साधनं, कमी कष्ट, तर मोठी गोष्ट मिळवायला बरीच साधनं, बरेच कष्ट. याच पद्धतीनं परमार्थात विचार करण्यामुळं काही अडचणी निर्माण होतात. परमार्थात मिळवायची गोष्ट खूपच मोठी

म्हणजे भगवंत. त्यामुळं त्यासाठी लागणारी साधनंही खूप आणि कष्टही खूप, अशी त्याची नकळत समजूत होते.

साहजिकच, परमार्थातसुद्धा उपास-तापास, व्रतं, अनुष्ठानं, तीर्थयात्रा, पूजा-अर्चा, सत्संग, गुरुपदेश-अनुग्रह, योग-याग, जप-तप अशा अनेक प्रकारांची भगवंत मिळवायला नक्की गरज लागेल, अशी त्याची धारणा बनते. याची खरोखरच गरज आहे की नाही, याचा विचार करणारी माणसं फार कमी असतात.

या पार्श्वभूमीवर या अभंगातला श्री तुकोबांचा अनुभव आणि त्यांनी दिलेली 'अल्प नारायणे दाखविले' ही खात्री विचारात घ्यावी अशीच आहे. याला कारण असं की, परमार्थ हा प्रपंचासारखा नसून उलट प्रपंचाच्या विरोधातलाच आहे. प्रपंच म्हणजे अनेक वस्तू, अनेक कामं, अनेक साधनं असा अनेकत्वाचा आहे. त्यामुळं तो एवढ्या व्यापाचा आहे. आयुष्यभर केला तरी पुरा न होणारा आहे.

उलट परमार्थ मात्र एकट्याचा, एकाच वस्तूचा आणि एकाच साधनाचा आहे. त्यामुळं तो करायचा ठरला तर तत्त्वतः त्याला कशाचीच गरज लागत नाही. प्रपंच म्हणजे एखाद्या मोकळ्या जमिनीवर मोठ्या कष्टानं एखादं घर उभं करावं आणि त्याहीपेक्षा जास्त काळ, जास्त कष्ट करून, अनंत वस्तू गोळा करून ते घर भरून टाकावं, तसं आहे आणि परमार्थ म्हणजे असं असंख्य वस्तूंनी प्रचंड भरलेलं घर एकेक वस्तू देऊन टाकून मोकळं करावं, तसं आहे.

पहिलं काम करायला पैशाची गरज आहे, काळाची गरज आहे, माणसांची गरज आहे, अनेक साधनांची गरज आहे. पण दुसऱ्या कामाला मात्र मुख्य आपल्या इच्छेची गरज आहे. बाकी घर बांधायला वर्षानुवर्षं लागतील, घर भरायला त्याहूनही वर्षं लागतील. पण रिकामं

करायला नुसती इच्छाच पुरेशी आहे. बाकी काम एक दिवसातसुद्धा होईल. अर्थात हे जाताजाता लक्षात ठेवलं पाहिजे की, परमार्थाचं अशा तऱ्हेनं घर मोकळं करणं हे लौकिक अर्थानं नसून मानसिक पातळीवरचं आहे आणि तो मनानंच करायचा व्यवहार आहे. त्यामुळं ते काम क्षणाचं आहे.

म्हणून प्रपंचाच्या पद्धतीनं परमार्थाचं काम करू पाहाणाऱ्यांची उलटी दिशाभूलच होईल आणि ती घडतानाही आपण आजूबाजूला पाहतो. अनेकांना परमार्थ करायला खूप साधनं लागतात. खूप माणसं लागतात, खूप पैसा लागतो. तिथं एक नक्की आहे की, काहीतरी चुकतं आहे. खूप माणसं, पैसा, वस्तू असल्या म्हणूनही बिघडत नाही, पण त्याची गरज म्हटलं तर मात्र वर सांगितल्याप्रमाणं असणार नाही. भगवंत मिळवण्याचा मार्ग हा जर असा माणसं, वस्तू, पैसा यांशिवाय चालता येण्यासारखा नसला तर तो प्रपंचच होऊन बसेल आणि हे सगळं समजून न घेतल्यामुळं अशा तऱ्हेनं अनेक ठिकाणी परमार्थाचे प्रपंच झालेले आपल्याला दिसतात ते का, हे आपल्या लक्षात येईल.

अशा वेळी तुकोबांनी जी परमार्थमार्गाची शुद्ध कल्पना आणि स्वत:चा अनुभव या अभंगात मांडला आहे, तो किती महत्त्वाचा आहे आणि किती विचार करण्यासारखा आहे, हे आपल्या लक्षात येईल.

श्री तुकोबा म्हणतात, उपासतापास, आहारविहाराचे नियम याची भगवंताच्या प्राप्तीला काही गरज आहे, असं मला तरी दिसत नाही. भगवंताच्या प्राप्तीसाठी प्रपंच, व्यवहार सोडणं, जंगलात जाणं किंवा संन्यास घेणं - याचीही मला गरज दिसत नाही. उलट भगवंताचं नामसंकीर्तन करणं किंवा नुसतं भगवंताचं नामस्मरण करणं एवढ्याशा छोट्या उपायानं भगवंत मिळतो, हे मला भगवंतानं दाखवून दिलं आहे.

किंबहुना भगवंताच्या साध्यासुध्या नामाव्यतिरिक्त इतर सारी साधनं गरजेची आहेत, असंसुद्धा मला वाटत नाही. या भगवंताच्या प्राप्तीसाठी एक नाम पुरेसं आहे, असं मला वाटतं. हा श्री तुकोबांचा अनुभव मननीय आहे.

ज्या ज्या वेळी आपल्याला असं दिसेल की, परमार्थासाठी वेगवेगळी साधनं, संपत्ती, माणसं यांची गरज निर्माण झाली आहे, त्या वेळी क्षणभर थांबून हा अभंग आपण म्हणावा आणि त्याचं मनन करावं, असं सुचवावंसं वाटतं. कारण प्रापंचिक माणूस म्हणून या अभंगाची गरज आपल्याला कधीही निर्माण होऊ शकते.

**

१६.

खरा आप्त

जन हे सुखाचे दिल्याघेतल्याचे । अंत हे काळीचे नाही कोणी ।।१।।
झाल्या हीन शक्ती नाकडोळे गळती । सांडोनिया पळती रांडापोरे ।।२।।
बाईल म्हणे खर मरता तरी बरे । नासिले हे घर थुंकोनिया ।।३।।
तुका म्हणे माझी नव्हतील कोणी । तुज चक्रपाणी वाचूनिया ।।४।।

***

वास्तविक मनुष्य प्रपंचातून थोडा परमार्थाकडं वळतो तो बहुधा प्रपंचाच्या अपूर्णतेचा थोडाफार अनुभव आल्यामुळंच. अनेकदा त्यातल्या क्षणभंगुरतेचा त्याला अनुभव येतो, त्यातल्या जगाच्या आत्यंतिक स्वार्थीपणाचा, मतलबीपणाचा, संधीसाधूपणाचा त्याला दुःखद अनुभव येतो, अनेकदा त्यातल्या त्याच्या भयाण एकाकीपणाची जाणीव त्याला होते, तर अनेकदा भोवतालच्या माणसांच्या क्षुद्रतेचा आणि स्वार्थाचा अनुभव त्याला येतो. यानं त्याच्या मनात कुठंतरी शाश्वततेचा, खऱ्या निरुपाधिक आनंदाचा शोध आपण घ्यावा, अशी तळमळ सुरू होते. त्यामुळं तो ज्या प्रांताकडं वळतो तो परमार्थाचा प्रांत असतो. त्यामुळं केवळ भगवंताच्या जिज्ञासेनं या विषयाकडं वळलेल्या लोकांपेक्षा कितीतरी पट लोक हे खरे या जगाच्या अनुभवानं अंतर्मुख होऊन वळलेलेच लोक असतात, असं आढळून येईल.

मग या प्रवासात एकदा या दुःखद अनुभवानंतरच आलेल्या माणसाला पुन्हा प्रपंचातल्या माणसांचा अनुभव दुःखद आहे, हे सांगण्याची काही गरज आहे का? तशी गरज नसेल तर इतके मौलिक अभंग

पाहिल्यानंतर पुन्हा एकदा 'जन हे सुखाचे'सारखा जगाचा दुःखद अनुभव परखडपणे मांडणारा अभंग अभ्यासाला घ्यायचं काही कारण आहे का, असं वाटणं स्वाभाविक आहे.

त्याचं कारणही पुन्हा माणसाच्या स्वभावातच दडलेलं आहे. ते स्पष्ट होण्यासाठी श्री समर्थ रामदास स्वामींनी एके ठिकाणी केलेली तुलना नक्कीच पाहाण्यासारखी आहे. दासबोधात ते म्हणतात की, एखादा माणूस अवगुणी, निकृष्ट असला तर आपण काही वेळा त्याला दगडाची उपमा देतो.

पण सूक्ष्म विचार करून पाहिलं, तर हा दगडावरही थोडा अन्यायच होतो, असं आढळून येईल. कारण एखादा अनुभव जसा त्याज्य समजून टाकावा, तसा जर एखादा भाग हिणकस, त्याज्य, अनावश्यक म्हणून दगडापासून कापून काढून टाकला आणि मध्ये काही काळ गेला, तर तो एकदा काढून टाकलेला भाग त्या दगडाला परत चिकटत नाही. माणसाचं तसं नाही. एखादा अवगुण त्यानं सोडला तर तो त्या अवगुणापासून कायमचा मुक्त झाला, असं होत नाही. काही काळ गेल्यावर त्याच्या अंगी पुन्हा तो अवगुण दिसू लागतो. या अर्थानं पाहिलं तर दगडसुद्धा माणसापेक्षा श्रेष्ठच म्हणावा लागेल. तेव्हा अवगुणी माणसाला दगडाची उपमा देण्यात दगडावर अन्याय व्हायची शक्यता आहे.

ही माणसाची परिस्थिती त्या प्रपंचाच्या अनुभवाला, त्याच्या प्रपंचापासून मागं फिरण्यालाही लागू आहे. माणसं स्वार्थी असतात, मतलबी असतात - हा अनुभव येऊन, त्यानं उद्विग्न होऊन परमार्थाला लागलेला माणूस मनाचं ते आकलन, तो अनुभव टिकवू शकेलच, याची खात्री देता येणं कठीण आहे. काही काळानं तो सारा अनुभव विसरून, पुन्हा माणसांच्या, पैशाच्या आणि मानमान्यतेच्या नादाला लागणार नाही,

याची खात्री देता येत नाही. पुन्हा तो या साऱ्यात अडकू शकेल. हे लक्षात घेतलं, तर भले त्याला भक्तीच्या मार्गातले धोके कळले असतील, खाचखळगे कळले असतील, देहाबद्दल योग्य ती जाणीव आली असेल, त्याला आयुष्याचं मोल कळलं असेल, खऱ्या भक्तीची कल्पना आली असेल - पण त्याच्या हे वारंवार लक्षात आणून देणं गरजेचं आहे की, माणसांच्या या महाजालात तो खरा एकटाच आहे आणि त्याचा म्हणून खराखुरा एकच खात्रीचा आधार व मित्र आहे, सुहृद आहे तो म्हणजे चक्रपाणी भगवंत!

या अभंगात श्री तुकोबा जो अनुभव वर्णन करतात, तो मननीय आहे, अगदी निम्मी वाटचाल करणाऱ्या माणसालाही मननीय आहे. याचं कारण असं की, माणूस प्रपंचात माणसांच्यात असतो, प्रपंच तो चार माणसांच्या साहाय्यानं करतो आणि परमार्थात तो बिनमाणसांचा असतो का? वास्तविक श्री गोंदवलेकर महाराज म्हणत तसा परमार्थ हा खरा एकट्याचा, एकट्याशीच व्यवहार-खेळ आहे. ते तर आदर्श म्हणून बरोबरच आहे. परंतु तिथंही सर्वसामान्य माणसाला माणसांच्या सोबतीशिवाय, निदान सुरुवातीला तरी, जमत नाही.

मग ते मार्गदर्शक असोत, गुरू असोत, बरोबरीचे साधक असोत, त्याला मानणारे शिष्य असोत, गुरुबंधू असोत, गुरुभगिनी असोत, तो ज्यांचं ऐकतो ते प्रवचनकार असोत, नाहीतर त्याचं जे ऐकतात ते श्रोते असोत. पुन्हा इथंही त्याला माणसांची सोबतसंगत आहे. त्यात जे प्रपंचात झालं, तेच व्हायची शक्यताही आहे. माणूस त्यातही कुठं गुंतेल, कुणावर विसंबून राहील, कुणी त्याचा फायदा घेईल, कुणी त्याला जीव लावील, कुणी त्याच्याशी स्वार्थीपणानं वागेल - एक ना दोन. पण त्यामुळं पुन्हा त्याला 'माणसा'चा अनुभव तोच येईल. म्हणून इथंही हाच अनुभव,

हाच अभंग लागू होईल, लक्षात ठेवावा लागेल.

क्षेत्र कुठलंही असो, हे लक्षातच ठेवावं लागेल की, लोक हे शेवटी देवघेवीचा व्यवहार करणार. वेळ आली, त्यांचं काम झालं की तुम्हाला टाकून जाणार, तुमच्यापासून त्यांचा काही फायदा होत असेल तर तुमच्यावर 'प्रेम' करणार, तुमच्यापासून त्यांना त्रास व्हायला लागला, त्यांच्या स्वार्थाला-मीपणाला धक्का बसायला लागला की, मग 'खर मरता तरी बरे' 'ही कटकट जाईल तर बरं होईल' असं म्हणून तुम्हाला टाळल्याशिवाय राहाणार नाहीत. अशी माणसं प्रपंचात घरातल्या माणसाचा उपयोग संपला की, त्याच्याबद्दल आरडाओरडा करतील, त्याला फेकून देतील यात नवल नाही. त्यांच्या तथाकथित परमार्थातसुद्धा ती तशीच वागतील, हे लक्षात ठेवण्यासारखं आहे.

म्हणून या अभंगात श्री तुकोबांनी जे शेवटी म्हटलं आहे की, इकडं काय तिकडं काय, हे लक्षात ठेवावं की, एक भगवंताशिवाय खरं माझं असं कुणी नाही. जी गोष्ट भगवंताच्या बाबतीत आहे, तीच सत्पुरुषांच्या, संतांच्या, एखाद्या शुद्ध सात्त्विक साधकाच्या बाबतीतही असू शकेल. तो खरा तुमचा असेल, तुमच्यावर निरपेक्षपणे प्रेम करीत असू शकेल, सदैव तुमचं खरं कल्याणच चिंतीत असू शकेल. त्याचा भरवसा सोडला तर मात्र बाकी सारा मायाबाजार आहे. हे लक्षात ठेवून एका भगवंताचं होऊन जगणं आणि याबद्दल सतत सावधान राहाणं गरजेचं आहे, हे नक्कीच.

**

१७.
एकच ओढ

घेसी तरी घेई संतांची हे भेटी । आणीक ते गोष्टी नको मना ।।१।।
सर्वभावे त्यांचे देव भांडवल । आणिक ते बोल न बोलती ।।२।।
करशील तो करी संतांचा सांगात । आणिक ते मात नको मना ।।३।।
बैससी तरी बैस संतांचे मधी । आणीक ते बुद्धी नको मना ।।४।।
जासी तरी जाई संतांचिया गावा । होईल विसावा तेथे मना ।।५।।
तुका म्हणे संत सुखाचे सागर । मना निरंतर धणी घेई ।।६।।

***

परमार्थात काय वा प्रपंचात काय बाहेरच्या साऱ्या व्यवहाराला 'मन' कारण असतं. त्याच्या ठिकाणी जशा जशा इच्छा उत्पन्न होतात, तसे तसे व्यवहार माणूस करतो, हा आपला अनुभव आहे. एखादी गोष्ट करावी असं मनानं घेतलं, तर मग बाह्यत: कितीही अडचणी असल्या तरी मनाची शक्ती त्याला साधारणत: जुमानत नाही, ती त्यातून मार्ग काढते आणि अवघड नि अडचणीचे वाटणारे निर्णयसुद्धा अंमलात आणते. मग साध्या सोप्या गोष्टी करू शकण्याची मनाची ताकत तर सोडूनच द्या.

त्याचबरोबर हेही आहे की, मनानं जर एखादी गोष्ट करायची नाही असं ठरवलेलं असेल, तर मग अशी गोष्ट कितीही सोपी असो, सहज शक्य असो मन ती गोष्ट नाहीच करीत. मग त्यासाठी ते कारण सांगेल, विरोध पत्करेल, वाईटपणा घेईल, काही विचारू नका.

मनाची ही जी दुहेरी ताकत आहे, ती ओळखून श्री तुकोबा तिचा वापर परमार्थासाठी कसा करावा याचा जणु वस्तुपाठच या अभंगात

देत आहेत. परमार्थात बराचसा भाग मनाचा अशासाठी आहे की, व्यवहारातले मोठे बदल परमार्थात अपेक्षित नसले तरी त्याच व्यवहारांकडं बघण्याची माणसाची दृष्टी बदलणं मात्र अपेक्षित आहे. म्हणून हा मनाचा सेटअप किंवा ठेवण बदलायला मनाला जे जे वातावरण देण्याची गरज सत्पुरुषांना वाटते, त्यात तीर्थयात्रा, देवदर्शनं, यज्ञयागापेक्षासुद्धा सत्संगाचं वातावरण देण्याची गरज ही सर्वांत मोठी आणि प्रधान वाटते. त्याचं कारण असं की, संत हे भगवंताचे मूर्तिमंत अवतारच होत.

भगवंत ही तशी निर्गुण आणि अदृश्यातली गोष्ट. त्यामुळं तिचा ना पाठपुरावा करता येत, ना गाठभेट घेता येत. पण त्या निर्गुण सत्तेचा स्थूल, आपल्याला कळण्यासारखा, जवळ जाता येण्यासारखा, अनुकरण करण्यासारखा मार्ग म्हणजे 'संत', 'सत्पुरुष' होत. त्यांच्या प्रत्यक्ष संपर्कानं जो परिणाम होतो तो खरोखरच अतुलनीय आहे. तो परिणाम स्थूलही आहे आणि सूक्ष्मही आहे. तो स्थूल शरीरव्यवहारावर परिणाम करील तसा साधकाच्या सूक्ष्म मनोव्यापारावरही विधायक परिणाम करील.

संत हे एक प्रकारचे धगधगते सूर्य किंवा अग्निकुंड असतात. त्यांच्यात अग्नीचा ताप नसला तरी भगवत्प्रेमाची ऊब सदैव असते. त्यामुळं कितीही प्रापंचिक मन घेऊन माणूस त्यांच्याकडं गेला तरी नकळतसुद्धा त्याच्यावर काही परिणाम झाल्यावाचून राहात नाही. त्यातून साधकभावानं, जिज्ञासेनं किंवा तळमळीनं एखादा गेला तर त्याला फायदाच फायदा होईल, यात नवल नाही.

संतांना एखाद्या वाहनासारखी स्वत:ची एक गती असते आणि त्या गतीनं त्यांच्या मनाचा सतत, प्रत्येक क्षणी भगवंताकडं प्रवास होत असतो. त्यामुळं जो जो त्यांच्या सान्निध्यात येतो त्याला एखाद्या चालत्या गाडीत आपण बसावं आणि ती गती आपल्याला प्राप्त व्हावी, तशी

त्याची स्थिती होते. भले असा सहवासात आलेला माणूस अगदी मंद बुद्धीचा म्हणजे मंद गतीनं चालणारा असो, वेळी अगदी पांगळा असो, तो एकदा गाडीत चढल्यावर जसा गाडीच्या वेगानं जातो, तशी अवस्था संतांच्या संगतीत आलेल्या सामान्य माणसाची होते. बरं, यात त्याचं काही कर्तृत्व म्हणावं तर सहवासात येण्याचे कष्ट घेण्यापलीकडं काहीच नाही. पुढचं सारं काम, कर्तृत्व या सत्पुरुषाचं असतं.

म्हणूनच अनेकदा असं आढळेल की, संतांच्या सहवासानं एरवी साधनेनं सामान्य वाटणारी, साधीसाधी वाटणारी अनेक माणसंसुद्धा एखाद्या योग्याच्या तोडीची स्थिती प्राप्त करून जाताना दिसतात. श्री गोंदवलेकर महाराज म्हणत तसा प्रथम वर्गाचं तिकीट काढून गाडीत बसणारा, म्हणजे संत सांगतील तसं साधन करण्याचे कष्ट घेणारा माणूस जसा गाडीत बसून मुक्कामाला जातो, तशी गाडीतील सगळ्या वर्गाची माणसंच काय, पण वेळी बिनतिकिटाची माणसंसुद्धा केवळ गाडीची संगत केल्यानं मुक्कामाला पोचतात, उद्धरून जातात. अर्थात आपण इतकं बिनसाधनाचं - बिनतिकिटाचं असू नयेच, पण इतकी गुणकारी 'संतसंगत' साधकाला सदैव शिफारस करण्याजोगी वाटली, तर त्यात आश्चर्य नाही.

श्री तुकोबा मनाचा स्वभाव लक्षात घेऊन प्रस्तुत अभंगात त्याला सांगतात की,'संत सुखाचे सागर' आहेत. तेव्हा तू काहीही कर, पण त्यांची संगत कर. पहिल्या परिच्छेदात पाहिल्याप्रमाणं श्री तुकोबांना ही कल्पना आहे की, एकदा का माणसाच्या मनानं घेतलं की, ती गोष्ट साध्य केल्याशिवाय ते राहणार नाही. साधकाच्या बुद्धीला कितीही पटलं, तिनं कितीही ठरवलं तरी खरा निर्णय होणार आहे, अंमल होणार आहे तो मनाकडून ! त्यानं जर एकदा हे मनावर घेतलं, तर ते घडलंच म्हणून समजा आणि ते जर एकदा घडलं, तर पुढं म्हटल्याप्रमाणं उरलेलं सारं

करायला ही 'संतसंगत' समर्थ आहेच.

म्हणून श्री तुकोबा या अभंगात मनाला म्हणतात की, तुला कुणाची तरी भेट घ्यावीशी वाटते ना, मग संतांचीच घे, तुला गप्पागोष्टी कराव्याशा वाटतात ना, मग ज्यांच्या बोलण्यात देवाशिवाय दुसरा विषय नाही त्या संतांशीच बोल, चार लोकांत जाऊन बसावंसं वाटतं ना, मग संतांच्या सहवासात जाऊन बैस, तुला गावोगावी जावंसं वाटतं ना, मग संत ज्या गावी राहातात, भेटतात अशी गावंच निवड, अशाच गावी जा, तुला कुणाच्या ना कुणाच्या सहवासात सतत राहावं असं वाटतं, तुला एकटं करमत नाही ना, मग जरूर दुसऱ्यांच्या सहवासात जा, पण ते दुसरे म्हणजे संतच आहेत ना, ते पहा. सहवासात राहावंसंच वाटतं आहे तर संतांच्याच सहवासात राहाण्याचा प्रयत्न कर. कारण इतर कुणाच्याही सहवासात गेलास, तर ते अखेर उद्वेगाला कारण होईल. पण इथं मात्र चित्ताला खरी विश्रांती, खरा विसावा, खरा आनंद होईल.

श्री तुकोबांचं सांगणं हे आपणही आपल्या मनाला रोज सांगण्यासारखं आहे. सतत मन ते ऐकत राहील, तर त्याला हळूहळू ती ओढ लागेल आणि अखेर त्यांच्यासारखी ती 'संतसंगती'ची 'एकच ओढ' उरेल, ज्यानं आपलंच हित होईल.

**

१८.
देवाची आगळी खूण

देवाची ते खूण आला ज्याच्या घरा । त्याच्या पडे चिरा मनुष्यपणा ।।१।।
देवाची ते खूण गुंतो नेदी आशा । ममतेच्या पाशा शिवो नेदी ।।२।।
देवाची ते खूण झाला जया संग । त्याच्या झाला भंग मनुष्यपणा ।।३।।
देवाची ते खूण करावे तोंडाळ । आणि हे सकळ जग हरी ।।४।।
देवाची ते खूण गुंतो वेदी वाचा । लागो असत्याचा मळ नेदी ।।५।।
पहा देवे तेचि बळकाविले स्थळ । तुक्यापे सकळ चिन्हे त्याची ।।६।।

***

सामान्य माणूस 'देवा'च्या विचाराकडं वळतो तो काही एक कल्पना घेऊनच. एक तर तो प्रापंचिक दु:खानं, अनुभवानं पोळलेला असतो म्हणून त्याला मार्ग मिळावा आणि तो मार्ग देणारा भगवंत आहे या भूमिकेनं किंवा काही माणसं 'देव' ही काय कल्पना आहे, त्याचं स्वरूप काय आहे, ते जाणून घ्यावं, त्याचा काही अनुभव येत असेल तर तो पाहावा या जिज्ञासेच्या भूमिकेतून देवाकडं वळलेले असतात. भक्तांचे जरी चार वर्ग गीतेनं केलेले असले तरी हे दोन मोठे वर्ग आपल्याला नेहमी आढळतात, म्हणून त्यांचा विचार केला आहे. या दोनही प्रकारातल्या माणसांच्या देवाविषयी, त्याच्या कर्तृत्वाविषयी, स्वरूपाविषयी काही वाचून, ऐकून, पाहून - काही अस्पष्ट का होईना, चित्र घेऊनच तो 'देव' जाणून घ्यायला जातो.

त्याच्या कल्पनांत काही काही कल्पना मुख्य असतात. त्यांत देव हा सर्वांत सामर्थ्यवान असणं, त्याच्या उपासनेनं तो प्रसन्न होणं, मग

त्यानं आपली सारी दुःख दूर करणं, आपल्या साऱ्या अडचणी निवारणं, किंबहुना आपल्याला देव भेटल्यामुळं आपणही जगामध्ये कुणी सामर्थ्यवान, मोठं होणं - अशा काही कल्पना असतात. त्यामुळं तो 'देव' समजून घ्यायला जावो किंवा उपासनेनं 'देव' प्राप्त करायला जावो, तो यांतल्या काही 'खुणा' आपल्याला मिळतात की नाही, हे कळत नकळत पाहातच असतो.

असं म्हणायचं कारण असं की, आपण अशी भाषा अनेकदा ऐकली असेल की, 'आता देवाचं अगदी नियमानं करतो आहे, त्यामुळं तब्येतीला उतार पडतो आहे का पाहू या', 'आता उपासना सुरू केली आहे, नोकरीचं काम होतंय का पाहू या', 'इतक्या इतक्या प्रदक्षिणा रोज घालतो आहे, एवढा जप रोज करतो आहे, एवढ्या एवढ्या पूर्णिमा करतो आहे, मुलीच्या लग्नाचं जमतं आहे का पाहू या' - या आणि अशांसारख्या अनेक 'खुणा' माणूस कळत नकळत ताडून पाहात असतो, अपेक्षित करीत असतो. याचाच अर्थ त्यानं देवाच्या प्राप्तीच्या, त्याला प्रसन्न करून घेण्याच्या, देवाच्या कृपेच्या काही खुणा नकळत का होईना, गृहीत धरल्या आहेत, हे उघड आहे.

याची दुसरीही बाजू जाता जाता पाहिलेली बरी. ती अशी की, अनेकदा वर सांगितली तशी विविध कामं, विविध प्रकारच्या उपासना करूनही काही 'खुणा' मिळत नसतील, काही परिणाम घडत नसतील, तर अशा काही प्रतिक्रियाही आपण आजूबाजूला ऐकत असतो की, 'इतकं देवाचं करतो आहे, पण मुलीचं लग्न कुठं जमायला तयार नाही, तब्येतीला अजून उतार नाही, अजून नोकरी मिळत नाही' इत्यादी इत्यादी आणि त्यामुळंच पुढं अनेकांनी 'देव' किंवा 'देवाचं करणं' सोडल्याचंही आपल्याला आढळेल. या झाल्या आपल्या सामान्यांच्या किंवा रूढ

कल्पना. पण देवाच्या किंवा देवाच्या प्राप्तीच्या खऱ्या खुणा याच आहेत का, याचा मात्र विचार करणं अत्यंत गरजेचं आहे. तेच नेमकं या अभंगात श्री तुकोबा करीत आहेत.

ते म्हणतात की, ज्याला देवाची प्राप्ती होईल त्याच्या ठायी 'मनुष्यपण' उरणार नाही. या पहिल्या आणि एकंदरीतच प्रधान खुणेवरून लक्षात येईल की, श्री तुकोबांचं मत या बाबतीत बरंच वेगळं आहे. आपली कल्पना आहे की, देव भेटल्यानं आपल्या साऱ्या इच्छा पूर्ण होतील, आपल्याला लौकिक मानमान्यता मिळेल, आपल्याला काही शक्ती-सामर्थ्य प्राप्त होईल - वगैरे वगैरे. म्हणजे यात आपण स्वतः हे सगळं घ्यायला, अनुभवायला राहू असं गृहीत धरलेलं आहे. म्हणून तर ते सगळं मिळण्याचं कौतुक आहे, अनुभवाचा आनंद आहे.

पण श्री तुकोबांनी वेगवेगळ्या मार्गांनी ज्या खुणा या अभंगातून मांडल्या आहेत त्यांचा सारांश असा आहे की, मुळात आपल्या ठिकाणी जे मनुष्यपण किंवा मीपण आहे तेच उरत नाही आणि हीच देवाच्या प्राप्तीची प्रधान खूण आहे. आपल्या तर साऱ्या खुणा या मनुष्यपणावर, वेगळेपणावर, मीपणावर अवलंबून आहेत. माझं काम, माझं भलं, मला सुखाचं होणं, माझ्या माणसांची कामं होणं वगैरेमध्ये 'मी' गृहीत धरलेला आहे. तोच जर नसेल, तर फक्त कल्याण व्हावं असं वाटेल आणि कुणाचंही कल्याण झालं, तरी आनंदच वाटेल.

म्हणजे या देवप्राप्तीत मोठाच फरक आहे. तो देव येतो, एखाद्याला भेटतो तेव्हा तो त्याच्या ठिकाणचा हा संकुचित मनुष्यपणा, त्याच्या साऱ्या वैयक्तिक सुखाच्या, आशा-आकांक्षांच्या, ममत्वाच्या, स्वार्थाच्या साऱ्या कल्पना संपूवन टाकतो. म्हणून ते पुढं म्हणतात, 'देवाची ते खूण गुंतो नेदी आशा, ममतेच्या पाशा शिवो नेदी !'

मग अशा माणसाचा व्यवहार हा साध्या माणसाचा व्यवहार राहाणार नाही, तो देवमाणसाचा व्यवहार होईल, हे उघड आहे. म्हणून पुढं एरवी जसा सामान्य माणूस स्वत:बद्दल, स्वत:च्या कामाबद्दल बोलेल तसा तो माणूसही बोलेल, पण जगाच्या कामाबद्दल बोलेल, वरवरचं नव्हे तसं ते आतून येईल. असत्याचा वारासुद्धा त्या वाचेला लागणार नाही. हा आपला, हा परका हा विचार त्याच्या मनात येणार नाही. त्याला 'सकळ जग हरी' असा अनुभव येईल. एकूण एकदा देवाची प्राप्ती झाली की, माणसाचं अंतर्बाह्य रूपांतर होऊन जाईल, असं श्री तुकोबांनी मांडलं आहे. ते नुसतं मांडलेलं आहे असंही नाही, तर तसा त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. हे शेवटच्या ओळीत त्यांनी स्पष्ट केलं आहेच.

या अभंगामुळं एक नक्की घडेल की, कुणी देवाचा अनुभव त्याला आला म्हणत असेल, तर त्याच्या एरवीच्या आणि इथं सांगितलेल्या खुणा आपण ताडून पाहू शकू. त्याचबरोबर आपल्यालाही देवाची प्राप्ती हवी असेल, त्याचा अनुभव हवा असेल तर आपली संकुचित मनुष्यपणा सोडायची तयारी आपल्याला ठेवावी लागेल. शिवाय काय घडलं तर हा अनुभव आपल्याला आला असं म्हणता येईल, तेही आपल्यासमोर सदैव राहील आणि ते आपली दिशाभूल, भ्रम वाचवील.

**

१९.
त्यागाची तयारी

न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ।।१।।
ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणीक लोकांसी हेचि सांगे ।।२।।
विटंबो शरीर होत का विपत्ती । परी राहो चित्ती नारायण ।।३।।
तुका म्हणे नाशिवंत हे सकळ । आठवे गोपाळ तेचि हित ।।४।।

***

ज्यांना भक्ती हा फारच सोपा मार्ग वाटतो किंवा ज्या वेळी आपल्याला भक्ती हा मार्ग फार सोपा वाटायला लागतो, तेव्हा हा अभंग मधूनमधून नजरेसमोर अवश्य ठेवावा असा आहे. एका बाजूनं कर्ममार्गामध्ये काही अंगभूत अडचणी आणि व्याप आहेत. उदाहरणार्थ, कर्माला अनुकूल शारीरिक स्थिती, कर्माची माहिती, कर्माची साधनं, त्याला लागणारा वेळ, त्यातले प्रत्यक्ष कष्ट, त्याला लागणारं अनेक घटकांचं सहकार्य - एक ना दोन बरेच व्याप आणि अर्थातच तेवढ्याच अडचणीही आहेत.

तीच गोष्ट ज्ञानमार्गाचीही आहे. त्यासाठी लागणारी बौद्धिक कुवत, मार्गदर्शक, योग्य ती ज्ञानाची साधनं, अखंड व्यासंग - अशा अनेक गोष्टी. अर्थातच त्यात येणाऱ्या अडचणीही तितक्याच प्रकारच्या. तीच गोष्ट योगमार्गाचीही आहे. त्यालाही आवश्यक ती शारीरिक पूर्वतयारी, अनेक प्रकारची शारीरिक-मानसिक बंधनं, कठोर आणि सातत्याचे प्रयत्न, सततचं योग्य व अधिकारी माणसाचं मार्गदर्शन अशा अनेक बाबी आणि अर्थातच त्यातून निर्माण होणाऱ्या अडचणीसुद्धा.

या साऱ्या पार्श्वभूमीवर साध्यासाध्या, जमेल तशा पद्धतीनं,

कुणीही कशाही पद्धतीनं चालाव्या अशा सोप्या मार्गानं - पुढं नेणारा भक्तीचा मार्ग कुणालाही विनात्रासाचा, सहजसोपा वाटला तर त्यात नवल नाही. त्यात ना विशिष्ट दैवताचं बंधन, ना विशिष्ट मंत्राचं बंधन, ना यात्राव्रतांचा विशिष्ट आग्रह - अशा अनेक प्रकारांमुळं हा 'भक्तिमार्ग' तसा प्रथमदर्शनी फार सुलभ वाटतो. बाह्यतः त्या मार्गात विशिष्ट असं काही करायचं नसल्यानं व्यापही कमी आणि अर्थात अडचणीही कमी वाटतात.

तरीही आपण चौदाव्या अभंगात पाहिल्याप्रमाणं तशी ही भक्तीसुद्धा 'सुळावरची पोळी' आहे, हेही श्री तुकोबांनीच बजावलं आहे. याचा अर्थ काय? तो अर्थ या अभंगाच्या निमित्तानं आणि स्वतः तुकोबांच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या निमित्तानं समोर येतो आहे. त्यामुळं 'आपला काय सोपा सुलभ भक्तिमार्ग आहे' अशा भ्रमात राहाण्यात अर्थ नाही. कारण या अभंगात श्री तुकोबांनी भक्तीसाठी जे करण्याची तयारी स्वतः दर्शवली आहे, ती अभ्यासली म्हणजे आपल्याला भक्तीची, तिच्या सोपेपणाची खरी कल्पना येईल, असं वाटतं.

या अभंगात भक्तीसाठी आपली जी तयारी दर्शवली आहे तिच्यात चार लक्षणीय गोष्टी आहेत. सर्वांत प्रथम आहे ती 'विटंबो शरीर' ही आहे. तसं पाहिलं तर, सर्वसामान्य माणूस सतत सावध असतो तो देहाच्या नि देहसुखाच्या बाबतीत ! त्यात जरा इकडं तिकडं झालं की, त्याला अस्वस्थता येते. त्याला ते चालत नाही. पण इथं श्री तुकोबा जी तयारी दाखवताहेत ती साध्यासुध्या शरीराच्या, देहसुखाच्या बाबतीतल्या त्रासाची नाही, तर चक्क 'विटंबने'ची आहे. म्हणजे पराकाष्ठेच्या शरीरत्रासापर्यंतची आहे.

दुसरी बाब, ते शरीर ज्या 'अन्ना'वर चालतं त्या बाबतीतली

आहे. देवाच्या भक्तीत, ती करताना मला 'अन्नपाणी' नाही मिळालं तरी चालेल, असं ते म्हणतात. त्या बाबतीत आपली परिस्थिती पाहिली, त्यागाची तयारी पाहिली, तर तीही उलटच असलेली दिसेल.

एखाद्या यात्रेला गेलो, देवदर्शनाला गेलो, कुठं त्या ठिकाणच्या अडीअडचणींमुळं म्हणा किंवा अव्यवस्थेमुळं म्हणा किंवा आपल्यालाच प्रवास-कामं यापुढं वेळ मिळाला नाही म्हणून म्हणा - जर एखादे दिवशी दुपारी जेवण मिळालं नाही, तर एकदा जेवणाची वेळ टळून गेल्यावर आपल्याला अस्वस्थता येते, आपली तक्रार सुरू होते - ती पुन्हा नुसतं जेवण मिळालं तरी थांबत नाही. पुढंही भरल्या पोटीसुद्धा बराच काळ त्या दुपारी आपल्याला झालेल्या त्रासाचा विषय चालू राहून, ती तक्रार सुरूच राहाते. अशा वेळी 'न मिळो खावया' म्हणणं म्हणजे काय, हे कळू शकेल.

तीच गोष्ट 'न वाढो संतान'ची आहे. दुर्दैवानं किंवा प्रारब्धयोगानं एखाद्याला मूलबाळ नसलं किंवा एखाद्याचं झालेलं मूलबाळ ठीक वाढलं नाही, त्याला काही व्यंग आलं - तर त्या माणसाची होणारी मन:स्थिती आपण समजू शकतो. पण एखाद्या खऱ्या भक्ताच्या वाट्याला हे आलं तरी तोही सामान्य माणसासारखा या सुखावर पाणी सोडायला तयार होत नाही किंवा ते परमेश्वराची इच्छा म्हणून स्वीकारायला तयार होत नाही, असाच अनेकदा अनुभव येतो. उलट सामान्य माणूस कुणाला दोष देणार नाही, काम व्हावं, मूल व्हावं म्हणून गळ घालणार नाही. आमचा भक्त भगवंताला गळही घालील अन् दोषही देईल. पण श्री तुकोबांना भगवंतापुढं, त्याच्या प्राप्तीपुढं, कृपेपुढं मला अन्नपाणी नसलं तरी चालेल, मला मूलबाळ नसलं तरी चालेल असं वाटतं, हे लक्षात घ्यावं असं आहे.

तेच आपल्यावर येणाऱ्या संकटांबद्दल. सामान्य माणसाला संकटं

नको वाटतात, हे आपण समजू शकतो, पण आपल्यासारख्या भक्तालाही ती नकोशी वाटतात, हे लक्षात घेण्याजोगं आहे. श्री तुकोबांना मात्र 'होत का विपत्ती' संकटं असेनात का, पण चित्तात भगवंत टिकून राहू दे, असं वाटतं. ही भक्तीतली त्यागाची तयारी आहे. आपण म्हणू, चित्तात नारायण नसला तरी एकवेळ चालेल पण संकटं, त्रास मात्र टळू द्या. अशा वेळी श्री तुकोबांनी दाखवलेली संकटांची तयारी ही आपण शिकण्यासारखी आहे, असंच म्हणावं लागेल.

अभंगाच्या अखेरीस श्री तुकोबांनी मांडलेला विचार मननीय आहे. ज्या ज्या गोष्टींची आपली त्यागाची तयारी नाही, उदाहरणार्थ, वर पाहिल्याप्रमाणं शरीर, त्याचं सुख, खाणंपिणं, मुलंबाळं, आपत्ती-विपत्ती या साऱ्या गोष्टी खऱ्या न टिकणाऱ्या आहेत. पण हे सत्य न पटल्यामुळं आपण त्यांना काही होऊ नये, ते सारं अबाधित राहावं यासाठी धडपडतो. पण श्री तुकोबा त्यांचं मोल, शाश्वतता जाणून आहेत. म्हणून ते म्हणतात की, 'नाशिवंत हे सकळ' आणि त्यामुळं जे शाश्वत आहे, खरं टिकणारं आहे आणि त्यामुळंच आपण ज्याच्या मागं लागावं असं आहे - ते 'भगवंताचं स्मरण' टिकवणं, त्यासाठी धडपडणं आणि कुठल्याही प्रतिकूल परिस्थितीतही ते सोडायला तयार न होणं हेच हिताचं ठरेल आणि तीच खरी भक्ती होईल.

**

२०.
एकच चिंता

संतांचा पढिया वो कैशापरी लाहो । नामाचा आठवो कैसा राहे ।।१।।
हेचि थोर चिंता लागली मनासी । निजता निद्रेसी नलगे डोळा ।।२।।
जेविता जेवणी नलगे गोड धड । वाटते काबाड विषयसुख ।।३।।
ऐशिया संकटी पावे कृपानिधी । लावी संतपदी प्रेमभावे ।।४।।
तुका म्हणे आम्ही नेणो काही हित । तुजवीण अनाथ पांडुरंगा ।।५।।

***

खऱ्या साधकाला जर साधना योग्य दिशेनं चालली असेल तर त्याच्या अनेक खुणा अनुभवायला मिळत असतात. या अभंगामध्ये अशा पाच महत्त्वाच्या खुणा श्री तुकोबांच्या अनुभवामुळं आपल्याला कळतात.

सर्वसामान्य माणसाला रात्रंदिवस चिंतेचा अनुभव आहे. चिंता नाही असा माणूस विरळाच. तुकोबांसारख्या सत्पुरुषांनाही चिंता आहे. सामान्य माणसाला जसं चिंता लागली की, जेवणखाण सुचू नये, झोप लागू नये, इतर गोष्टींतलं मन उडावं, तशीच अवस्था श्री तुकोबांचीही आहे. या अभंगात म्टल्याप्रमाणं, 'हेचि थोर चिंता लागली मनासी । निजता निद्रेसी नलगे डोळा । जेविता जेवणी नलगे गोड धड ।' हा अनुभव सामान्य माणसाला येणारा अनुभवच म्हणावा लागेल. फरक आहे तो चिंतेच्या विषयात आहे, असं लक्षात येईल.

सामान्य माणसाच्या चिंतेचे विषय हे कदाचित पैशाची नड, मुलीचं न जमणारं लग्न, घराचं अर्धवट राहिलेलं बांधकाम, कधीही जाऊ शकणारी नोकरी - हे किंवा अशा प्रकारचे असतात आणि इथंच

नेमका सामान्य माणूस आणि श्री तुकोबांसारखे थोर साधक, सत्पुरुष यांच्यातला फरक आहे.

या अभंगात म्हटल्याप्रमाणं श्री तुकोबांचे चिंतेचे विषय हे संतांची आवड मनाला कशी टिकेल, नामाचं स्मरण कसं राहील, हे आणि अशा सारखे आहेत. लौकिक प्रपंचामध्ये सामान्य माणसाप्रमाणं चिंता करण्यासारख्या गोष्टी श्री तुकोबांच्या वाट्याला नव्हत्या असं नक्कीच नाही. तशा तऱ्हेच्या लौकिक प्रपंचातल्या उणिवा, अभाव त्यांच्या वाट्याला खूप होते. पण त्यांचं मन इतरांसारखं त्या चिंतेनं ग्रस्त होत नव्हतं. याचं कारण त्यांना त्या विषयांचं महत्त्व सामान्य माणसाला वाटतं तितकं वाटत नव्हतं.

खऱ्या साधकानं मनाची ठेवण बदलून जे साधायचं, ते हेच. या गोष्टींना महत्त्व देण्याची जी मनाची प्रक्रिया आहे ती बदलल्यामुळं माझं अंतिम कल्याण कशात आहे आणि त्या कल्याणाच्या आड काय येईल किंवा ते कल्याण साधायला काय काय करावं - तो खरा माझ्या चिंतेचा विषय असावा, असं या साधक मनाला वाटतं. इतर लौकिक चिंतेचे विषय हे फक्त सतत बदलत राहातात, पण चिंता कायम राहाते आणि ती चिंता करूनसुद्धा अंतिमतः निष्पन्न काहीच होत नाही. अंतिम कल्याणाच्या दृष्टीनं तर नाहीच नाही. याउलट आपण कल्याण साधून देणाऱ्या विषयांची जर चिंता केली, तर ते विषय मार्गी लागतात. चिंता संपते, मनुष्य निश्चिंततेचा म्हणजेच आनंदाचा अनुभव घेऊ शकतो आणि स्वतःचं अंतिम कल्याणही साधू शकतो.

म्हणून या अभंगाच्या निमित्तानं जाताजाता हेही पाहायला हरकत नाही की, आपल्याला ज्या विषयांची मोठी काळजी लागली आहे, ते विषय प्रापंचिक आहेत की पारमार्थिक ? प्रापंचिक असतील तर ते फक्त

आपलं आयुष्य खातील आणि आपण आहे तिथंच राहू. पण पारमार्थिक असतील तर त्यातून मार्ग निघेल, कृती घडेल आणि आपण पुढं जाऊ. यावरून इथं ज्या पाच खुणांचा उल्लेख सुरुवातीला केला, त्यांतली सर्वसामान्य माणसांना परिचित असलेली आणि पडताळून पाहाण्यासारखी चिंतेच्या विषयांची पहिली खूण आपल्याला शिकण्यासारखी आहे.

आपण साधनेत योग्य दिशेनं प्रगतिपथावर आहोत की नाही, हे ठरवायला उपयोगी पडणाऱ्या ज्या इतर गोष्टी या अभंगात येऊन जातात त्यांतली - संतांचा मनाला लागलेला छंद टिकून राहाणं - ही दुसरी महत्त्वाची खूण आहे. साधकाला दैवयोगानं कुठंतरी सत्पुरुषाची भेट होते किंवा ग्रंथांतून किंवा इतर माध्यमातून त्यांचा संपर्क येतो, मनाला त्यांचं महत्त्व वाटतं, त्यांची ओढ वाटते त्याक्षणी तरी आपण या संपर्कात राहावं असं वाटतं.

पण त्याला व्यवहाराच्या अनेक मर्यादा असतात. त्यामुळं पुन्हा प्रपंचात गेल्यावर कालांतरानं हळूहळू संतांच्या ओढीचा ठसा पुसट होत जातो. मूळ प्रपंचस्वभाव वर येतो आणि साधकाची घसरण सुरू होते. म्हणूनच 'संतांची आवड ताजी राहाणं, टिकून राहाणं' ही अत्यंत गरजेची गोष्ट असते. ती आवड टिकून राहते की नाही किंवा टिकून राहाण्यासाठी आपण प्रयत्न करतो की नाही, यावरूनही आपली स्थिती कळते.

जी गोष्ट संतांची आवड टिकून राहाण्याची, तीच गोष्ट ती तिसरी खूण - 'नामाचे स्मरण' - या बाबतीतली. तेही तितक्याच कटाक्षानं टिकवून ठेवावं लागतं, तरच राहातं. म्हणून एक तर, नामाचं स्मरण टिकवण्याची आपली धडपड राहील, नसेल तर ते राहात नाही याची खंत व चिंता तरी राहील.

साधनेत जशी प्रगती होईल तशी वेगवेगळ्या वस्तू आणि

विषयांपासून मिळणाऱ्या सुखाबद्दलची ओढ कमी होणं - हाही श्री तुकोबांचा अनुभव चौथी खूण म्हणून शिकण्यासारखा आहे. भगवंताच्या व्यतिरिक्त ज्या ज्या गोष्टीत आपल्याला सुख वाटेल ती गोष्ट म्हणजे 'विषय' असं गृहीत धरण्यास हरकत नाही. भगवंतापुढं किंवा नामापुढं अशा तऱ्हेच्या विषयांचं सुख हे एखाद्या उत्तम पक्वान्नापुढं कडब्याचं सुख असावं, तसं वाटावं.

स्वत:चं हित मला कळतं असा एक दृढमूल भ्रम माणसाला आहे. तो नाहीसा होणं ही या अभंगातली पाचवी खूण. ती असं सांगते की - मला माझं स्वत:चं हित कशात आहे, हे कळत नाही, म्हणून मी तुला शरण आहे. ही वृत्ती साधकाच्या ठिकाणी निर्माण होणं हाही साधनेतला महत्त्वाचा टप्पा म्हणावा लागेल. त्या दृष्टीनं या अभंगातून मिळणाऱ्या या सर्व खुणा श्री तुकोबांच्या ठिकाणी प्रत्यक्ष आढळतात, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

**

२१.
अभिन्न भक्ती

प्रारब्ध क्रियमाण। भक्तां संचित नाही जाण ।।१।।
अवघा देवचि जाला पाही । भरोनिया अंतर्बाही ।।२।।
सत्त्व रज तम बाधा । नव्हे हरिभक्तांसि कदा ।।३।।
देवभक्तपण । तुका म्हणे नाही भिन्न ।।४।।

***

सामान्य माणूस काय किंवा साधक काय, तो अनेकदा हतबल होतो तो एका कारणामुळं. ते कारण असं की, प्रयत्न करूनही यश न येणं, प्रयत्न न घडताच काही अप्रिय गोष्टी वाट्याला येणं - अशा तऱ्हेच्या म्हणजे साधारणत: तर्काच्या चौकटीत किंवा सामान्य माणसाच्या आकलनात न येणाऱ्या गोष्टींपुढं माणसाला हतबल झाल्याचा अनुभव येतो. कारण सृष्टीमध्ये तसा कार्यकारणभाव भरून राहिलेला आहे. विशिष्ट गोष्टी केल्यावर विशिष्ट गोष्टीच घडतात आणि त्या तशा घडतात म्हणूनच माणसाचा व्यवहार शक्य आहे.

कर्म आलं की त्याचा परिणाम आला. कर्म तर माणसाला अटळ आहे. म्हणजेच परिणामही अटळ आहे. ही साखळी तशी अबाधितच राहील. ती तशी राहिली तर अर्थातच माणसाची सुटका त्यातून कधीच होणार नाही. कारण मागल्या कर्मांचे परिणाम भोगता भोगताच, तो नवी कर्मं करीत असतो. त्याचे परिणाम साठत राहतील. असे साठलेले परिणाम अखेर मनुष्य देह ठेवील त्या वेळीसुद्धा शिल्लक असतील, हे तर्कदृष्ट्यासुद्धा जाणवण्यासारखं आणि पटण्यासारखं आहे.

असं जे साठवलेलं भोगायचं शिल्लक राहिलेलं कर्म वा त्याचा परिणाम मृत्यूच्या वेळी मागं राहील, त्यालाच आपण 'संचित' म्हणतो. हेच 'संचित' घेऊन, माणूस अपरिहार्यपणे ते परिणाम भोगून संपवण्यासाठी देह धारण करील, हे उघड आहे. त्या जन्मीचं ते 'प्रारब्ध' राहील, ज्याचा प्रत्यक्ष भोग सुरू झालेला आहे.

म्हणून अनेकदा असं दिसतं की, ज्याची कारणं पाहू जाता या जन्मात सापडत नाहीत अशा घटना, असे आजार, अशी प्रगती, असे उत्कर्ष, अशी अपयशं माणसांच्या वाट्याला आलेली दिसतात. त्यांचा उलगडा, विशेषत: त्यांच्या कारणांचा उलगडा, न झाल्यानं माणूस त्यांना 'प्रारब्ध' म्हणतो, पण तो त्यापुढं हतबल होतो.

दुसऱ्या बाजूला स्वत:च्या कर्मांविषयी, त्याच्या या कर्मपरिणामांच्या मोठ्या विषयाबद्दल तो जागरूक नसतो. शिवाय दुसऱ्या बाजूनं, सध्याची चालू कर्मं अपरिहार्य असल्यानं, ज्याला आपण 'क्रियमाण' म्हणतो त्या क्रियमाणामुळं पुन्हा हा परिणामांचा ढीग वाढत जातो. जो बारकाईनं विचार करील, त्याच्या हे सहज लक्षात येईल की, पूर्वीचं आत्ता भोगणं आपण समजू शकतो, मग ते संचित असो वा प्रारब्ध असो. पण क्रियमाण मात्र अजूनही आपल्या हाती आहे. आत्ताची कर्मं करताना जर अशी करता आली की जी मागं काही परिणाम ठेवणार नाहीत, तर ही साखळी कुठंतरी थांबवता येईल.

आणि नेमकं इथंच भक्ताला काम शक्य आहे. म्हणून श्री तुकोबा या अभंगात म्हणतात की, 'प्रारब्ध क्रियमाण। भक्तां संचित नाही जाण ।' म्हणजे श्री तुकोबांचं म्हणणं तर असं आहे की, भक्ताला या साऱ्या सिद्धांतातलं काहीच लागू नाही. म्हणजे सामान्य माणूस नकळतपणे का होईना, या कर्म-परिणाम-कर्म या चक्रात बांधला गेलेला

आहे किंवा सुटण्याचे प्रयत्न करूनही तो त्या चक्रात बद्ध झालेला आहे. पण 'भक्त' मात्र या चक्रातून 'मुक्त' आहे. ही विद्या काय आहे, याचा उलगडा पुढल्या चरणात त्यांनी केला आहे.

त्यांचं म्हणणं असं की, 'भक्त' हा 'देव'च झाल्यानं त्याला हे सारं लागू होत नाही. याचा थोडा अर्थ स्पष्ट करून पुढं जाऊ. सामान्य माणूस 'सामान्य' असल्यानं त्याला त्यानं केलेल्या प्रत्येक कर्माचा कर्ता 'मी' आहे, असं वाटतं. 'मी असं करायचं ठरवलं आहे, माझी योजना अशी आहे, त्यासाठी मी अशा अशा पद्धतीनं कष्ट करतो आहे. हे सारं मी अशा अशा फळासाठी करतो आहे' इत्यादी इत्यादी.

या पद्धतीनं वेगवेगळ्या मार्गानं हा कर्ता 'मी' कायम आहे. त्यामुळं त्याचे परिणाम भोगायलाही तो कायम राहातो आहे. इतकंच काय, ते परिणाम, ते फळ मिळावं म्हणून तर तो ही सारी कर्मं करतो आहे, असं आढळून येईल. म्हणजे तो नुसता बद्ध आहे असं नव्हे, तर तो स्वत:ला बद्ध ठेवण्याचं सारं काम करतो आहे. तो मुक्त होण्याची शक्यता नाहीच.

या उलट भक्ताची परिस्थिती आहे. श्री तुकोबांनी म्हटल्याप्रमाणं 'देवभक्तपण भिन्न नाही'. म्हणजे हा भक्त मुळात भगवंतात विलीन आहे, तादात्म्य आहे. त्यामुळं ज्याच्या साहाय्यानं प्रारब्ध-क्रियमाण-संचित ही सारी इमारत उभी राहाणार, तो 'मी'च तिथं हजर नाही. त्यामुळं परिणाम भोगायला कुणी असण्याचाही प्रश्न नाही.

यातही 'भक्त' हा या अर्थानं 'देव'च असल्यानं आजच्या त्याच्या 'क्रियमाणा'मध्ये एक तर कर्मं देवत्वाला साजेशीच घडतात आणि दुसरं म्हणजे, ती लौकिकदृष्ट्या त्याच्या देहाकडून घडत असली तरी ती त्यानं साक्षित्वानं केल्यामुळं किंवा 'खरा कर्ता देव आहे' या दृढ

भावानं केल्यामुळं त्याच्यावर ती बंधनकारक होत नाहीत. म्हणूनच खरा भक्त कधी परिणामात अडकत नाही. अत्यंत तन्मयतेनं तो आपलं काम करतो, पण ते ते काम पूर्ण होताच, तो तितक्याच तत्परतेनं त्यातून अलिप्तही होतो, हे मोठं पाहाण्यासारखं आहे.

यात एक गोष्ट इथंच लक्षात घेतलेली बरी की,'कर्ता देव आहे' याचा अर्थ भक्त कुठलंही - बरंवाईट - कर्म करायला मोकळा होतो आणि त्यामुळं त्याला त्याचे परिणाम भोगावे लागत नाहीत, असं मात्र नाही. त्याच्या ठिकाणी देवत्वाचा भाव असल्यानं आपला परिणामाशी काही संबंध नाही म्हणून तो कुठलंही वाईट काम करूच शकत नाही, हा त्याचा अर्थ आहे. कारण देवत्वाचा भावच त्यानं करायची कामंही ठरवतो, जी नेहमी युक्त कर्मंच असतात. या अर्थानं भक्त 'मुक्त' होतो, असतो.

जी गोष्ट या कर्मसिद्धान्ताबद्दलची, तीच या 'त्रिगुणाच्या सिद्धान्ता'बद्दलची आहे. प्रत्येक माणसाच्या घटनेमध्ये हे तीनही गुण - सत्त्व, रज, तम - असतात. त्यांच्या कमी-जास्तपणावर माणसाचा सात्त्विक, राजस, तामस प्रकार ठरतो. या गुणांच्या प्रभावानुसार माणसाकडून कर्मं घडतात. तामस कर्मं तर त्याज्यच करावीत, राजस कर्मं नियंत्रित करावी लागतात आणि सात्त्विक कर्मं शक्यतो करावीत, असं हा सिद्धान्त सांगतो.

पण भक्ताच्या बाबतीत वर सांगितलेल्या कारणांसाठी हा सिद्धान्तही फारसा लागू होत नाही. त्यामुळंच तामस, राजस कर्मांमुळं येणारे दुष्परिणाम वा भोगही त्याच्या वाट्याला येत नाहीत. कारण मुळातच 'भक्त'आणि 'देव' एकच असल्यानं 'सात्त्विक' कर्मं वेगळी करावी लागतच नाहीत. ती आपसूकच घडतात आणि वर म्हटल्याप्रमाणं,

कर्ताच नसल्यानं ती सात्त्विक कर्मंसुद्धा बंधनकारक होत नाहीत.

म्हणून या अभंगापासून हे महत्त्वाचं शिकता येतं की, ही कर्मं, त्याचा परिणाम असा जो नेहमी डोक्यात विषय येतो, मोक्षमुक्तीची चिंता वाटते - ती करण्यापेक्षा आपण 'देवमय' कसं होता येईल किंवा देवाशी 'अभिन्न' किंवा 'अभेद' कसं होता येईल, त्याचीच काळजी घ्यावी, बाकीचे प्रश्न आपोआपच सुटतात.

**

२२.

मनमाउली

मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण ।
मोक्ष अथवा बंधन । सुख समाधान इच्छा ते ।।१।।
मने प्रतिमा स्थापिली । मने मना पूजा केली ।
मने इच्छा पुरविली । मन माउली सकळांची ।।२।।
मन गुरू आणि शिष्य । करी आपुलेचि दास्य ।
प्रसन्न आपआपणासी । गती अथवा अधोगती ।।३।।
साधक वाचक पंडित । श्रोते वक्ते ऐका मात ।
नाही नाही आन दैवत । तुका म्हणे दुसरे ।।४।।

***

सारा आनंदाचा मार्ग शेवटी मनाच्या महाद्वारातूनच जातो. त्यामुळं सारा परमार्थही अखेर मनाचा आहे. म्हणून वाचन करो, ज्ञान मिळो, कर्म आचरो, नाहीतर पूजाअर्चा करो - माणसाच्या मनापर्यंत ते साधन जोपर्यंत पोचत नाही, मनात बदल घडवायला जोपर्यंत ते साधन उपयोगी ठरत नाही, तोवर ते साधन-साधन म्हणून कितीही थोर असलं, तरी व्यर्थच ठरतं.

मनाला हे जे महत्त्व आहे, ते पार अनादिकाळापासून ओळखलं गेलेलं आहे. ज्यांनी या मनाचं महत्त्व प्रकर्षानं अधोरेखित केलं, असे सत्पुरुषही अनेक आहेत. अगदी आद्य शंकराचार्यांनीही 'तन्मनः शोधनं कार्यम्' असं म्हटलं. अगदी अलीकडं सारे पारंपरिक देव-गुरू-साधना-पद्धती सारं नाकारून, शुद्ध ज्ञानमार्गानं जाणाऱ्या ज्येष्ठ तत्त्वचिंतक

जे. कृष्णमूर्तींनीसुद्धा माणसाचं हे मानसिक पारतंत्र्य ओळखून त्या मानसिक पारतंत्र्यातून त्याला मुक्त करणं, हे आपल्या आयुष्याचं ध्येय मानलं.

श्री तुकोबांनीही या मनाला तर दोन मोठी विलक्षण आणि अर्थपूर्ण संबोधनं या अभंगात वापरली आहेत. 'मनमाउली' आणि 'मनदैवत'. त्यामधून मनाच्या बऱ्याचशा कार्यावर त्यांनी प्रकाश टाकला आहे.

आपण नेहमी पाहातोच की, आपण बाहेर कितीही उलाढाली झालेल्या पाहिल्या, कितीही डोळे दिपवणारी प्रगती पाहिली - मग ती विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, कृषी, संगणक कोणत्याही क्षेत्रातली असो - त्या प्रगतीमुळं भले सुखाची साधनं वाढली असतील, चार पैसे हातात खेळू लागले असतील, जीवनमानही वाढलं असेल - पण मनानं माणूस आहे तिथंच आहे. कृष्णमूर्ती तर नेहमी म्हणत की, माणसानं बैलगाडीपासून जेट विमानापर्यंत प्रगती भले केलेली असो, मनाच्या बाबतीत तो बैलगाडीच्याच युगात आहे. इतकंच नव्हे, तर तो मनानं त्या युगातल्यापेक्षासुद्धा अधिकच खाली उतरला आहे. हे आपल्याला आजूबाजूला पाहिलं तरी दिसतं आहे.

आपण महाभारताच्या काळात माणसाचं मन जेवढं विकारवश पाहातो, जेवढं क्षुद्र पाहातो, जितकं कपटी पाहातो, तितकंच हजारो वर्षांनंतर आजही ते पाहातो. म्हणजे साऱ्या बाह्य नेत्रदीपक प्रगतीचा या आतल्या अवस्थेवर कुठलाच विधायक परिणाम वा संबंध दिसत नाही. उलट मनाच्या दुष्प्रवृत्तींत आणि त्याच्या संहारक्षमतेत या वैज्ञानिक प्रगतीनं अकल्पित भरच घातली आहे.

म्हणून एका बाजूनं मनापर्यंत न पोचू शकणाऱ्या आध्यात्मिक साधनांचा उपयोग नाही आणि दुसऱ्या बाजूला या भौतिक प्रगतीचाही या

मनाच्या बदलाला काही उपयोग नाही, अशी दुहेरी अडचण आहे. पण या साऱ्याचा मार्ग तर मनाकडंच आहे. म्हणून त्याचं महत्त्व ओळखणं, त्याच्यातल्या बदलांसाठी योग्य ते प्रयत्न करणं, आपल्याला पारमार्थिकदृष्ट्याही आवश्यक आहे, अन् भौतिकदृष्ट्याही आवश्यक आहे.

म्हणून श्री तुकोबांचा हा अभंग अत्यंत मोलाचा आहे. तो मनाचा बराचसा व्यापार उलगडून दाखवतो आहे. श्री तुकोबा म्हणतात तसं, मन हे जणु सगळ्यांचं खरं दैवत आहे. हे खरं आहे, अशा अर्थानं की, तुमचं काम प्रापंचिक जरी असलं, तरी ते करायचंही अखेर करणाऱ्याच्या 'मनात लागतं' असा आपण अनुभव घेतोच. मनाचं हे दैवत प्रसन्न असेल, तर माणूस इकडचा डोंगर तिकडं करील, मोल देऊन राबणं शक्य नाही इतकं, वेळी फुकटसुद्धा राबेल, मन उदार झालं तर राज्य देईल नव्हे, नेसूचं वस्त्र देईल न पेक्षा, जर हे दैवत प्रसन्न नसेल तर घरातला फुकटचा केरसुद्धा देणार नाही. हा तर व्यवहारच आहे.

तीच गोष्ट पारमार्थिक कामांतही आहे. त्यानं एखाद्या दगडावर प्रेम करायचं ठरवलं, एखाद्या दगडाला देव मानायचं ठरवलं तरी ते मानील, नव्हे त्यासाठी तो वाटेल ते करायला तयार होईल. पण त्याच मनात हे नसेल, तर प्रत्यक्ष देव जरी उभा राहिला, तरी ते साधी मान वर करूनसुद्धा त्याच्याकडं पाहायचं नाही.

असं हे मोठं अजब दैवत आहे, हे खरं. दुसऱ्या बाजूनं, ती 'सकळांची माउली' आहे, हेही खरं. या माउलीचं वैशिष्ट्य हे की, तिच्या पोटी काहीही जन्माला येऊ शकतं. ती गुरूही जन्माला घालील अन् शिष्यही ! तीच माउली आपल्याला सद्गती द्यायलाही कारण होईल किंवा वेळी अधोगती द्यायलाही कारण होईल. म्हणून या मनाकडं सारं

लक्ष द्यावं, असा श्री तुकोबांचा कटाक्ष दिसतो आणि तो अगदी सार्थच आहे.

या मनाला वश करून घ्यायचा मार्ग ते प्रसन्न ठेवण्याचा आहे. ही गोष्ट थोडी स्पष्ट करून पुढं जायला हवं. मन प्रसन्न ठेवायचं म्हणजे अनेकांची समजूत आहे की, जसं आजारी माणसाला, मुलाला प्रसन्न ठेवायचं, म्हणजे त्याला हव्या त्या गोष्टी करायच्या, त्याला दुखवायचं नाही, साऱ्या दु:खाच्या ताणतणावांच्या गोष्टी त्याला सांगायच्या नाहीत, त्याच्यापासून लपवायच्या - असं मनाच्या बाबतीत करणं म्हणजे ते प्रसन्न ठेवणं - अशी काहींची समजूत होते.

अशा ताणतणावाच्या गोष्टी समोर आल्या, नको असलेल्या गोष्टी मनाला करायला लागल्या म्हणजे त्याची प्रसन्नता जाईल, अशी अनेकांची कल्पना असते. वास्तविक, असं करणं म्हणजे वस्तुस्थितीकडं डोळेझाक करण्यासारखं होईल. एखादा आजार आहे, त्यावरचं औषध कडू आहे. आता ते घेताना कडू चवीमुळं मनाला अप्रसन्न वाटेलच. पण म्हणून, मनाला प्रसन्न ठेवण्यासाठी, असं औषध घ्यायचंच टाळण्यासारखं ते होईल. अशानं आजारही बरा होणार नाही आणि त्यामुळं होणारी हानीही टळणार नाही. तेच मनाविरुद्ध असलेल्या इतर अनेक बाबतीतही होईल.

अशा वेळी मन प्रसन्न ठेवणं म्हणजे तसं अभिप्रेत नसून, गोष्टी कशाही घडल्या तरी मन प्रसन्न ठेवण्याचा अभ्यास करणं, हेच खरं सिद्धीचं कारण आहे. साधन म्हणून हे करताना कदाचित ते शरीरमनाला कष्टप्रद असेल, तरी एखादा प्रत्येक गोष्ट भगवंताची इच्छा म्हणून स्वीकारील, एखादा त्यात त्याच्या गुरूंचा हात पाहील, एखादा कार्यकारणभाव जाणून शांत राहील. हे मार्ग वेगळे असले तरी सर्वांच्या मनाच्या प्रतिक्रिया

समान, शांत, प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न राहील आणि तीच खरी साधना होय.

दुसऱ्या बाजूनं, आपल्याला जर हे कळेल की, सारी बंधनं, सारे मूर्तिपूजादी मार्ग, साऱ्या मोक्षकल्पना - सारं काही याच मनाचं कर्तृत्व आहे, करामत आहे, तर विनाकारण पंथ-पंथ, मतं-मतांतरं, श्रेष्ठ-कनिष्ठ, माझा मार्ग-तुझा मार्ग असले भेद हे वरवरचे आहेत, खरा भेद मनातून असलेला आहे आणि तो मनाच्या मीपणातून, स्वतंत्र, श्रेष्ठ अस्तित्व टिकवण्यातून आलेला असून तो त्याज्य आहे, असा विचार समोर येईल.

तो कितीतरी गैरसमज, विकल्प, अकारण द्वैत-शत्रुत्व, नकारात्मक भावना टाळू शकेल. या साऱ्या समजूतदारपणातून हळूहळू बद्ध करणाऱ्या मनाचा नि त्याच्या मार्गांचा आपोआपच नाश होईल. मग राहील ती आपलं जीवन अंतर्बाह्य उजळून टाकणारी, प्रकाशित करणारी शुद्ध मन:शक्ती ! ती तर आनंदाच्या गाभाऱ्याचं दारच आपल्याला उघडून देईल.

**

२३.
निर्धार

हेचि माझे तप हेचि माझे दान । हेचि अनुष्ठान नाम तुझे ।।१।।
हेचि माझे तीर्थ हेचि माझे व्रत । सत्य हे सुकृत नाम तुझे ।।२।।
हाचि माझा धर्म हेचि माझे कर्म । हाचि नित्यनेम नाम तुझे ।।३।।
हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ । हेचि जपध्यान नाम तुझे ।।४।।
हेचि माझे ज्ञान श्रवण मनन । हेचि निजध्यासन नाम तुझे ।।५।।
हाचि कुळाचार हाचि कुळधर्म । हाचि नित्यनेम नाम तुझे ।।६।।
हा माझा आचार हा माझा विचार । हा माझा निर्धार नाम तुझे ।।७।।
तुका म्हणे दुजे सांगायासी नाही । नामेवीण काही धनवित्त ।।८।।

***

श्री तुकोबांचा हा अभंग म्हणजे निष्ठावान साधकाचा परमादर्श होय. त्यांतल्या त्यात 'भगवंताचं नाम आणि त्याचं स्मरण' या पुरातन, प्रधान आणि प्रसिद्ध राजमार्गानं जाणाऱ्यांची जणु जीवननिष्ठाच या अभंगातून व्यक्त झाली आहे. नाम हेच जीवनाचा कसा अविभाज्य भाग बनून जातं किंवा नाम जीवनाला कसं व्यापून राहावं, हे सांगणारे असे अभंग अत्यंत दुर्मीळच म्हणावे लागतील.

सामान्य माणूस भगवंत मिळवण्यासाठी जी साधना करतो, ती त्याच्या त्याच्या मनाच्या ठेवणीनुसार असते, असा सर्वसाधारण अनुभव आहे. उदाहरणार्थ, एखादा गायक भक्ती करायला जातो तेव्हा त्याला वाटतं, भगवंताचं भजन करावं, त्याला कदाचित पूजेचं एवढं आकर्षण वाटणार नाही.

तेच एखादा विद्वान माणूस भक्तीकडं वळला की, त्याला वाटतं भगवंताचं स्वरूप सांगणाऱ्या, भक्तीचे मार्ग विशद करणाऱ्या ग्रंथांचा अभ्यास करावा, अनेक ग्रंथांच्या परिशीलनानं त्यात दिलेले अनुभव तौलनिकदृष्ट्या अभ्यासावे, त्यातून काही सुसंगत निष्कर्ष काढावे.

एखादा इलेक्ट्रीशियन भक्तीकडं वळला की, त्याला वाटतं देवाच्या फोटोचं लायटिंग आपल्याला अधिक प्रभावी करायचं झालं तर काय करावं लागेल, देऊळ अधिक प्रभावीपणे उठून दिसावं वाटत असेल तर कोणत्या रंगाचे कोणत्या प्रकारचे दिवे कुठून सोडले तर कसा परिणाम दिसेल - एक ना दोन. अशा तऱ्हेची भक्तीच्या साधनाची निवडही माणूस आपल्या आपल्या मनाच्या ठेवणीनुसार करतो.

पण माणूस एवढ्यावर थांबत नाही. एकदा का माणसाला त्याच्या ठेवणीनुसार भक्ती यशस्वीपणे करण्याचा प्रकार सापडला की, त्यानं तो काहीही झालं तरी सोडू नये. तेच साधन आयुष्यभर अविरत करीत राहावं. पण माणसाचा स्वभाव इतका एकमार्गी नाही. त्याचं मन इतकं एकाकार नाही. ते प्रापंचिक आहे. त्याला पोटाला आवश्यक म्हणून भाकरी खा म्हटलं, ती आवडीची असली तरी तो भात करील, आमटी करील, चार भाज्या करील, हळूहळू गोडधोड करील, त्यात चटणी-कोरड्यास तिखट हवं म्हणेल - त्याचेही दहा प्रकार करील.

या प्रापंचिक स्वभावामुळं एक साधन, एक गुरू, एक देव हे पुरेसं असलं तरी तो मधूनच तीर्थयात्रा करील, संधी मिळाली, कुणा सत्पुरुषाचं नाव ऐकलं की, धावत तिकडं जाऊन येईल, मधून मधून इतर साधक कोणती साधनं करतात ते पाहून येईल, जरा बदल म्हणून त्यातलंही काही जमतं आहे का पाहून येईल, करून येईल.असं काही केलं की, मग त्याला 'फ्रेश' वाटेल, ताजंतवानं वाटेल.

हे एका पातळीवर खरं असलं, काही प्रमाणात योग्य असलं तरी त्यातून व्यक्त होणारी दृष्टी सतत बदल मागणाऱ्या प्रापंचिक मनाचीच आहे. म्हणून तर भगवत्प्राप्तीची अनेक साधनं ठेवावी लागतात. इथं अभंगात अनेक साधनं उल्लेखलेली आहेत जसं - तप, दान, अनुष्ठान, तीर्थ, व्रत, सत्कर्म, धर्म, योग, यज्ञ, जप, ध्यान, कुळाचार, कुळधर्म - इत्यादी इत्यादी.

मनानं त्याच्या स्वभावानुसार बदल मागितलाच तर त्यानं बदलापोटी आपला मार्ग सोडून, काही प्रापंचिक व्याप करून, पुन्हा यातून घसरू नये, म्हणून असं काही पर्यायी साधन सतत समोर ठेवलं आहे. पण हे सगळं करण्याची गरज आहे का, असं म्हटलं तर मात्र नक्कीच नाही, असं उत्तर येतं, याचं कारणच हे आहे. कारण यांतलं मनापासून केलेलं कुठलंही एक साधनसुद्धा त्याला भगवत्प्राप्तीला पुरेसं ठरतं, हे उघडच आहे.

तरीही सर्वसामान्य माणसाचा स्वभाव-परिस्थिती पाहून आपण हे म्हणू की, ही वेगवेगळी साधनं करीत का होईना, त्यानं आपली भगवंताच्या मार्गावरची वाटचाल करीत असावं. पण त्यातही जर त्याच्या या मनाची प्रापंचिक ठेवण बदलेल, ते एकाकार होईल, एकनिष्ठ होईल तर त्याला इतर साधनांची, त्यांतल्या वैविध्यांची गरज न वाटता कालांतरानं का होईना - एकच साधन त्याला परिपूर्ण वाटेल आणि वाटावं हेच उचित होईल.

अधिक विचार केला, तर सर्व साधनं जरी चांगलीच असली, आपापल्या परीनं श्रेष्ठ असली तरी भगवंताला अगदी जवळचं, सर्वांना सुलभ, आचरायला सोपं तरीही अत्यंत निरुपाधिक असं जे अनादिसिद्ध साधन 'नाम' ते सर्व सत्पुरुषांनी सर्वांना सुचवलं आहे. त्यामागं इतर

प्रकार करून का होईना, पण स्थिर व्हायचं झाल्यास सर्व साधनांचं फळ देणारं साधन म्हणून का सुचवलं आहे, ते लक्षात येऊ शकेल. परमार्थमार्गातसुद्धा भगवंताच्या आड येणारी मनाची प्रापंचिक ठेवण हे नाम मोडून टाकतं, असा अनुभवच आहे.

हेही साधन करताना एकनिष्ठपणे केलं, एकाकार होऊन केलं तर जी भाग्याची स्थिती येऊ शकते, ती या अभंगात श्री तुकोबांनी स्वानुभवानं मांडली आहे. एक भगवंताचं नाम म्हणजे त्यांचं सर्वस्व कसं झालं आहे, हे तर त्यातून स्पष्टपणे दिसतंच आहे, पण आपण आपल्या साधनावर कसं प्रेम करावं, तेच आपलं सर्वस्व कसं व्हावं त्याचा वस्तुपाठही या अभंगात मिळून जातो आहे.

माणसाला तीर्थं, व्रतं, कर्मं, योग, यज्ञ इतकंच काय ज्ञान, श्रवण, मनन - अशा असंख्य गोष्टींची आवड व प्राथमिक पाहाता गरजही असते. पण श्री तुकांबांचे अभंग, त्यांचे अनुभव आणि एकाकार होण्यासाठीची त्यांची आवश्यकता समोर ठेवली, तर ज्ञान घेईन तर नाममार्गाचंच घेईन, श्रवण करीन तर नामसाधनासंबंधीच करीन, मनन करीन तर नाम आणि त्याचा अर्थ यांचं करीन - असं एकेक करीत करीत सारखं नामावर येणं शक्य व हिताचं आहे. तीर्थव्रतांच्या बाबतीतही - जिथं नाम घडत असेल तेच तीर्थक्षेत्र करीन, तेही तिथं नाम घेण्यासाठी, व्रत घेईन तेही नामाच्या संकल्पाचंच - अशा पद्धतीनं सर्व मार्ग जर नामाला जोडले गेले, तर मनालाही शेवटी एकाकार व्हावं लागेल, नामाचीच गोडी, व्यवधान, अनुसंधान निर्माण होईल - जे साऱ्या साधनांचं फलित राहील.

मग आपलं साधन करता करता इतर साधनं करणं आणि आपल्या साधनाचेच काही इतर प्रकार करणं हे सारे मार्ग टाळून, फक्त ते आणि

तेच साधन - असं नाममार्गी कसं व्हावं, ते या अभंगातून शिकता येतं. यातही प्रापंचिक किंवा दुराग्रही हट्टाऐवजी सात्त्विक निर्धाराचा प्रत्यय येईल. मग श्री तुकोबांसारख्यांना भगवंतमय का होता आलं, याचि देही याचि डोळा हा निरुपम सोहळा का अनुभवता आला, आनंदाचे डोही आनंद तरंग - हे सारे अनुभव का आले, याचाही उलगडा हा अभंग करतो आहे. आपल्या नामाला जर अशी स्थिती येईल, तर असा अनुभव आपल्यालाही येणं अशक्य नाही, हे यातून नक्कीच घेण्यासारखं आहे.

शेवटच्या ओळीत सुचल्याप्रमाणं आता अंतर्बाह्य नाम भरून राहिल्यानं आत दुसरा विषयच नाही. सामान्य माणसाला बोलायला शंभर विषय - कारण आत शंभर विषय भरलेले असतात. तसं इथं नसल्यानं आतल्या शंभर विषयांतसुद्धा त्यातल्या त्यात सामान्य माणसाचं मन जसं पैशातून बाहेर येत नाही आणि त्यामुळं त्याचे विषयविचार फिरून फिरून तिथंच येतात, तसं श्री तुकोबांचे विषयविचार फिरून फिरून नामावर येतात. यातूनच आपण काय ते शिकावं, असं वाटतं.

**

२४.
हेचि दान देगा देवा

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।२।।
नलगे मुक्ती आणि संपदा । संतसंग देई सदा ।।३।।
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।४।।

***

श्री तुकोबांच्या अतिप्रसिद्ध अभंगांपैकी हा एक मौलिक अभंग. अगदी लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना परिचित असलेली ही रचना कोणत्याही भजनाच्या किंवा कीर्तनाच्या अखेरीस मानाचं स्थान मिळवून बसलेली दिसते. त्याची कारणं शोधता शोधताच या अभंगाचा काही अभ्यास घडून जातो, असं लक्षात येईल.

या अभंगातलं तुकोबांचं मागणं अगदी साधं सोपं वाटतं. तुझा विसर मला होऊ नये, तुझं गुणवर्णन करणं हीच माझी सर्वांत आवडीची गोष्ट आणि कमाई आहे, मला मुक्तीही नको, संपत्तीही नको, संतसंग द्या आणि मग सुखानं पुन्हा जन्माला घाला - इत्यादी.

तशी ही सारी मागणी सोपी सोपी वाटली, तरी ती एवढी मोलाची का ठरली आहे, हे त्या त्या गोष्टीकडं पाहिलं, तरी लक्षात येईल. उदाहरणार्थ, साऱ्या प्रपंचाचं काही सार असेल, तर ते संपत्ती आहे, पैसा आहे. माणसाच्या साऱ्या खटपटी-लटपटी चालल्या आहेत, त्या साऱ्या त्याच्यासाठी आणि त्याच्याभोवती आहेत. प्रपंचातून एक 'पैसा' वजा केला की, प्रापंचिकाच्या दृष्टीनं तरी तो प्रपंच शून्यच झाला म्हणावा

लागतो.

वेळी माणसापेक्षासुद्धा माणूस त्या पैशाला फार जपतो. त्याला वाटतं, इतर कुठलंही नुकसान परवडलं, पण पैशाचं नुकसान होऊ नये. माणूस म्हणतो, बाकी काहीही गेलं आणि पैसा असला, तर ते बाकीचं आणता येईल. अगदी त्याच्या प्रेमाची पत्नीसुद्धा, तो म्हणतो, पैसा असेल तर दुसरी आणता येईल. पण पैशाचं तसं नाही. तो नसला की, काम थांबलं, जीवन मृतवत् झालं. म्हणजे सामान्य प्रापंचिकाला ती सर्वांत मोलाची वाटणारी गोष्ट - पैसाच.

तीच अवस्था पारमार्थिक माणसाची मुक्तीबद्दल असते. साधन कोणतंही करो, कष्ट कुठलेही करो, देव कुठलाही असो, धर्म कुठलाही पत्करो - पण सारी धडपड मुक्त होण्यासाठी आहे. त्यामुळं तो काहीही जाऊ देईल, काहीही करायला तयार होईल, पण मोक्ष सोडणार नाही. मुक्तीशी तडजोड करणार नाही. कारण सारी साधनं, सारा देवधर्म, सारी नित्यकर्मं त्याच्यासाठी आहेत.

पण इथं लक्षात येईल की, श्री तुकोबांनी सत्संगाला कोणतं मूल्य दिलं आहे. प्रापंचिकाच्या पैशापेक्षा आणि पारमार्थिकाच्या मोक्षापेक्षा श्री तुकोबांना या 'संतसंगा'चं मोल आहे. म्हणून ते मुक्ती आणि संपदा नसली तरी चालेल, पण 'संतसंग' द्यावा ही प्रार्थना करतात, हे शिकण्यासारखंच आहे.

एकंदरीत या जन्माचा अनुभव पाहाता, तो पुन्हा येऊ नये अशी याचना सगळीकडं केली जाते. पण श्री तुकोबा या 'संतसंगा'पुढं पुन्हा मनुष्यजन्माच्या यातनासुद्धा सोसायला तयार आहेत. म्हणून ते म्हणू शकतात की, हा संतसंग मिळणार असेल, तर भगवत्प्रेमाच्या त्या सुखासाठी मला पुन्हा जन्म आला तरी चालेल. जर हा 'संतसंग' देऊन मला

जन्माला घालीत असाल, तर पुन्हा त्या मानवजन्माच्या यातनासुद्धा मी आनंदानं भोगायला तयार आहे. सत्संगाला इतकं मूल्य आपल्या सर्वांच्या जीवनातही यावं, असं सकारण म्हणावंसं वाटतं.

त्यातूनच त्यांची या साऱ्याकडं बघण्याची एक वेगळी आणि निष्ठावान दृष्टी पहिल्या दोन चरणांतही कशी प्रत्ययाला येते, ते पाहाण्यासारखं आहे. ती आता जरा तपशिलात पाहू या.

माणसाची मागण्याची इच्छा मोठी चिवट आहे. ती जाता जात नाही. इतकी साधनं करूनसुद्धा खरं म्हणजे माणूस निरिच्छ व्हायला हवा, पण तो तसा होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अर्थात सन्मान्य अपवाद सोडून देऊ या.

पण सामान्य माणसाची स्थिती ही बहुतांशी अशी आहे की, त्याच्या हातून अगदी न घडणारी कैलास मानस सरोवराची कठीण यात्रा पार पडली काय किंवा अगदी अवघड तेरा कोटी वगैरे जपाचं अनुष्ठान झालं काय - त्यानं आता तो पूर्ण समाधानी, निरिच्छ होईल का, हे सांगता येत नाही. उलट इतकं सगळं झालं, तरीही त्यानंतरसुद्धा आता स्वत:ला काय मिळेल किंवा मिळावं, अशी इच्छा सहजपणे त्याला कधी होईल, हे सांगता येत नाही.

अशा वेळी एखाद्या तात्कालिक किंवा नाशिवंत मागण्यानं माणूस कुठं घसरू नये, त्याचं कुठं नुकसान होऊ नये, असं वाटत असेल तर 'हेचि दान देगा देवा' असं म्हणून आठवणीनं 'तुझा विसर न व्हावा' म्हणजे 'स्मरण आणि त्याच साधन नाम' हे मागणंच उचित ठरेल.

कारण हे मागण्यानं एक तर अन्य काही बेसावधपणे मागणं टळेल. तसंच एक भगवंताचं स्मरण आलं, त्याचं नाम आलं की, त्यात तोच आला. भगवंत त्यात आला, तर साहजिकच चित्ताला

त्याचा स्पर्श आला, शुद्धता आली, पावित्र्य आलं - सारांशानं सारं काही आलं.

म्हणून ते सारं मिळवण्यासाठी भगवंताचं स्मरण मागितलं आणि एका बाजूनं भगवंताला खात्री दिली व दुसऱ्या बाजूनं मनाला आठवण दिली की, तुझं गुणगान करणं, गुणसंकीर्तन करणं हीच माझी सारी कमाई आहे, राहील. अन्य गोष्टी गोळा करणंही नको आणि त्यांची मनाला आवडही नको. हे मागणंही पुन्हा मनाला भगवंताच्या अनुसंधानात राखण्यासाठी अतिशय महत्त्वाचं आहे.

आपण पाहातो की, एखादा कीर्तनासारखा, नामस्मरणासारखा, भजनासारखा कोणताही कार्यक्रम संपला की, माणूस त्या उत्तम वातावरणातून बाहेर पडतो. तो कार्यक्रम कितीही उत्तम असला आणि त्यानं त्याचं चित्त कितीही शुद्ध आणि उन्नत केलेलं असलं, तरी इतर जगाच्या आणि त्याच्या स्वत:च्या वर्षानुवर्षांच्या जीवनपद्धतीनं त्यानं गोळा केलेले विघातक, संकुचित संस्कार इतके बलवत्तर असतात की, तो अशा वातावरणातून बाहेर पडताच, जसा शरीरानं तिथून बाहेर येतो, तसा मनानंही येतो. शरीरानं घरी येतो, तसा मनानंही पुन्हा त्याच्या मूळ संकुचित, स्वार्थी नकळतपणे घरी परततो.

म्हणून वर्षानुवर्षं असं श्रवण घडूनसुद्धा माणसांत अपेक्षित फरक दिसत नाही. अशा वेळी जर हा अभंग शेवटी म्हटला, तर त्याला निदान 'भगवंताचं स्मरण' आपण 'शेवटी' मागितल्याचं स्मरण राहील, सत्संगाला कशाहीपेक्षा जास्त मूल्य असावं, हे शिकल्याची आठवण राहील. याही अर्थानं हा अभंग अखेरीस मानानं स्थानापन्न झाला आहे.

मात्र त्या साऱ्या कीर्तनभजनाचं जे होतं, तेच हा अभंग नुसता यांत्रिकपणे म्हणून संपला तर घडण्याची भीती आहे. म्हणून निदान हा

अभंग म्हणताना तरी याचा अर्थ अभ्यासून, सतत मनन करून, अत्यंत तन्मयतेनं म्हटला, तर तो आपल्याला नक्कीच फलदायी ठरेल, असं सर्वांना नम्रपणे सुचवावंसं वाटतं.

अशाच तऱ्हेनं समारोपाच्या या प्रसंगी केवळ सत्संगाची अभिलाषा धरून भगवंताच्या स्मरणात आपला हा श्री तुकोबांच्या प्रसादगाथेतल्या कणांचा कणभर अभ्यास भगवंताच्या आणि सर्व सहृदय वाचकांच्या चरणी सादर करीत आहे.

'हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा !'

***

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

प्रसादक ण

प्रसादक ण

प्रसादक ण

प्रसादक ण

प्रसादक ण

हा माझा आचार । हा माझा विचार...